म. ग्रं. सं. ठाणे
विषय इतिहास
सं. क्र. ४५००

REFBK-0004461

पेशवे दप्तरांतून निव

१६

इतिहास
८०८

# वसई मोहीम

(१७३७—३९)

दा. क्र. ८४६
संशो. शाखा (स्थळ प्रत)

[किंमत—१ रुपया ८ आणे किंवा २ शिलिंग ६ पेन्स]

REFBK-0004461

गव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई
१९३१

# *THE BASSEIN CAMPAIGN, 13TH MAY 1739*

The capture of Bassein from the Portuguese is justly considered as one of the greatest exploits of the Marathas, and Grant Duff has given a very eloquent account of it. The papers which are now being presented not only corroborate all that Grant Duff and others have said but disclose fresh details and episodes which go to show how assiduously Bajirao and his brother Chimnaji worked to pursue the policy contemplated and carried to partial success by the illustrious founder of the Maratha Kingdom. For Shivaji's chief aim was to make the land safe for the Hindu religion. This point was specially taken up by his grandson Shahu who with that object conducted one campaign on the west coast, viz. that against Janjira, while the Peshwa took up another, viz. that against Bassein. The latter was directed against the Portuguese who had carried their religious intolerance to such extremes that many of the landlords and inhabitants of the Bombay islands made incessant complaints to Shahu and the Peshwa and implored them to take prompt steps to relieve their miseries by undertaking an organized invasion of Portuguese territory and establishing Maratha rule there. In this appeal to religious sentiment most of the people residing on the west coast as far south as Goa joined with one voice. Bajirao and his brother Chimnaji undertook the great venture and eventually gained a signal victory which has immortalized their names in the annals of Maratha history.

The late Rao Bahadur Sane long ago printed a Marathi account of this campaign, entitled "Sashtichi Bakhar," the contents of which now appear to be confirmed in every detail by these letters, which bring to light many new characters, encounters and achievements and which prove how whole-heartedly high and low alike united in a common effort to accomplish this great national object. There are letters from Antaji Kavle, a landed proprietor of Malad (near Andheri) who played a conspicuous part in this undertaking by furnishing information of the enemy's movements and preparations, by pointing out routes and positions for concentration and attack and in various other ways. Vasudeo Joshi and his brother Narayàn, the Patvardhan brothers Ramchandra and Govind Hari, Phadke Shankaraji Keshav, Baji Bhivrao, Pilaji Jadhav, these and many others have in these papers accurately and fully narrated their particular share and personal experiences which will doubtless be greatly appreciated by lovers of history. Most of the letters are addressed to Chimnaji, whose watchful eye, close vigilance and indefatigable energy are markedly visible throughout this long and arduous campaign of three years. Equally eloquent are the letters offering him congratulations on his victory. It is however better to leave the reader free to rove at will among the original material than to hamper him by any superfluous remarks from the editorial pen. The papers here presented should be compared with those on the same subject in Forrest's *Selections from the Papers in the Bombay Secretariat*.

स्थळ प्रत
सं. १ नं. ७५०२
ता. २१-१-३४

[13-8-1730

(जमाव—रु. नं. १६६३.)

श्री

मराठी ग्रंथ संग्रह
नोंद नं. ७५०२
ठाणे,

**वेदशास्त्रसंपन्न राजश्री चिमणभट टकले**
**गोत्र शांडिल्य वास्तव्य जनस्थान**
**स्वामीचे सेवेसी**

सेवक पिलाजी जाधवराऊ दंडवत. सुाा इहिदे सलासीन मया अलफ. तुमचेविसी सरदेशाई व देशमुख व देशपांडे प्रांत वसई व बहादुरपुरा व दवण याणीं येऊन विदित केलें कीं प्रांा मजकूर बहुत दिवस फिरंगियाखाले होता. यामुलें हिंदुधर्माचा लोप जाहला होता. सांप्रत राजश्री पंतप्रधान याणी तुम्हास या प्रांते रवाना केलें. फिरंगियास मारून काढिले. देश हस्तगत जाला. तेथें धर्मस्थापन जालें पाहिजे, याजकरितां वेदमूर्तीस गावगना दरगावास रुा धर्मादाव करून द्यावा; त्याप्रमाणें पावत करून म्हणून विदित केलें. त्यावरून धर्मदाये दरगावायास रुपया येक करार केला असे. त्याप्रमाणे घेऊन स्नानसंध्या करून राजश्रीस कल्याण इछून सुखरूप राहाणे. जाणिजे, छ १० सफर.

¶*Pilaji Jadhao informs Chimanbhat Takale of an allowance granted to him by the Peshwa.*

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

*No. 1-A*] [5-12-1732 ?

पो छ ३० जमादिलाखर

श्री

**राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री**
**अंताबा स्वामी गोसांवी यांसी**

पोष्य वासुदेव जोशी नमस्कार विनंती. येथील कुशल तागाईत मार्गशीर्ष वद्य चतुर्दशी जाणून स्वकीये लेखन केलें पाहिजे विशेष. राजश्री पंतप्रधान यांणीं आम्हांस पत्र पाठविलें कीं "राजश्री अंताबा यांस पुणियामध्यें ठेविले आहे. जें कामकाज लागेल तें त्यास लेहून पाठवीत जाणें, ते साहित्य करितील," याकरितां हें पत्र पाठविलें आहे. या प्रांतें फिरंगियाची गडबड होणार, मास

पक्षानें, ऐशी वार्ता आहे. यास्तव पूर्वसूचना लिहिली आहे. धामधुमेचा प्रसंग जाहालियावरी लेहून पाठऊंन. शें दोनशें स- पाहिजे. बहुत काय लिहिणें, लोभ असो दीजें. हे विनंती.

¶*Vasudeo Joshi, officer at Kalyan, writes for reinforcements t. Raghunath (Kavale ?) as the Portuguese were preparing to make an upon the province within a fortnight.*

---

*No. 2]* *[11-7-1733*

पा छ १७ सफर

**श्री**

**श्रीमत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी**

पोष्य वासुदेव जोसी कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल ता आषाढ शुध येकादसी जाणून स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. अमरभुईचे पूर्वेस मंदाकिनी डोगर कोलवणात आहे तो कोणी वसविला आहे. पाचसात अलंगा[1] घातल्या आहेत. कोणी वसविला आहे कलत नाहीं. कललियावरी लेहून पाठऊन. कलावे याकरितां लिहिले असे. बहुत काये लिहिणे, लोभ केला पाहिजे. हे विनंती.

¶*Vasudeo Joshi writes that he is busy gathering information about the settlement on the hill Mandakini.*

---

*No. 3]* *[11-7-1733 ?*

पा छ १७ सफर

**श्री**

**श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी**

पोष्य वासुदेव जोसी कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल ता आषाढ शुध येकादसी जाणून स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. अमरभुईचे पूर्वेस प्रांत कोळवण येथें मंदाकिनी म्हणून डोंगर आहे तो वसविला म्हणून वर्तमान येकिले, त्यावरून खरे की लटके मनास आणावयास आम्ही माणसे पाठविलीं. त्याणी जाऊन मनास आणिलें. त्यास वसविला खरा. वरत्या दोन-च्यार आलगा आहेत. लोकहि वरते होते. त्यावरी माणसे खबर घेऊन

---

१ भिंती, तट.

कल्याणास आली. त्याउपरी जवारकरास व रायाजी रामाजी यांस पत्र पाठविले कीं डोंगर कोणी वसविला काय वर्तमान (ते) लेहून पाठवणे. त्यावरून जवारकर यांनीं आम्हास पत्र पाठविलें व रायाजी रामाजी याणी पत्र पाठविलें. त्यास जवारकर यांणी पत्र पाठविले तेच पत्र बजिनस व रायाजी रामाजी याचे पत्राची नकल पाठविली आहे त्यावरून कळो येईल. जवारकरांनीं ये गोष्टीची बंदोबस्ती करावी म्हणून लिहिले आहे व रायाजी रामाजी याणी लिहिले कीं राजश्री कृष्णराव यांणी गुरास जागा करावयास सांगितले, त्यावरून अमरभुईचे लोकांनी पांचा साता माणसापुरती छपरे घातली म्हणून लिहिले आहे, ये जातीचे वर्तमान आहे. आपणास कळावे याकरितां लिहिले असे. हे पत्र स्वामीनीच वाचून याचे उतर पाठवावे. दुसरियास दाखवावेसे नाहीं. आपणांसच कळावे याकरितां लिहिले असे. बहुत काय लिहिणे लोभ केला पाहिजे हे विनंती.

*¶Vasudeo Joshi forwards to Chimaji Appa the letters written by Jawarkar and Rayaji Ramaji giving information about the settlement on the hill Mandakini ; the report is based on the personal information gathered.*

---

*No. 4]* *[1734 ?*

## श्रीशंकर

### श्रीमत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

शरणागत सेवापरायण अंतोजी[1] रघुनाथ कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल परिसोन स्वकीये स्वानंदवैभवलेखणआज्ञा केली पाहिजे विशेष. रंकास स्वामीपादांबुजावेगले दुसरे कोन्ही संरक्षण करी ऐसे नाही. स्वामी अवतारीकच आहेत, तेथे स्तुतितोत्र करणे तरी मंदमतीने केवी घडेल? याउपरी सर्व क्षमा करायासी समर्थ आसा. रंक येकनिस्ट अंघ्रिकमळीं, हे सर्व विदितच. का जरे[2] मनोमन साक्ष, तेथे द्रष्टांतें दाखवावे यैसा पदार्थ नाही. सन इहिदेमधें स्वामीसनदेवरून राजश्री पिलाजी जाधवराऊ गोसावियासमागमे दोनसे बरकंदाज आणि आपण स्वता पाच मास सेवा केली. रोजमुरा व सिबंदी काही येक घेतले नाहीं. का जर पुढे महत उर्जिताचें भुकेले म्हणोन आपेक्ष्या करीत राहिलो आणि जे श्रम करावे ते केले. अदृष्टें न्यूनता केली ततसंमधी ईस्वरी इच्छा. राजश्री पिलाजी जाधवराऊ वेथस्त होऊन वाघवलीस गेले तेव्हा हशमाचे लोक होते ते रोजमुराकरिता कमरा बाधोन जावयासी लागले. आणि स्वामीचे पत्री

---

१ कावळे, मालाडकर. २ तर.

आज्ञा आली की सेवकाने व राजश्री बालाजीपंत आठवले याही हशम घेऊन पुढे चालावे मागून स्वामी व पिलाजी जाधवराऊ लवकरच येतो म्हणोन कृपांपत्र पावले. त्यास ते हशमाचे लोक रोजमुरा घेतल्याखेरीज राहात नाही म्हणोन राजश्री बालाजीपंत व केशव बहिरी हे उभयता (लो) काजवल येऊन रुपयाचा तलास करविला तेव्हां पावणेचवदासे रुपये लोकांचे कर्ज काढोन त्रिहोत्र्याप्रमाणे खते देऊन घेऊन रोजमुऱ्यास दिल्हे. त्यास राजश्री बालाजीपंत याच्या चिठ्या गुा केशव बहिरी व सरदाराची कबजे घेऊन ठेविली आहे. सेवकाची आस्ता सर्वस्वें उदारत्वेकरोन स्वामिकार्य साधावे आणि महतर येश स्वामि गैवरवयाचे (गौरवावयाचे) पात्र व्हावे. परंतु जन्मांतरास उपाये कैचा? पुढे जे जाले ते सर्व विदितच आहे. याउपरी राजश्री पिलाजी जाधवराऊ घाटावर गेले आणि रंकास जमावसहवर्तमान राजश्री कृष्णरांऊजी[१] स्वामीचे पदरी घातले. तेथील क्षिणक्षिणाचे उर्जित सर्व पादांबुजी विदितच असे. तेथे लिहावेच नलगे. त्याउपरी आज्ञाप्रमाण पुण्यामध्ये येऊन मास आठ लोकासहवर्तमान हवेलीगे[२] सरदार सर्व घेऊन राहिलो आणि स्वामीही ज्या ज्या निशा[३] हवीलागेच्या मार्गाच्या करविल्या. बालोजी करला व गोविंद ब्राह्मण हे पाठऊन मार्ग हव खाडीची वांट सर्व पाहाविली तेव्हा रंकाचे चित जाले कीं कार्यसिधी होऊन रुणापासून मुग्त होऊन. कां जर, महतर भाग्याची इच्छा तरी आहेच परंतु रुणापासोन मुग्त जालो आणि येश जाले हाच महतर लाभ. तत्समधी शंतोसी जाहालो आणि स्वामीचे चितामधे कार्यउदेश होताच परंतु आमचे जन्मांतर कितिकांचे मुखी येऊन मधे विक्षप जाला. याउपर स्वामी या प्रांते आले तेव्हा न व्हावे यैसे न्हवते. परंतु दुष्टग्रहफळश्रुतीने रंकाचा नास जाला. लोक मेलविले ते श्रमी. श्रमातुरच केले. याउपरी हवेलगे हे फिरगाणचे यासी कौवलेपत्रे आली आणि ह्या कल्या (?) मधे च्यार पाइली तांदूल रुपयास यैसा दुशकाल. त्यास त्यांस भक्षावयास न द्यावे तर ते जातात आणि कृपानिधीनी गाव देऊन म्हणोन वचन दिल्हे होत आणि त्यास काये प्रतिउतर द्यावे ती आज्ञा करायासी समर्थ अस याउपर वसईच्या कोटाचा भेद केला आणि स्वामीस पत्र लिहिले त्यास आज्ञाढ आली की येथार्थच आहे. परंतु स्वारी जालियावरी निर्वाह होईल. तर स्वामीचे हे राजकारण हजारा माणसान हातास येते. मधील लोक भेदले आहे आणि मार्ग हव नीट आहे आणि तेवढ्याने सर्व स्थले पदरी पडतात. कां जर मूलछेद जाल्यान मग शाकाचे प्रयोजन नाही. यैसे असता स्वामीस सत्ये भासावे आणि

१ चासकर, कल्याणचा सुभा. २ वाटाडे, माहितगार, भेद्ये. ३ खात्री.

सरजाम करावा येदर्थी कोन्ही सभे[1] पाठऊन गोष्ट चितात आणून करावे. कां जर आजचा दिवस उद्या येणार नाही. पंधरा दिवसी नित्ये राजकारण नवे म्हणोन पुढा रंकास बोल ठेवाल. यासी जर जेष्ट वद्य अमवाशापावेतो कार्य होत असले तरी निश्चयात्मक लिहिणे. नाहीतरी वुगेच होरो[2] ठेऊन आम्हास सर्वसी अपकीर्तीस पात्र करावे येसा पदार्थ उतम नाही. तरी आम्ही केवल श्रमी असो. ज्या प्रकार उचित असेल त्या प्रकारे करायासी समर्थ असा. कृपा लोभ असो दीजे हे विनती.

¶*Antaji Raghunath Kavle to the Peshwa, giving him news from the Konkan that Pilaji Jadhao was ill and had proceeded to his village at Vagholi, that he therefore had to work under Krishnarao, that he had to face tremendous difficulties in retaining his men owing to want of money. The only request of the writer to the Peshwa is that he should be freed from the debts in which he has become involved on account of his army.*

---

*No. 5]*

*[1734 ?*

## श्रीशंकर

### श्रीमंत राजश्री दादबा गोसावियांचे सेवेसी

पोष्ये अंताजी रघुनाथ अनेक आसीरवाद विनंती. येथील कुशळ परिसोन स्वानंदवैभवलेखणआज्ञा केली पाहिजे विसेष. कृपापत्र पाठविले वाचोन जीवंकला (जीवनकला) दुणावली. आम्हास आपल्यावेगला दुसरा आश्रये नाहीं. मनसावाचाकर्मणेकरून सर्वस्वी शरण तेथे आपण अभिमान धरतील हे गोष्टीस अपूर्वच नाहीं. याउपरी आमचा पूर्ववर्तमान साकल्ये गोसावियासी विदितच असे. परंतु पुन्हा सूचनामात्र स्मरणार्थ लिहितो. सन इहिदेमधे राजश्री जाधवराऊ गोसावियाचे सोबतीस श्रमसाहास केले आणि दोनसे बरकंदाज याची म‍ंबंदी पाचा महिन्याची सर्वस्व अपेहार[3] करोन दिल्हे. यावर पावणेसवदासे रुपये हशमास रोजमुरा दिल्हा आणि कारण जर रा जाधव घाटावर वेथस्त आणि रा बालाजीपंत येथ ज्वरेकरोन मग्न आणि हशम भक्षायावेगले राहात नाही. तेव्हा रुण त्रिहोत्राप्रमाणे रुपये घेऊन दिल्हे. याउपरी पुढे मनसबा जाला तो सर्व विदितच. हवेलागे माणसे चवतीस ते आपला प्रात टाकोन आमचे वचनास तीन वरसे श्रमी. त्यास भक्षावयासी द्यावे लागते. किती

---

१ सभ्य, दरबारांतील विश्वासू.
२ सूत्र ठेवून, भिजत घोंगडे ठेवून.
३ सर्वस्व वेंचून.

आज्ञा आली की सेवकाने व राजश्री बाळाजीपंत आठवले याही हशम घेऊन पुढे चालावे मागून स्वामी व पिलाजी जाधवराऊ लवकरच येतो म्हणोन कृपापत्र पावले. त्यास ते हशमाचे लोक रोजमुरा घेतल्याखेरीज राहात नाही म्हणोन राजश्री बाळाजीपंत व केशव बहिरी हे उभयता (लो) काजवळ येऊन रुपयाचा तलास करविला तेव्हां पावणेचवदासे रुपये लोकांचे कर्ज काढोन त्रिहोत्र्याप्रमाणे खते देऊन घेऊन रोजमुऱ्यास दिल्हे. त्यास राजश्री बाळाजीपंत याच्या चिठ्या गुा केशव बहिरी व सरदाराची कबजे घेऊन ठेविली आहे. सेवकाची आस्ता सर्वस्वें उदारत्वेकरोन स्वामिकार्य साधावे आणि महतर येश स्वामि गैवरवयाचे (गौरवावयाचे) पात्र व्हावे. परंतु जन्मांतरास उपाये कैचा? पुढे जे जाले ते सर्व विदितच आहे. याउपरी राजश्री पिलाजी जाधवराऊ घाटावर गेले आणि रंकास जमावसहवर्तमान राजश्री कृष्णरोऊजी[१] स्वामीचे पदरी घातले. तेथील क्षिणक्षिणाचे उर्जित सर्व पादांबुजी विदितच असे. तेथे लिहावेच नलगे. त्याउपरी आज्ञाप्रमाण पुण्यामध्ये येऊन मास आठ लोकासहवर्तमान हवेलेगे[२] सरदार सर्व घेऊन राहिलो आणि स्वामीही ज्या ज्या निशा[३] हवीलागेच्या मार्गाच्या करविल्या. बाळोजी करला व गोविंद ब्राह्मण हे पाठऊन मार्ग हव खाडीची वांट सर्व पाहाविली तेव्हा रंकाचे चित जाले कीं कार्यसिधी होऊन रुणापासून मुग्त होऊन. कां जर, महतर भाग्याची इच्छा तरी आहेच परंतु रुणापासोन मुग्त जालो आणि येश जाले हाच महतर लाभ. तत्समधी शंतोसी जाहालो आणि स्वामीचे चितामधे कार्यउदेश होताच परंतु आमचे जन्मांतर कितिकांचे मुखी येऊन मधे विक्षप जाला. याउपर स्वामी या प्रांते आले तेव्हा न व्हावे यैसे न्हवते. परंतु दुष्टग्रहफळश्रुतीने रंकाचा नास जाला. लोक मेळविले ते श्रमी. श्रमातुरच केले. याउपरी हवेलगे हे फिरगाणचे यासी कौवलेपत्रे आली आणि ह्या कल्या (?) मधे च्यार पाइली तांदूळ रुपयास यैसा दुशकाल. त्यास त्यांस भक्षावयास न द्यावे तर ते जातात आणि कृपानिधींनी गाव देऊन म्हणोन वचन दिल्हे होत आणि त्यास काये प्रतिउतर द्यावे ती आज्ञा करायासी समर्थ अस याउपर वसईच्या कोटाचा भेद केला आणि स्वामीस पत्र लिहिले त्यास आज्ञा आली की येथार्थच आहे. परंतु स्वारी जालियावरी निर्वाह होईल. तर स्वामी! हे राजकारण हजारा माणसान हातास येते. मधील लोक भेदले आहे आणि मार्ग हव नीट आहे आणि तेवढ्याने सर्व स्थले पदरी पडतात. कां जर मूळछेद जाल्यान मग शाकाचे प्रयोजन नाही. यैसे असता स्वामीस सत्ये भासावे आणि

---

१ चासकर, कल्याणचा सुभा. २ वाटाडे, माहितगार, भेदे. ३ खात्री.

सरंजाम करावा येदर्थी कोन्ही सभे[1] पाठऊन गोष्ट चितात आणून करावे. कां जर आजचा दिवस उद्या येणार नाही. पंधरा दिवसी नित्ये राजकारण नवे म्हणोन पुढा रंकास बोल ठेवाल. यासी जर जेष्ट वद्य अमवाशापावेतो कार्य होत असले तरी निश्चयात्मक लिहिणे. नाहीतरी बुगेच होरों[2] ठेऊन आम्हास सर्वसी अपकीर्तीस पात्र करावे येसा पदार्थ उतम नाही. तरी आम्ही केवळ श्रमी असो. ज्या प्रकार उचित असेल त्या प्रकारे करायासी समर्थ असा. कृपा लोभ असो दीजे हे विनती.

¶*Antaji Raghunath Kavle to the Peshwa, giving him news from the Konkan that Pilaji Jadhao was ill and had proceeded to his village at Vagholi, that he therefore had to work under Krishnarao, that he had to face tremendous difficulties in retaining his men owing to want of money. The only request of the writer to the Peshwa is that he should be freed from the debts in which he has become involved on account of his army.*

---

*No. 5*] [*1734 ?*

### श्रीशंकर

#### श्रीमंत राजश्री दादबा गोसावियांचे सेवेसी

पोष्ये अंताजी रघुनाथ अनेक आसीरवाद विनंती. येथील कुशळ परिसोन स्वानंदवैभवलेखणआज्ञा केली पाहिजे विसेष. कृपापत्र पाठविले वाचोन जीवंकला (जीवनकला) दुणावली. आम्हास आपल्याविगला दुसरा आश्रये नाहीं. मनसावाचाकर्मणेकरून सर्वस्वी शरण तेथे आपण अभिमान धरतील हे गोष्टीस अपूर्वच नाहीं. याउपरी आमचा पूर्ववर्तमान साकल्ये गोसावियासी विदितच असे. परंतु पुन्हा सूचनामात्र स्मरणार्थ लिहितो. सन इहिदेमधे राजश्री जाधवराऊ गोसावियाचे सोबतीस श्रमसाहास केले आणि दोनसे बरकंदाज याची मनबंदी पाचा महिन्याची सर्वस्व अपेहार[3] करोन दिल्हे. यावर पावणेसेवदासे रुपये हशमास रोजमुरा दिल्हा आणि कारण जर रा जाधव घाटावर वेथस्त आणि रा बाळाजीपंत येथ ज्वरेकरोन मग्न आणि हशम भक्षायविगले राहात नाही. तेव्हा रुण त्रिहोत्राप्रमाणे रुपये घेऊन दिल्हे. याउपरी पुढे मनसबा जाला तो सर्व विदितच. हवेलागे माणसे चवतीस ते आपला प्रात टाकोन आमचे वचनास तीन वरसे श्रमी. त्यास भक्षावयासी द्यावे लागते. किती

---

१ सभ्य, दरबारांतील विश्वासू. २ सूत्र ठेवून, भिजत घोंगडे ठेवून.

३ सर्वस्व वेंचून.

म्हणोन रुणे[1] घ्यावे? अता तोहि मार्ग राहिला. मृत्यअवस्था येऊन उभी ठाकली. येथे हल्ली जे कोन्ही आहेत त्यास ह्या मनसब्याचे प्रयोजनच नाही. त्यास सुख-दुख म्हणोन सांघावे काये? यैसियासी आम्ही कदीम गोसावियाचे म्हणोन विनंती कारितो की येजमानास श्वाफ पुसावे जर हा मनसबा करणे आहे तरी आता उतम दिवस आहेत. वैशाख वद्ये येकादसीचे दिवसी कार्य साधोन देतो. येक रात्रीमधे सासस्टीतील च्यार कोट व येकसे सतावन गाव मुलूख येके रात्रीन साधून देतो. यासी हव लाग वाट उतार कोटाचे दौरे सर्व तयार करोन ठेविले असेत. कदाचित येजमानास कोन्ही हितछत्रू लटके म्हणोन सागत असतील तरी दोन मनुश येजमानाची आत विश्वासू पाठऊन हे अवघे मनास आणून खरे करावे. याजमधे अनुरेणुमात्र लटके असेल तरी जिव्हा छेदन करावी हाच मुचलका सही. याजउपरी येजमानास कोन्ही सागतील की द्रव्यावेगले कार्य होत नाही त्यास आमचे हवे लागे म्हणतात की जर द्रवे नसले मनसब्यास, तरी येक पचवीस हजार आम्हाकडे महिनाभर पाठऊन देणे; आम्ही च्यार कुडे गुमस्ते धरून लाख रुपयापर्यंत महिन्यामधे निर्माण करून देऊन; हे ज्या गडी म्हणाल त्या ठिकाणी आणून देऊन. हे गोष्ट अन्यथा होणार नाही. हेहि चित्ती न भरे आणि आमचा उधार[2] न होये यैसे आपले दृष्टीस आले तरी भलतेप्रकार[3] निरोप होये तो पदार्थ करणे हेच महत: उर्जित समजोन पुढे यात्रासनंमध (यात्रासंबंध) विचारला जाईल. अता उपोशणे व अपमान याच्या समुद्रातून काढावयासी आपण समर्थ असेत. कृपा लोभ असो देणे. पत्री साभाल करीत जाणे हे विनंती. कृपा करून ह्या मनुशास येजमान असतील ते स्थल श्रुत करणे हे विनंती.

¶*Antaji Raghunath writes to one Dadba (Badba ?) how he exerted himself in the cause of the state along with Jadhaorao, and how he had to incur debt for the expenses of his men. Further he complains about the indifferenc of those who are in charge of the management of affairs and finally reques orders from the Peshwa to conduct the operations against any odds. Th writer promises his full support saying that he would within one night bring the whole of the Salsette province under him and would raise a lakh of rupees as loan in one month.*

---

१ ऋण काढून लोकाचे रोजमुरे द्यावे? २ उद्धार. ३ निराळ्या रीतीनें, इतर रीतीनें.

No. 6] [1734 ?

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे
सेवेसी

पोष्य वासुदेव जोशी साष्टांग नमस्कार विनंती. राजश्री अंताजी रघुनाथ यांचा साविस्तर अर्थ तीर्थस्वरूप राजश्री रायास लिहिला आहे त्यावरून कळेल. यांचें बोलणेंचालणें कांहीं लिहितां पुर्वत नाहीं. आम्ही आजतागाईत कोणाचीहि खुशामत केली नहोती ते यांची करावी! हा सर्व अर्थ राजश्री वेंकाजीपंत सांगतां कळों येईल. यांच्यानें होणें तों कांहीं नाहीं, परंतु नाश मात्र करील. स्वामी सूज्ञ आहेत. बहुत काय लिहिणें लोभ केला पाहिजे हे विनंती.

¶*Vasudeo Joshi writes to Chimaji Appa that Antaji Raghunath is very vacillating and a friendship with him will be ruinous in the long run.*

---

No. 7] [21-2-1734 ?

श्री

श्रीमत राजश्री आपा स्वामीचे
सेवेसी

पोष्य वासुदेव जोशी कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल तागाइत माघ वद्य चतुर्दशी गुरुवासर जाणून स्वकीय लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामींनीं पत्र पाठविलें तेथें लिहिलें कीं शिसें व गंधक राजश्री स्वामीनीं आणविलें आहे तरी शिसें दोन हजार रुपयांचें व गंधक हजार रुपयांचा येकूण तीन हजार रुपये जिनस मुंबईहून खरीदी करून आणून लौकर पाठविणें म्हणोन लिहिलें. त्यावरून आजींच मुजरद येक कारकून व माणसें मुंबईस पाठविलीं आहेत, आणि सदर्हूप्रमाणें जिन्नस आणविला आहे. जिन्नस आलियावरी स्वामीकडे लवकरीच रवाना करून. कदाचित शिसें येऊं द्यावयास इंग्रेज यांणीं अनमान केला तरी आम्हांजवळी हजार रुपयांचें शिसें आहे तें पाठऊन देऊन. आम्ही इंग्रेजांस पत्र येविशी पाठविलें आहे. बहुधा तो जिन्नस येऊं देईल ऐसें आहे. त्याचा आमचा सलूक राबिता आहे. कळलें पाहिजे हे विनंती.

¶*Vasudeo Joshi writes to Chimaji Appa that the provision of the store of lead and sulphur worth Rs. 3,000 will be made immediately on its receipt from Bombay.*

No. 8] [22-3-1734?

पौ छ १ सवाल

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

पोष्य वासुदेव जोशी कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ २७ सवाल जाणून स्वकीय लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. फिरगाण प्रांतीचे कार्यभागाचे वर्तमान पूर्वी स्वामीस लिहिले होते त्यावरून कळलेच असेल. अलाकडे बसईचे राजकारण राा अंताजी रघुनाथ व गंगाजी अणजोरकर यांजकडे आले आहे त्याचे चौकसीस माणसे पाठऊन तेथील शोध मनास आणून चैत्र शुद्ध पौर्णिमे सिध्धी करावी येसा निश्चय केला आहे. आपणास कळावे याकरितां लिहिले असे. मार्गाचे वर्तमान मनास आणितां मार्ग ठीक आहेत. ठाणियात गेलियावरी द्रव्यलाभहि होईलसा दिसतो. वरकड होणे ते प्राक्तनानुरूप व ईश्वरइछेने होईल. पुढे ठाणियाचा कोट जाहलियावरी कार्य साध्य होणार नाही. आणि येदा फौज घरी राहिली आहे व हशमहि आहे. हजार बारासे माणूस मात्र जाजती ठेवावे लागेल. सिबंदी देणे लागतच आहे. याकरितां काम करावे येसे राजश्री रायाचे विचारे आहे. आपणास कळावे याकरितां लिहिले असे. याचे उतर पाठवावे. त्याप्रमाणे वर्तूणूक करून. कळले पाहिजे. बहुत काय लिहिणे लोभ करीत गेले पाहिजे हे विनंती.

¶*Vasudeo Joshi writes to Chimaji Appa that Antaji Raghunath and Gangaji Anajurkar are entrusted with the political affairs in connection with Bassein. Preparations for an attack are being made and prospects of getting a valuable return after the capture of the fort are very high.*

---

No. 9] [23-3-1734?

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

सेवक कृष्णराऊ माहादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल फाल्गुण वद्य चतुरदसी मंदवासर जाणून, स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे विसेष. आम्हाकडील वृत्त तर, आम्ही व राजश्री दुर्जनसिंग सुरत प्राते येतांच, चिखलीचे मुकामी प्रात:काल्चे दिढा प्रहरा दिवसा, गंगाजी गायेकवाड हजार राऊत व सात आठशें बरकंदाज येव्हड्यानसी गावासनिध नदीवर येऊन युध्यास उभा राहिला.

सुरतेचे सुभियाचा बकसी[1] बराबरी होता. जुज जाहाले. स्वामीचे पुण्यप्रतापेकरून, शत्रु पराभऊन, वडिलांस येश आले. पुढे जावयाची स्वामीची आज्ञा नव्हती. याकरितां फिरोन फत्तेपुरास आलो. युध्यात आम्हाकडे येणेप्रमाणे पाडाव आले. जजाला १२, पालकी १, घोडा १ बकसीसुधा, यैसे जाले आहे. युधसमई आमचे लोकानी बकसी वोलखला नाही. यास पाडेव[2] घोडा घेतला इतकियात मागून सोमवंसी याची टोली आली. आम्ही पाठीवर पुढे गेलो. मागे आमचे राऊत राहिले. त्यासी कजिया करून, बकसी नेला. वडिलास कलावे म्हणून लिहिले आसे. सुज्ञास विसेसी लिहिणे नलगे. दुसरे दिवसी आज्ञेप्रमाणे राऊत त्याजबराबर देऊन, आम्ही कूच करून, गोवरीस आलो. उदैक फतेपुरास जाऊन. जवारकरानी लबाडी बहुत आरंभली आहे. याचे (पार) पत्य करून, लवेकरीच सेवेसी येतो. पुढे श्रम केलियास इकडील कामकाज स्वामीचे मनोदयानरूप होऊन येईल यैसे आहे. करणार वडील समर्थ आहेत. विसेष काये लिहिणे. रघू जासूद आपणाकडे रवाना करून, आठरा दिवस जाले. त्याचे वर्तमान कळत नाही. तो काये जाला, हे न कले. बहुत काये लिहिणे, कृपा असो दीजे, हे विज्ञापना. युध्य येकादसीस बुधवारी जाहाले. हे विनती.

¶*Krishnarao Mahadev Chaskar to the Peshwa, informing him of his fight with Gangaji Gaikwad.*

---

*No. 10*] [*27-3-1734?*

**श्री**

**श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी**

पोष्य वासुदेव जोशी कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल तागाईत चैत्र शुद्ध चतुर्थी जाणून स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. आजीं दोनतीन दिवस जाहाले. मौजें तिलेर प्रांत फिरंगाण हा गांव किल्ले घोटवडियाचे पश्चमभागीं दीडदोन कोंस आहे. तो गांव छ ३० सवालीं कोणाचे लोक येऊन मारिला. पंनास माणसांची स्वारी होती. मौजें मजकूरचीं च्यार माणसें जखमीं केलीं व दोन माणूस जीवें मारिला (लें). गांव जाळून लुटून व येक बाइको धरून घेऊन गेले, व सवेच दुसरें दिवशीं मौजें कामण प्रांत फिरंगाण हा गांव मारिला. तेथं गांवकरी यांचे व कोणाची स्वारी आली होती त्यांचें युद्ध जाहालें. गांवकरी यांनी त्यांचें येक माणूस काफरी जखमी केला. त्यास तो गांवकरियांस सांपडला

---

१ सेनापति. २ काबीज करून.

म्हणजे मुद्दा सांपडेल, याकरितां चोरांनीं आपल्याच काफरियाचें डोकें कापून घेऊन गेले. हें वर्तमान फिरंगियांस कळलें. त्यास फिरंगी आपले जागां सिद्धतेमध्यें आहे. कल्याणावरी यावें, हें काम दक्षणेंतून होतें येसें चित्तांत गुमान मानून, दुर्बुद्धिवरी आहे. कल्याणाशीं कजिया करावा ऐसें त्याचें चित्तांत आहे म्हणून फिरंगाणांतून जे माणूस येतें तें सांगतें. दुर्वार्ता असोन बेफाम असतां कार्यास न ये याकरितां सेदोनसे माणूस ठेवणें लागतें. स्वामीस पूर्वी स्वारांविशी लिहिलें त्यास स्वार पाठवावयाचें आपले विचारास न ये. यास आमचा उपाय काय? आम्ही अपणांस त्याहावें ऐसें असोन विचारास न ये तरी आम्हीं काय करावें? फिरंगी यांची स्वारी दोनच्यारशें माणूस मौजें तिलेन्याचे रोखे आली आहे, याकरितां आम्ही चाळीस पंनास माणूस किल्ले घोटवडियास पाठविलें आहे. आणखीहि ठेऊन वरचेवरी पाठऊन. कळलें पाहिजे. स्वामीचे कागद फिरंगियांस आले त्याचें उत्तर अद्याप दिल्हें नाहीं. गोव्यास लिहिलें आहे तेथून जाब येईल त्याप्रमाणें उत्तर लेहून पाठवितील. फिरंगियाचा विश्वास करावा ऐसें नाहीं. बहुत काय लिहिणें हें विनंती.

¶*Vasudeo Joshi writes to Bajirao Ballal that the Portuguese suspect the people in the Deccan to be responsible for the outrages committed in their village Tiledi. On this pretext, they are thinking of marching on Kalyan ; for this the help of troops is urged.*

---

*No. 11*] *[1734?*

श्री

पुरवणी राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी.

विनंती उपरी. आजी कल्याणाहून पत्रें आलीं. फिरंगी फिरंगाण प्रांतात साष्टींत जितकें हिंदु माणूस आहे तितकियाची टीप, देखील पांचा वर्षांचें मुलापासून वृद्ध माणूस, कुली[1] टीपे[1] लेहून घेतली. येक माणूस कोठें फरकों देत नाहीं. जागां जागां चौक्या ठेविल्या आहेत. गलबतें लाहान थोर सें-दीडसें जमा करून जागां जागां ठेविलीं आहेत. हिंदु माणूस तेथून बाटवणार

१ सर्व, झाडून सर्व मोजदाद.

म्हणून लौकिक आहे. याकरितां त्या प्रांतीं थोर आकांत जाहाला आहे. वर्तमान अपणास कळावें याकरितां लिहिलें असें. बहुत काये लिहिणें लोभ करीत गेलें पाहिजे. हे +विनंती.

¶*Bajirao is informed of the terrible religious persecution in Salsette. The whole Hindu population, the writer adds, is to be forcibly converted to Christianity.*

---

No. 12] [?

श्री

श्रीमत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी.

पो वासुदेव जोसी कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ता पौश सुध अष्टमी जाणोन स्वकीये लेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीनी पत्र पाठविले ते पावोन वर्तमान कलो आले. कितेक प्रकारे कार्यभाग[1] करावा एतदअर्थी लिा तर त्या विचारातच आहो. विचारे करून होईल त्यास चुकतो ऐसा अर्थ नाहीं, परंतु प्रस्तुत फारसा बदोबस्त जाहाला आहे, परतु आम्हीहि त्या इलाजामध्ये आहो. कलले पाहिजे. बहुत काये लिहिणे? लोभ करीत गेले पाहिजे हे विनंती.

¶*Vasudeo Joshi assures Chimaji Appa of his readiness to do something by way of checking the enemy.*

---

No. 13] [1734 or 1736

छ ८ रमजान.

श्री

विनंती उपरी. स्वामीचे चितामध्ये हे गोष्टी आली आहे तर प्रस्तुतच करावी. पुढे कोट[2] जालियावर बलकटी होईल म्हणून पूर्वी स्वामीस लिहिलेच आहे; तर अविलंबे कार्य करावें. स्वामीस कलावे याकरितां लिहिले असे. बहुत काये लिहिणे. लोभ केला पाहिजे हे × विनंती.

¶*The chit advises an immediate execution of the plan which has been formed.*

---

+ पत्रलेखक—वासुदेव जोशी. १ साष्टीची मसलत. २ ठाण्याचा कोट फिरंगी बांधत होता तो.

× पत्रलेखक—वासुदेव जोशी. पत्र पेशव्यास अगर चिमाजी आपास.

No. 14] [Date ?

छ ८ रमजान

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

पोष्य वासुदेव जोसी सां नमस्कार विनंती. येथील कुशल ता छ ६ माहे रमजान जाणून स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीनी पत्र पाठविले ते पावले. फिरंगियांनीं लबाडी केली. पत्र पाठविले त्याचे उतर मगरूरपणे लिहिले याकरितां त्याला ठेचगा द्यावा म्हणून लिहिले. येसियेसी याचे उतर सविस्तर पूर्वी लिहिले आहे त्यावरून कलेल. निदानी दोन अडीज हजार माणूस व दीड हजार दोन हजार स्वार सिध्ध करावे म्हणजे स्वामीचे प्रतापे कार्य सिध्धीस जाते. सविस्तर मागाहून लेहून पाठवितो. कलले पाहिजे. बहुत काये लिहिणे? लोभ करीत गेले पाहिजे हे विनंती.

¶*Vasudeo Joshi to the Peshwa, saying that a strong contingent is necessary to attack the Portuguese and to punish them for the letter of defiance which they have sent.*

---

No. 15] [Date ?

श्री

श्रीमत राजश्री आपा स्वामीचे सेवसी

पोष्य वासुदेव जोसी कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ ३० रमजान जाणून स्वकीये ल्याहावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीनी पत्र पाठविले ते प्रविष्ट जालें. लिहिले वर्तमान कलो आले. तेथें लिहिले कीं श्रीमत राजश्री रायांची पत्रे आली असतील त्याप्रमाणे वर्तणूक करणे. त्यासी राजश्री रायानी लिहून पाठविले कीं तुम्हीं जागा जागा लोक पाठविले असतील ते उठवणे, त्यावरून तमाम किलोकिलाखालील लोक व नेरलास ठाणे बैसविलें होते तेहि आज्ञेवरून आम्ही उठविले, ते सविस्तर पूर्वी स्वामीस लिहून पाठविलेच आहे त्यावरून सविस्तर कललेच असेल. प्रस्तुत आपण पत्र पाठविले त्यावरून रकार[१] ग्रामाखाले स्वारी पाठविली आहे. सविस्तर आलाहिदा पुरवणीत लिहिले आहे त्यावरून कलो येईल. आम्ही काय करावे? आमचे हात

---

१ राजमाची (?)

पाये राा रायाचे पत्रावरून मोडले. उपाय नाहीं. परंतु स्वामीने तरी धीर धरला पाहिजे. कार्य होईल. ही कर्मे धांडधडसपणाची[1] आहेत. केवल आज्ञा प्रमाण म्हणल्याने कार्य कसे होते ? आज दोन दिवस राा रायाचे पत्रहि आले नाहीं. आम्ही जे लिहिणे ते लिहिले आहे, परंतु उतर आले नाहीं. राजश्री चिमणाजी भिवराव यांचा उपरोला[2] करावा, ते तरी स्थल हस्तगत करावे. बहुत काये लिहिणे ? लोभ करीत गेले पाहिजे हे विनंती.

¶*Vasudeo Joshi writes to Chimaji Appa that the order of Bajirao Ballal to withdraw forces from the different places where they were stationed has paralysed their activities. Under the circumstances Chimaji Appa is advised to take heart.*

---

*No. 16*] [*21-2-1735 ?*

**श्री**

**श्रीमंत राजेश्री बाबा[3] स्वामीचे सेवेसी**

सेवक हरिये गाव सरदेसाई तो मणेरी रामराम विनती. येथील कुशल फाल्गुण सुध १० मी भुगुवारपरियेत जाणोन स्वामीचे कृपादृष्टीकडून इकडील प्रांताचे वर्तमान येथास्थित असे विशेष. राजेश्री सरदेशाई प्रां कुडाल याणी पंचमाहाल पूर्वक्त ( तर ? ) सरकारतर्फेचे त्यास हाली फिरंगी व त्यांचे विवेकामुलें माहाल दरोबस्त देऊन रेंडीचा किला घेतला आणि फिरंगियाकडस हे माहाल पडलेनें वतनदार व रयेत फिरंगियाखालीं पडले. नंतर हिंदूधर्म राहात नाही. याकारितां देव ब्राह्मण स्थापना करून हिंदूधर्मरक्षणा होऊन येश स्वामीचे पदरी पड यैसा समई हाली आहे. फिरंगियाचा सद्या कमजोरा आहे; आण आम्ही सर्व वतनदार व रयेत येकत्र होऊनु ठाणीसुधा माहाल सरकारांत लागेत आण आमचें हाते स्वांमीसेवा घडे यैसे आमचें चिताचा सिधांत करून स्वामीस विनतीपत्र लिहिले आहे, कीं आमचें सेवेचा मजरा[4] होऊन आमचे उर्जित होये, ऐसे सविस्तर वर्तमान आपणास दाखल व्हावे यास्तव आम्हांकडील कारकून पाठऊन राजेश्री जनार्दनपंत यांस जें सांगणें तें सांगितलें आहे. ते साकल्य वर्तमान निवेदन करतील त्यावरून आपण कृपाल होऊन पंत माारनिले याचा सरजाम करून निशाणसुधा रवाना करणार आपण समर्थ आहेत. सारांश गोस्ट आम्ही सर्वास

---

१ (?)
२ मदत, साह्य.
३ बाजीराव बल्लाळ (?)
४ मान्यता मिळून, सेवेची परवानगी होऊन.

जबा[1] (?) देऊन आपले दयेवर इतरास भरोसा देऊन हे पत्र आपणास लिहिले आहे. सूज्ञाप्रति विस्तार लिहावा न लगे. विशेष काय लिहिणे कृपा निरंतर असो दिली पाहिजे हे विज्ञाप्ति.

¶*Hariyego Desai of Maneri on behalf of the Hindu population and vatandars of the province makes a representation to the Peshwa to deliver them from the oppressive rule of the Portuguese.*

---

No. 17] [27-2-1735 ?

पा छ १६ सवाल

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

पोष्य वासुदेव जोसी कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल ता छ १४ सवाल जाणून स्वकीय लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीनी मुजरद जासुदासमागमे पत्र पाठविलें तें पावलें. फिरगाणचा विचार लिहिला तो कळला. यैसियासी याच विचाराकरितां राजश्री राव यांनीं आम्हास बोलाविले त्यावरून आम्ही आलों. राजश्री राव यांस जो विचार सुचला तो सांगितला. राजश्री राव स्वामीस लिहितील त्यावरून कळेल. मुख्य[2] स्थलाचा विचार राजश्री रायानी सांगितला; यैसियासी तेथील कार्य साध्य होईल येसे आमच्या चितात येत नाहीं. ये गोष्टीची चौकशी करून करणे ते करावे म्हणून सांगितले. त्यास राजश्री रायानी अंतोजी[3] रघुनाथ व अंणजोरकर[4] यांस याची पैरवी[5] सांगितली व आम्हास सांगितले कीं चौकशी करणे. त्यास आम्ही कल्याणास गेलियावरी याचा शोध मनास आणून काम ठीक आहे अगर नाहीं येसी आमचे मनाची निशा[6] जाहलियावरी आठापंधरा दिवसानी स्वामीस लेहून पाठवितों व राजश्री रावहि पुणियास येतील. मग स्वामी व त्याचे विचारें जो सिधांत[7] करणे तो केला पाहिजे. बहुत काये लिहिणे लोभ केला पाहिजे हे विनंती.

¶*Vasudeo Joshi writes to Chimaji Appa that Bajirao has appointed Antaji Raghunath and Gangaji Naik Anjorkar to make an enquiry into the political moves of the Portuguese.*

---

१ 'जबान' तर नव्हे ? जबान म्ह. वाणी. अर्थात् वचन, शपथप्रमाण; 'सर्वां(सं) सनदा देऊन' असेंहि होईल; किंवा 'जहा देऊन' असेंहि होईल.

२ साष्टीचा किल्ला. ३ कावळे. ४ गंगाजी नाईक.

५ व्यवस्था, तजवीज. ६ खात्री. ७ निश्चय.

No. 18] [1735 ?

श्री

सेवेसी विज्ञापना ऐसीजे. वसई प्राताहून आम्ही आसामी दाहा आलों. चितात आहे की सरकार किफायेतीचा सर्व वर्तमान विदित करावा परंतु येकांत दर्शन होत नाही. त्यास देखील[1] खिजमतगार दूर करून आज्ञा होईल तर विदित करू. येक मास आम्हास जाला. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति. येक महिना जाला. परंतु लिहिल्याप्रा भेटी होत नाहीं. स्वामी काये करितील ? त्या प्रांते अमलदार आहेत त्याची रती[2] समर्थ, तेथे उपाये काये ? प्रात:काली माघारे जाणार. काही अपेक्षा नाहीं. धन्याचे आम्ही हित काये करणे, परंतु सुचले ते सागावे तेथे दोष नाही म्हणौन श्रम[3] करीत होतो. श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Ten men from Bassein jointly ask the Peshwa for an interview over the Bassein affair, for which they have been waiting for over a month.*

---

No. 19] [1735 ?

श्री[4]

सेवेसी विनंती. आजी राजश्री बुबाजी नाईक अणजोरकर याणी राजश्री गंगाजी नाईक आणजोरकर यास पत्र पाठविले की 'स्वामी बुवाजी[5] नाईकास येक दोन वेळा बोलिले कीं तुमच्या माणसासमागमे शंकराजीपंत[6] यास पत्र पाठविले त्याचे उतर अद्याप आले नाही.' त्यास तेच पत्र गंगाजी नाईक याणी आम्हांस दाखविले. त्यांस स्वामीनी तों 'पत्राचे उत्तर राहिले' म्हणून लिहिले नाही. बुबाजी नाईकाने लिहिले त्यास मनास आणितां स्वामीची पत्रें येतांच वरचेवरी उतरे पाठवितो. येथून आम्ही पत्र पाठवितो त्याचे उतर स्वामीचे येते. जाबाचा सालँ होतो आणि त्याचे फिरोन काय ल्याहावे म्हणून लिहित नाही. वरकड वरचेवरी उत्तरे लेहून पाठवीत असतो. बुबाजी नाईकानी आमक्या पत्राचा जाब राहिला हेहि लिहिले नाही. त्यास जाब कोणता राहिला याचा तर्क· करिता बहुधा जाब राहिले. (ते)

---

१· सुद्धा.
२ दैवदशा.
३ प्रयत्न, भेटीचा.
४ पत्र शंकराजी केशवाचे चिमाजी आपास.
५ गंगाजीचा भाऊ.
६ शंकराजी केशव फडके.
७ प्रश्नाचीं उत्तरें प्रत्युत्तरें जातात.

राजश्री संभाजी आंग्रे याजकडील बोलीचा अर्थ स्वामीनी लिहिला. याउपरी त्यास पत्र अगर कोणी प्रहस्त पाठवावा. त्यास प्रथम पाठविता, आपलें अंग न दर्शविता पाठवावे. त्यास दर्याजी खीरसागर आम्हाजवली आहेत. त्यांचा त्याचा दंडक बरा आहे याकरिता याजवलून आपले आंग न दर्शवितां त्याजवलून पत्र लेहवितो. त्याजमधे बोलीचा अर्थ आणून लिहितो. कलले पाहिजे. येणेप्रा कलम १

आम्ही आपले नावे राजश्री संभाजी आंग्रे यास पत्र लेहवून, ते समाचार वर्तमानाचे केवल गलेपड्डपणाचे लिहिणार नाही १

परोंड सावंत याजकडील लोकांचा आर्थ तरी तिकडे पाठवावयास कोणी भला माणूस पाहतो परंतु कोणी योजून येत नाही. विदित जाले पाहिजे कलम १

येणेप्रा सेवेसी कलावे म्हणून लिहिले आसे. विज्ञापना.

¶*Chimaji Appa is informed of the communications being sent to Sambhaji Angria through Daryaji Kshirsagar.*

---

*No. 20*] [*6-3-1735*

पौ छ २४ सवाल

**श्री**

**श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी**

पोष्य वासुदेव जोसी कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल फाल्गुन वद्य ८ गुरुवासर जाणून स्वकीय कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. राणोजी भोइटे यास मावमासपैकी रुपये दोन हजार द्यावे त्यास आपण तेथे पावणेसातसे दिल्हे आणि आम्ही सवातेरासे द्यावे म्हणून स्वामीनी लिहिले तरी लिाप्रमाणें देऊन. आपण श्रीभीमाशंकरास आले येसे आपले पत्र राजश्री पंतप्रधान यास आले त्यास आमचा बहुत हेत होता जे दर्शनास यावे. परंतु राजश्री राव दोन दिवस निरोप देत नाहींत यास्तव येणे न जाले. वरकड अपले येणे श्रीस जाले त्यास कोथला[1] पाहावा. उतम आहे. परंतु तेथें निशाण चढलेसे अद्याप वर्तमान आले नाही तर तेथें माणूस पाठऊन निशाण चढले असिलें म्हणजे जाणे. बहुत काय लिहिणे लोभ करीत गेले पाहिजे हे विनंती.

¶*Vasudeo Joshi in his letter to Chimaji Appa alludes to the latter's visit to Bhimashankar and entreats him to go to fort Kothala, if it has been taken into possession.*

१ कोथल्याचा किल्ला.

No. 21] [29-3-1735 ?

छ १७ जिलकाद.

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी

पो वासुदेव जोशी सां नमस्कार विनंती. येथील कुशल चैत्र वद्य द्वितीया जाणोन स्वकीय कुशल लखनाज्ञा केली पाहिजे विशेष. फिरंगाण प्रांतें चोर उपद्रव जाला याकरितां (फाटलें) * सर्देसं[1] आहे तेथें दोनसें तीनसे माणूस कपितान स्वारी घेऊन राहिला आहे. काल स्वारी पाठऊन कोहज परगणियाचा गांव मौजे आंवढे फिरंगियानें मारून नेले. घरे जाळिली. ब्राह्मण एक व मुसलमान मारिला. वरकड रयत पळाली. बंदे[2] कांही धरून न्यावयास सांपडले नाहीं. काय निमित्य हे कर्म केले हे न कळे. राजश्री कृष्णंराव[3] पेठ प्रांते गेले आहेत. राजश्री दुर्जनसिंग चिखलीवर आहेत. मुलकाच्या खडणिया घेतात. दाभाडियाची फौजेसी दोनवेळा संग्राम जाला. त्याचा पराभव केला. राजश्री नारप्रभु पारनेरियाकडे गेले आहेत. दवंण[4] प्रांत फिरंगियाचा मुलूक, तेथील सर्दी[5] गाव दाहा पाच मारिले म्हणून वर्तमान आले आहे. ठाणियास जराल[6] व काडदीन आहे. जमाव जमा करीत आहेत. कोण्हीकडे जातील हें कळत नाहीं. स्वाराविसी एकदोन वेळां आपणास लिहिलें, परंतु येत नाहींत. तरी शंभर स्वार सत्वर पाठविले पाहिजेत. फिरंगी लबाडीवर आहे. आणखीं लबाडीस चुकतो ऐसे नाहीं. बहुत काय लिहिणे? लोभ करीत गेले पाहिजे हे विनंती.

¶*Vasudeo Joshi to Bajirao, reporting Portuguese ill-deeds in North Konkan.*

---

No. 22] [April 1735 or 1736 } ?

छ ६ मोहरम

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ

स्वामीचे सेवेसी विनंती.

स्वामीनी पहिले आज्ञा केली होती की फिरंगाणचे कार्य खामखा करणे व येविसी पत्रे एक दोन पाठविली. यैसियासी ते कार्य वैशाख वद्य अमावाश्येस

---

१ सरहद्दीस. २ बंदिवान.

३ चांसकर. ४ दमण. दमणलाच पूर्वी दवणें किंवा दवण असी संज्ञा होती.

५ सरहद्दीचे. ६ जनराल.

राजश्री संभाजी आंग्रे याजकडील बोलीचा अर्थ स्वामींनी लिहिला. याउपरी त्यास पत्र अगर कोणी ग्रहस्त पाठवावा. त्यास प्रथम पाठविता, आपलें अंग न दर्शविता पाठवावे. त्यास दर्याजी खीरसागर आम्हाजवळी आहेत. त्यांचा त्याचा दंडक बरा आहे याकरिता याजवलून आपले आंग न दर्शवितां त्याजवलून पत्र लेहवितो. त्याजमधे बोलीचा अर्थ आणून लिहितो. कलले पाहिजे. येणेप्रा कलम १

आम्ही आपले नावे राजश्री संभाजी आंग्रे यास पत्र लेहवून, ते समाचार वर्तमानाचे केवल गलेपडूपणाचे लिहिणार नाही १

परोंड सावंत याजकडील लोकांचा आर्थ तरी तिकडे पाठवावयास कोणी भला माणूस पाहतो परंतु कोणी योजून येत नाही. विदित जाले पाहिजे कलम १

येणेप्रा सेवेसी कलावे म्हणून लिहिले आसे. विज्ञापना.

¶*Chimaji Appa is informed of the communications being sent to Sambhaji Angria through Daryaji Kshirsagar.*

---

*No. 20*] [*6-3-1735*

पौ छ २४ सवाल

**श्री**

**श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी**

पोष्य वासुदेव जोसी कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल फाल्गुन वद्य ८ गुरुवासर जाणून स्वकीय कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. राणोजी भोइटे यास मावमासपैकी रुपये दोन हजार द्यावे त्यास आपण तेथे पावणेसातसे दिल्हे आणि आम्ही सवांतरासे द्यावे म्हणून स्वामीनी लिहिले तरी लिाप्रमाणें देऊन. आपण श्रीभीमाशंकरास आले येसे आपले पत्र राजश्री पंतप्रधान यास आले त्यास आमचा बहुत हेत होता जे दर्शनास यावे. परंतु राजश्री राव दोन दिवस निरोप देत नाहींत यास्तव येणे न जाले. वरकड अपले येणे श्रीस जाले त्यास कोथेला[१] पाहावा. उतम आहे. परंतु तेथें निशाण चढलेसे अद्याप वर्तमान आले नाही तर तेथें माणूस पाठऊन निशाण चढले असिलें म्हणजे जाणे. बहुत काय लिहिणे लोभ करीत गेले पाहिजे हे विनंती.

¶*Vasudeo Joshi in his letter to Chimaji Appa alludes to the latter's visit to Bhimashankar and entreats him to go to fort Kothala, if it has been taken into possession.*

---

१ कोथल्याचा किल्ला.

No. 21] [29-3-1735?

छ १७ जिलकाद.

श्री

**श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी**

पो॥ वासुदेव जोशी सां॥ नमस्कार विनंती. येथील कुशल चैत्र वद्य द्वितीया जाणोन स्वकीय कुशल लखनाज्ञा केली पाहिजे विशेष. फिरंगाण प्रांतें चोर उपद्रव जाला याकरितां (फाटलें) * सर्देस[१] आहे तेथें दोनसें तीनसे माणूस कपितान स्वारी घेऊन राहिला आहे. काल स्वारी पाठऊन कोहज परगणियाचा गांव मौजे आंवढे फिरंगियानें मारून नेले. घरे जाळिली. ब्राह्मण एक व मुसलमान मारिला. वरकड रयत पळाली. बंदे[२] कांही धरून न्यावयास सांपडले नाहीं. काय निमित्य हे कर्म केले हे न कळे. राजश्री कृष्णराव[३] पेठ प्रांते गेले आहेत. राजश्री दुर्जनसिंग चिखलीवर आहेत. मुलकाच्या खडणिया घेतात. दाभाडियाची फौजेसी दोनवेळा संग्राम जाला. त्याचा पराभव केला. राजश्री नारप्रभु पारनेरियाकडे गेले आहेत. दवण[४] प्रांत फिरंगियाचा मुलूक, तेथील सर्दी[५] गाव दाहा पाच मारिले म्हणून वर्तमान आले आहे. ठाणियास जराल[६] व काडदीन आहे. जमाव जमा करीत आहेत. कोण्हीकडे जातील हें कळत नाहीं. स्वाराविसी एकदोन वेळां आपणास लिहिलें, परंतु येत नाहींत. तरी शंभर स्वार सत्वर पाठविले पाहिजेत. फिरंगी लबाडीवर आहे. आणखी लबाडीस चुकतो ऐसे नाहीं. बहुत काय लिहिणे? लोभ करीत गेले पाहिजे हे विनंती.

¶*Vasudeo Joshi to Bajirao, reporting Portuguese ill-deeds in North Konkan.*

---

No. 22] [April 1735 or 1736]?

छ ६ मोहरम

श्री

**पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ**
**स्वामीचे सेवेसी विनंती.**

स्वामीनी पहिले आज्ञा केली होती की फिरंगाणचे कार्य खामखा करणे व येविसी पत्रे एक दोन पाठविली. यैसियासी ते कार्य वैशाख वद्य अमावाश्येस

---

१ सरहद्दीस. २ बंदिवान.
३ चांसकर. ४ दमण. दमणलाच पूर्वी दवणं किंवा दवण असी संज्ञा होती.
५ सरहद्दीचे. ६ जनराल.

करावे, त्यास अम्ही सातारियासी अलो. येथून लौकर निरोप होता दिसत नाही यामुळे ते कार्य प्रस्तुत राहिले. पुढे येथून पूर्णमेअलीकडे निरोप जाहाला तर स्वामीचे आज्ञेप्रमाणे ते कार्य करू. जर निरोप (न झाला तर) कार्य राहिले. स्वामीस कलावे यास्तव लिहिले असे. फिरंगाणच्या कार्यास अधी तो अम्हीच जावे हे उतम. कदाचित आमचे जाणे न होये तेव्हा राजश्री पिलाजी जाधवराऊ यासी तऱ्ही पाठवावे आणि कार्य करावे, तर आम्ही राजश्री स्वामीपासी गुंतलो व राजश्री[१] पिलाजी जाधवराऊ यासी राजश्रीनी गोवलकोटास पाठवावयाचा मनसबा राजश्री[१] केला यामुळे मारनिलेस गोवलकोटास जाणे प्राप्त जाहाले. जातील. विदित जाहाले पाहिजे. आम्ही उभयेताहि लोकात नसता, लोक पाठऊन कार्य करवावे तर कार्य होईल नव्हे[२] हाहि भरवसा नाही व लोक, सरदार मातबर नसता मन घालून कार्य करितील यैसे नाही आणि उगेच डवचावे[३] यैसे होईल; यास्तव लोक पाठविता न येत. स्वामीस कलावे याकरिता लिहिले असे. +बहुत काये लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनंति.

¶*Chimaji Appa communicates to Bajirao that as per his instructions he could not proceed on the Portuguese campaign as he was detained at Satara by the King, nor could he send Pilaji Jadhao whom the King wished to depute to Gowalkot.*

---

*No. 23*] [*15-11-1735 ?*

पाा छ ११ रजब

**श्री**

**श्रीमंत राजश्री आपा** ~~स्वामीचे सेवेसी~~

विनंती शेवक शंकराजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायेत छ १० रजबपावेतो स्वामीचे कृपादृष्टीकरून सेवकांचे वर्तमान येथास्थित असे विशेष. राघो नारायेण किले माहुलीहून आजी पुणियासी * * * * * (क)र्णाजी सिंदे याणी सिवाजी[४] अणजोरकर यासमागमे पंनास माणूस देऊन फिरगाणात स्वारी करून फिरगाणची दोन कुले उदमी धरून आणिले येसे सांगितले. त्यास हे गोष्टी उतम केली नाहीं. येणेकरू टोपीकर[५] कल्याणप्रांतीहून गांव मारून नेईल आण त्याचा व आपला बिघ

---

१ राजश्रीही, राजश्रीनी. २ न होई, न होईल. ३ फिरंग्यास.
+ अक्षर चिमाजीचें खुद. ४ गंगाजीचा भाऊ. ५ फिरंगी.

होईल. आम्हांसी हे गोष्टीचा काये विचार करावयाचा तो केला पाहिजे आम्हास हे वर्तमान कलताच सेवेसी लिहून पाठविले आहे. व हाजिरी व जमादिलाखर महिन्याचा रोजमऱ्याची वाटणी आली ती सेवेसी पाठविली आहे व रजब महिन्याचा रोजमरा तेथील लोकांचा देविला पाहिजे. सेवेसी विदित होये हे विज्ञाप्ति.

¶*Shankraji Keshav Phadke complains to Chimaji Appa of the high-handed action of Karnaji Shindia who sent a raiding party into the Portuguese territory and captured two important personages. He is afraid, he says, the Portuguese may retaliate by attacking villages near Kalyan.*

---

*No. 24*]

[*1734-1735 ?*

**श्री**

**पुरवणी श्रीमत राजश्री पंतप्रधान**
**स्वामीचे सेवेसी**

सेवक अंताजी रघुनाथ कृतानेक नमस्कार विनंती विसेष. राजश्री केशव लिंगोजी स्वामीकडे पाठविले आहेत त्यास ते सविस्तर स्वामिपादांबुजी विनंती करितील त्यावरून सर्व अर्थ विदित होईल. फिरंगाणचा वर्तमान तर आरमार आले होते ते गोव्यास गेले. हाली फिरंग्याची सेना कुल गड कोट किले घोलीत (?) यावत: चेऊल तावत: दवण पावेतो बारासे आश्रा मायेतो माणसे सिबंदीस आहे. या वेगळे गावंकुठार[1] ठाण्यामध्ये मनुशे पचवीस सिबंदीची हमजात त्याची आहेत. यावेगळे भंडारी कासार पाचकलसे लोक सास्टीस मधी आहेत तितकेहि स्वामिपादांबुजे इछित आहेत. यैसियासीं हवेलागे सर्व म्हणतात जर वैशाख वद्यें येकादसीचें दिवसी दोन हजार हशम पनासें(क) जजाला जर आम्हास खरवेचे रानीं येतात तरी आम्ही खायेनखाये[2] सास्टी घेऊन देतो आणि च्यार कोट सास्टीमधे आहेत. वेसावे व वानदरे[3] व माहाले व तुरभे या चहू कोटाचे दोरे आणून हाती ठेविले आहेत. जे घटिकेस ठाणे घेतो ते घटकेस चार कोट फते करून देतांत. यास काडीयेक अन्येथा होणार नाहीं. अन्येथा जाली तरी छिरछेद करावा हा दंड. हालीं द्रवे

---

१ गांवदांडगे लोक, गांवांतले गुंड, लढवाई लोक. २ खामखा, निश्चयें,

३ वांदरे, वांद्रे. अनुनासिकाबद्दल किंवा अनुस्वाराबद्दल स्वतंत्र 'न' लिहीत. जसे जाऊन म्ह. जाऊं. करून म्ह. करूं. वानदरे म्ह. वांदरें वांद्रें, वगैरे.

करावे, त्यास अम्ही सातारियासी अलो. येथून लौकर निरोप होता दिसत नाही यामुळे ते कार्य प्रस्तुत राहिले. पुढे येथून पूर्णमेअलीकडे निरोप जाहाला तर स्वामीचे आज्ञेप्रमाणे ते कार्य करू. जर निरोप (न झाला तर) कार्य राहिले. स्वामीस कळावे यास्तव लिहिले असे. फिरंगाणच्या कार्यास अधी तो अम्हीच जावे हे उतम. कदाचित आमचे जाणे न होये तेव्हा राजश्री पिलाजी जाधवराऊ यासी तऱ्ही पाठवावे आणि कार्य करावे, तर आम्ही राजश्री स्वामीपासी गुंतलो व राजश्री पिलाजी जाधवराऊ यासी राजश्रीनी गोवलकोटास पाठवावयाचा मनसबा राजश्री[1] केला यामुळे मारनिलेस गोवलकोटास जाणे प्राप्त जाहाले. जातील. विदित जाहाले पाहिजे. आम्ही उभयेताहि लोकात नसता, लोक पाठऊन कार्य करवावे तर कार्य होईल नव्हे[2] हाहि भरवसा नाही व लोक, सरदार मातबर नसता मन घालून कार्य करितील यैसे नाही आणि उगेच डवचावे[3] यैसे होईल; यास्तव लोक पाठविता न येत. स्वामीस कळावे याकरिता लिहिले असे. बहुत[+] काये लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनंति.

¶*Chimaji Appa communicates to Bajirao that as per his instructions he could not proceed on the Portuguese campaign as he was detained at Satara by the King, nor could he send Pilaji Jadhao whom the King wished to depute to Gowalkot.*

---

*No. 23*] *[15-11-1735 ?*

पा छ ११ रजब

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती शेवक शंकराजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायेत छ १० रजबपावेतो स्वामीचे कृपादृष्टीकरून सेवकांचे वर्तमान येथास्थित असे विशेष. राघो नारायेण किले माहुलीहून आजी पुणियासी * * * * * * (क)र्णाजी सिंदे याणी सिवाजी[4] अणजोरकर यासमागमे पंनास माणूस देऊन फिरगाणात स्वारी करून फिरगाणची दोन कुले उदमी धरून आणिले येसे सांगितले. त्यास हे गोष्टी उतम केली नाहीं. येणेकरून टोपीकर[5] कल्याणप्रांतीहून गांव मारून नेईल आण त्याचा व आपला बिघाड

---

१ राजश्रीही, राजश्रीनी. २ न होई, न होईल. ३ फिरंग्यास.
+ अक्षर चिमाजीचे खुद. ४ गंगाजीचा भाऊ. ५ फिरंगी.

होईल. याकरितां हे गोष्टीचा काये विचार करावयाचा तो केला पाहिजे. आम्हास हे वर्तमान कलताच सेवेसी लिहून पाठविले आहे. व हाजिरी व जमादिलाखर महिन्याचा रोजमऱ्याची वाटणी आली ती सेवेसी पाठविली आहे व रजब महिन्याचा रोजमरा तेथील लोकांचा देविला पाहिजे. सेवेसी विदित होये हे विज्ञाप्ति.

*¶Shankraji Keshav Phadke complains to Chimaji Appa of the high-handed action of Karnaji Shindia who sent a raiding party into the Portuguese territory and captured two important personages. He is afraid, he says, the Portuguese may retaliate by attacking villages near Kalyan.*

---

*No. 24]* *[1734-1735?*

**श्री**

**पुरवणी श्रीमत राजश्री पंतप्रधान**
**स्वामीचे सेवेसी**

सेवक अंताजी रघुनाथ कृतानेक नमस्कार विनंती विसेष. राजश्री केशव लिंगोजी स्वामीकडे पाठविले आहेत त्यास ते सविस्तर स्वामिपादांबुजी विनंती करितील त्यावरून सर्व अर्थ विदित होईल. फिरंगाणचा वर्तमान तर आरमार आले होते ते गोव्यास गेले. हाली फिरंग्याची सेना कुल गड कोट किले घोलीत (?) यावत: चेऊल तावत: दवण पावेतो बारासे आश्रा मायेतो माणसे सिबंदीस आहे. या वेगले गावंकुठार[1] ठाण्यामध्ये मनुशे पचवीस सिबंदीची हमजात त्याची आहेत. यावेगले भंडारी कासार पाचकलसे लोक सास्टीस मधी आहेत तितकेहि स्वामिपादांबुजे इछित आहेत. यैसियासीं हवेलागे सर्व म्हणतात जर वैशाख वद्यें येकादसीचें दिवसी दोन हजार हशम पनासें(क) जजाला जर आम्हास खरवेचे रानीं येतात तरी आम्ही खायेनखाये[2] सास्टी घेऊन देतो आणि च्यार कोट सास्टीमधे आहेत. वेसावे व वानदरे[3] व माहाले व तुरभे या चहू कोटाचे दोरे आणून हाती ठेविले आहेत. जे घटिकेस ठाणे घेतो ते घटकेस चार कोट फते करून देतांत. यास काडीयेक अन्येथा होणार नाहीं. अन्येथा जाली तरी छिरछेद करावा हा दंड. हालीं द्रवे

---

१ गांवदांडगे लोक, गांवांतले गुंड, लढवाई लोक. २ खामखा, निश्चयें,

३ वांदरे, वांद्रे. अनुनासिकाबद्दल किंवा अनुस्वाराबद्दल स्वतंत्र 'न' लिहीत. जसे जाऊन म्ह. जाऊं. करून म्ह. करूं. वानदरे म्ह. वांदरें वांद्रें, वगैरे.

करावे, त्यास अम्ही सातारियासी अलो. येथून लौकर निरोप होता दिसत नाही यामुले ते कार्य प्रस्तुत राहिले. पुढे येथून पूर्णमेअलीकडे निरोप जाहाला तर स्वामीचे आज्ञेप्रमाणे ते कार्य करू. जर निरोप (न झाला तर) कार्य राहिले. स्वामीस कलावे यास्तव लिहिले असे. फिरंगाणच्या कार्यास अधी तो अम्हीच जावे हे उतम. कदाचित आमचे जाणे न होये तेव्हा राजश्री पिलाजी जाधवराऊ यासी तऱ्ही पाठवावे आणि कार्य करावे, तर आम्ही राजश्री स्वामीपासी गुंतलो व राजश्री पिलाजी जाधवराऊ यासी राजश्रीनी गोवलकोटास पाठवावयाचा मनसबा राजश्री[१] केला यामुले मारनिलेस गोवलकोटास जाणे प्राप्त जाहाले. जातील. विदित जाहाले पाहिजे. आम्ही उभयेताहि लोकात नसता, लोक पाठऊन कार्य करवावे तर कार्य होईल नव्हे[२] हाहि भरवसा नाही व लोक, सरदार मातबर नसता मन घालून कार्य करितील यैसे नाही आणि उगेच डवचावे[३] यैसे होईल; यास्तव लोक पाठविता न येत. स्वामीस कलावे याकरिता लिहिले असे. बहुत[+] काये लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनंति.

¶*Chimaji Appa communicates to Bajirao that as per his instructions he could not proceed on the Portuguese campaign as he was detained at Satara by the King, nor could he send Pilaji Jadhao whom the King wished to depute to Gowalkot.*

---

*No. 23*] *[15-11-1735 ?*

पा छ ११ रजब

**श्री**

**श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी**

विनंती शेवक शंकराजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायेत छ १० रजबपावेतो स्वामीचे कृपादृष्टीकरून सेवकांचे वर्तमान येथास्थित असे विशेष. राघो नारायेण किले माहुलीहून आजी पुणियासी * * * * * * (क)र्णाजी सिंदे याणी सिवाजी[४] अणजोरकर यासमागमे पंनास माणूस देऊन फिरगाणात स्वारी करून फिरगाणची दोन कुले उदमी धरून आणिले येसे सांगितले. त्यास हे गोष्टी उतम केली नाहीं. येणेकरून टोपीकर[५] कल्याणप्रांतीहून गांव मारून नेईल आण त्याचा व आपला बिघाड

---

१ राजश्रीही, राजश्रीनी. २ न होई, न होईल. ३ फिरंग्यास.
+ अक्षर चिमाजीचे खुद्द. ४ गंगाजीचा भाऊ. ५ फिरंगी.

होईल. याकरितां हे गोष्टीचा काये विचार करावयाचा तो केला पाहिजे. आम्हास हे वर्तमान कलताच सेवेसी लिहून पाठविले आहे. व हाजिरी व जमादिलाखर महिन्याचा रोजमऱ्याची वाटणी आली ती सेवेसी पाठविली आहे व रजब महिन्याचा रोजमरा तेथील लोकांचा देविला पाहिजे. सेवेसी विदित होये हे विज्ञाप्ति.

*¶Shankraji Keshav Phadke complains to Chimaji Appa of the high-handed action of Karnaji Shindia who sent a raiding party into the Portuguese territory and captured two important personages. He is afraid, he says, the Portuguese may retaliate by attacking villages near Kalyan.*

---

*No. 24]* *[1734-1735 ?*

श्री

पुरवणी श्रीमत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

सेवक अंताजी रघुनाथ कृतानेक नमस्कार विनंती विसेष. राजश्री केशव लिंगोजी स्वामीकडे पाठविले आहेत त्यास ते सविस्तर स्वामिपादांबुजी विनंती करितील त्यावरून सर्व अर्थ विदित होईल. फिरंगाणचा वर्तमान तर आरमार आले होते ते गोव्यास गेले. हाली फिरंग्याची सेना कुल गड कोट किले घोलीत (?) यावत: चेऊल तावत: दवण पावेतो बारासे आश्रा मायेतो माणसे सिबंदीस आहे. या वेगले गावंकुठार[१] ठाण्यामध्ये मनुशे पचवीस सिबंदीची हमजात त्याची आहेत. यावेगले भंडारी कासार पाचकलसे लोक सास्टीस मधी आहेत तितकेहि स्वामिपादांबुजे इछित आहेत. येसियासीं हवेलागे सर्व म्हणतात जर वैशाख वद्यें येकादसीचें दिवसी दोन हजार हशम पनासें(क) जजाला जर आम्हास खरचेचे रानीं येतात तरी आम्ही खायेनखाये[२] सास्टी घेऊन देतो आणि च्यार कोट सास्टीमधे आहेत. वेसावे व वानंदरे[३] व माहाले व तुरभे या चहू कोटाचे दोरे आणून हाती ठेविले आहेत. जे घटिकेस ठाणे घेतो ते घटकेस चार कोट फते करून देतांत. यास काडीयेक अन्येथा होणार नाहीं. अन्येथा जाली तरी छिरछेद करावा हा दंड. हालीं द्रवे

---

१ गांवदांडगे लोक, गांवांतले गुंड, लढवाई लोक. २ खामखा, निश्चयें,

३ वांदरे, वांद्रे. अनुनासिकाबद्दल किंवा अनुस्वाराबद्दल स्वतंत्र 'न' लिहीत. जसे जाऊन म्ह. जाऊं. करून म्ह. करूं. वानदरे म्ह. वांदरें वांद्रें, वगैरे.

सास्टामध्ये म्हणाल तरी पंचवीस लक्ष रुपये हे नून्येपदार्थे[1] स्वामीचे पदरीं पडतील, येकसे सतावन गाव त्याचे बगेत[2] जात आहे तीं पाहाणे. बंदर आठ हातास येतात. अखिल पद प्राप्त होत येैसे असता कौन्ही हितछेत्रू[3] स्वामीस कितेक प्रकार झूटा म्हणोन संबोधन करितील, त्यास स्वामीही आपली मनुश पाठऊन हव लाग वाट व सधनता पाहिलीच आहे, येैसे आसता संपूर्ण निशा नसली जाली तरी पुन्हा आपली विस्वासी सभे माणसे पाठऊन हवा लाग वाट खाडीचा उतार व भेदल्या लोकाची बोलीचाली व कोटाचे भट (?) मनास आणून सत्ये असेल तरी व द्रव्याची प्राप्ती आम्ही लिहिल्याप्रमाणें सत्ये असले तरी कार्यभागी[4] चित ठेऊन करा आणि नसले किंवा काहीयेक लटके असले तरी रंकास दंड जो चितास येईल तो करा. आणि उगच झुटादोरा ठेऊन आम्हास श्रमी करिता आणि विनोदवाद लटके म्हणोन तुमचे सर्व कर्ते पुरुष म्हणतात आणि सर्वे प्रकारे आमचा नाष होतो. व काही देता उपहाश्यामधे घालोन आमचे अदृष्टे ठेविले असे. याउपरी मनुसुबा द्रव्यावेगला होत नाही म्हणून कोन्ही विचार करिती त्यास रंकाची विज्ञापना यैसीजे येक आपले दाहा हुजरें आम्हाकडे पाठऊन द्यावे त्यास आमचे हवे लागे म्हणतात की च्यार कुले आम्ही लक्षा रुपयाची धरून रात्रसमई सिंदगडास आणून देऊन. त्याजकडून लक्ष रुपया विनाश्रमी निघे तो विचार साध्य करून देऊन. हेच सतेमिथ्ये पाहाणे असले तरी कोन्हास न कलता दाहा हुजरे (पाठऊन दिधलियाने) येका महिन्यामधे लक्ष रुपया चोरीने पदरी पाडोन देऊन. हे करणे जाले तरी कल्याणच्या सुभ्यासहि कलून देऊ नये. हेही गोष्ट चितास न ये तरी हवे लागे आणि रंक या आम्हा समस्तास निरोप देणे. ह्याच पत्राच्या प्रतिउतरी निरोप जाल्यानी हेच उर्जित महद्भाग्ये म्हणोन, कोठेहि जाऊन कालक्षय करोन. आमच्याने उपोशणे व कितीक अपमान हे सोचेत[5] नाही. कृपालोभ असो दीजे हे विनंती. छ २३ माहे रमजान.

*¶Antaji Raghunath gives to the Peshwa the news of the Portuguese ships having gone back to Goa. The writer asks for a reinforcement of two thousand strong and fifty field-pieces with whose help, he says, he will reduce the four forts of Salsette. He further assures the Peshwa of a possibility of raising money upto 25 lacs from the province of Salsette.*

---

१ किमानपक्ष, कमींतकमी. २ ताब्यांत, हातांत (?)
३ वासुदेव जोशी वगैरेस उद्देशून. ४ मसलतीवर.
५ सोसत.

*No. 25*] [*1736?*

पौ छ १६ सवाल.

श्री

पुरवणी राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. फिरंगाणचा विचार आलाहिदा पत्रीं लिहिला आहे त्यावरून कळेल. सारांश या मनसब्यास द्रव्यव्यय आहे, आणि स्वामीचा विचार तों येंदा वोढीचा प्रसंग आहे, आणि हे गोष्टी जाहालियावरी, फिरंगी व इंग्रेज व शामल त्रिवर्ग येक होऊन कजिया करितील तेव्हां शिबंदीसी गांठ. कर्ज काहाडून शिबंदीस देऊन कजिया करणें लागेल ऐसा विचार आहे. ईश्वर इच्छेनें कार्य साध्य जाहालें तरी उत्तम, नाहीं तरी गोष्टी भारी पडेल ऐसा विचार आहे. पुरता विचार करून करणें तें करावें. बहुत काय लिहिणें? लोभ केला पाहिजे हे+ विनंती.

¶*Chimaji Appa is asked to launch campaign against the Firangis only after mature consideration. The campaign will entail heavy expenses which will be very telling in these straitened times.*

---

*No. 26*] [*1737?*

श्री

श्रीमत राजश्री आपा
साहेब स्वामीचे सेवेसी

सेवक लखमोजीराऊ खानविलकर व विठोजी कदम चरणावरी मस्तक ठेऊन रामराम विनंती ऐसे जे. स्वामीने तोफा देऊन रवाना केले ते वानरेंच्या तल्यावरी मुरचे घातले. त्यावरी राजश्री खंडोजी माणकर याही सांगितले की पुढे मोरचा घाला त्यावरून पुढे मोरचा घातला आणि तोफ लागू करून मार देत असो. चाकरी पाहावया हुजऱ्या येक पाठऊन चाकरी पाहाणार धनी आहेत हे ज्ञापना.

¶*Lakhmoji Khanvilkar has erected batteries near the Bandra lake and has egun the bombardment.*

---

+ पत्रलेखक वासुदेव जोशी.

No. 27] [1737 or 1738

श्री

सेवेसी विनंती. घोडबंदरी दाहा हजार मुडें[1] भात आहे. ते. फिरंगी घेऊन येऊ लागला आहे म्हणून वर्तमान आहे. यैशास तेथे जमाव पाठऊन तेथील भात फिरंग्यांचे हातास नव जाये ते करणार स्वामी समर्थ आहेत. वसईचा नाका धारावी जागा आहे. तो जागा मजबूद होये यैसा विचार केला पाहिजे. धारावीस दाहा तोफा ठेऊन वसईवरी लागू केलिया वसई हात बांधोन येईसारिखे आहे. यैशास धारावीचा कोट बांधावयासी पाथरवट बेलदार इस्तोत[2] सर्व साहित्य करून कोट होये ते करणार स्वामी समर्थ आहेत. कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*This is a request for arranging for the repairs of the fort of Dharavi whence Bassein can very easily be reduced and for preventing rice-granaries at Ghodbandar falling into the hands of the Portuguese.*

---

No. 28] [14-1-1737?

छ २२ रमजान

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. काली छ ९ रमजानी मुबैहून येक ब्राह्मण आला. त्याणे बातमी सांगितली व बेलापुराहून राजश्री नारायेण[3] जोशी यांणीहि वर्तमान लेहून पाठविलें की फिरंगियाचे अरमार पसतीस तरांडी यत आहेत. त्यामध्यें पांच थोर व दाहा मध्यम पाल तावडे मिलोन याखेरीज वरकड लाहानें येकूण पस्तीस तरांडी आहेत. परंतु त्यामध्यें काही सावकारीहि असतील. पहिली सत्रा तरांडी वसईच्या बान्यावरी आली आहेत. तीहि याच पस्तिसापैकीं आली. बाकी राहिलीं तीं सावकारी असिलीं तरी मुबैस राहिलीं असतील; व अरमारी असिली त: मागाहून येतील. मागाहोन लिहोन पाठऊ. बहुत काये लिहिणें हे विनंत सुवर्णदुर्गाहून यक ब्राह्मण आला त्याणेंहि बातमी सांगितली की सुवर्णदुर्ग

---

१ कणिंग. २ साहित्य, सामुग्री. ३ वासुदेव जोशाचा जेष्ठ बंधू.

नजीक फिरंगियाची सत्रा गलबतें पाणी भरावयास लागलीं होती. पाणी भरून उपेर[१] आलीं. मागाहून वर्तमान अढळेल ते लेहून पाठऊ. बहुत[+] काये लिहिणें ? लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंती.

¶*Chimaji Appa is informed of the arrival of some thirty Portuguese men-of-war at Bassein.*

---

*No. 29*] [?

रामाजी माहादेव

**श्री**

**पुा श्रीमंत राजश्री आपा**
**स्वामीचे सेवेसी**

विज्ञापना ताा छ २१ सवालपावेतों क्षेम असे. यानंतर राा खंडोजी माणकर व राा खंडोपंत व राा नारोजी कडू घोडबंदरास गेले होते तेथून वेसावेयास जावयाचा निश्चय करून आम्हास पत्र छ १८ सवाली साइंकाली पाठविले जे तोफा ४ सरंजाम सुधा बाा लोक कोटकरी वगैरा लोक घेऊन घोडबंदरास येणे म्हणून पत्र आले. त्यावरून कोटातील बंदोबस्ती राजश्री भवानजी कदमराऊ हवालदार व कृष्णाजी विठल सबनीस व सिदोजी गाडे व सिवाजी दादजी (बावजी ? ) व तिमाजी पवार (?) यांस ठेविले आणि बाहेर चेदणीकडेस राा रामोजी कडू याचे स्वार व संताजी नाा मनवर यांजबरोबरी राजखानाचा जमावसुधा देऊन चेदणीकडेस ठेविले. फतेबुरुजाकडेस सेलाराचे राऊत व साबाजी तिमाजी याचे राऊत पंनास आले ते येसें व येसजी सिंदे यास ठेविले आणि तोफा गलबतावरी घालून आम्ही जमावसुधा घोडबंदरास गेलो. छ १९ सवाली साइकालीचे निघोन गेलो. छ मजकुरी दोन प्रहरपावेतों मालाडानजीक तोफा थोर १ व लाहान पंचरसी १ येकून दोन नल्या दोन बाकी दोन तोफा घोडबंदरी ठेविल्या आहेत. उदैक साइकालपावेतो तोफा ठिकाणास जाऊन स्वामीचें पुण्यप्रतापें करून गनिमाचे ठाणे फते होईल. आगोधर छ २० सवालीं राा खंडोजी माणकर जमावसुधा जाऊन वेसावेयावरी थडकले परंत काम कारागिरी नव्हे, तोफेविना प्रयास लागेल याज-निमित्य कस्त करून तोफा नेणे लागल्या. तोफा लागू जाहाल्यानें काम खामखा होईल. यानंतर खासबारदाराचा रोजमरा रमजानचा दर आाा रुपये चार प्राा

---

१ उत्तरेकडे किंवा किनाऱ्याकडे; येथे वर उत्तरेकडे असाच अर्थ दिसतो.

\+ पत्रलेखक वासुदेव जोशी.

पावले. बाकीचा यैवज देत नाहीत आणि सवालचा निमेमाहे देऊ म्हणतात आधिक महिनियाची आडिसेरी घोडबदरचा लोकास मात्र पावली. येथे खासबारदारास वगैरे लोकास अडिसेरी दिली नाही. रोजमरेयाविना लोकानी गवगवा केला. काम निकडीचे लागले आहे तरी स्वामी कृपाळु होऊन रोजमरेयाचा यैवज देवणार स्वामी समर्थ आहेत. छ १९ सवाली मेढाचे काम लाविले. गगनबुरुज भरबुरुज जाहाला व हणमंत बुरुजाचे काम चालतच आहे; दरवाज्यांची लादणी जाहाली. पाणबुरुज बहुतयेक[1] पाडिला थोडका राहिला तोहि पडेल. लोक लाविले आहेत. यानंतर नागोजी मयाचे घरीहून पत्र आले की खर्चाची बहुत वोढ आहे तरी स्वामीनी कृपाळु होऊन याचे घरचे बेगमीस रुपये २५ पंचवीस देवणार स्वामी समर्थ आहेत. याउपरी भिवजी जाधव खासबारदार सोनजी धनवडे याजवळ आहे. त्याचे लग्न माघ वद्य पंचमीस नेमस्त केले आहे. त्यास स्वामीनी कृपाळू होऊन लग्नाची बेगमी करून रजा देवणार स्वामी समर्थ आहेत. याचे लग्न नेमस्त केले यास्तव सेवेसी लिहिले आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

*¶Chimaji Appa is informed of the progress of things at Vessava and Ghodbandar especially with a view to reducing the fort and holding the enemy in check. Further he is requested to sanction funds for the payment of dues to the men in army.*

---

*No. 30*] [*17-2-1737 ?*

पो छ ८ रमजान.

**पुरवणी श्रीमंत राजश्री पंतपधान**
**स्वामीचे सेवेसी**

विनंती उपरी. वसईचे जरालानें ब्राह्मण बारा रुपये महिना करून आपणांकडे बातमीकरितां पाठविला आहे. गुजराथीं ठेंगणा गळा रुद्राक्षाची माळ आहे. कृश आंगी आहे म्हणोन येकानें वर्तमान सांगितलें. तरी आपण बोभाट न होये यैसे तजविजेनें जमाव करावा हे[+] विनंती.

*¶Bajirao Ballal is informed about a certain Brahmin employed as a spy by the General of Bassein to gather news.*

---

१ बहुतेक.

\+ चिठ्ठी वासुदेव जोशाची.

२९

स्थळ प्रत
सं. ......... नं.
ता. ........

No. 31] [17-2-1737

पो छ ८ रमजान

श्री

पुरवणी राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. तीर्थस्वरूप राजश्री नारायेण जोसी याचें पत्र चेवलाहून आजी आलें. त्याची नकल पाठविली आहे त्यावरून विदित होईल. फिरंगी याची बोलीचाली होत आहे परंतु मसीद सोडावी ऐसे फिरंगी याचे मानस दिसत नाहीं. त्यास आमचे विचारें प्रस्तुत कार्य[1] करणें, तेव्हां सला करूं नये बोलीचालीवर घालावें आणि इकडे भोंक पाडावें. याप्रमाणे आपले विचारास येईल तरी चेवलास लेहून लांबणीवर घालावें. बहुत काय लिहिणें हे विनंती. अणजूरकरास कर्जदार[2] उपद्रव करिता(त); त्यास ताकीद करणें म्हणोन लिहिलें तरी त्यास कोणी गोष्टीचा उपद्रव लागणार नाहीं व स्वामीनी लिहिलें कीं राजश्री अंताजी रघुनाथ याचे लोक जमा करवणे, त्यासहि सांगितलें आहे व अणजूरकरासहि सांगितलें आहे. त्यासी समाधानाच्या गोष्टी बोलावयाच्या त्या बोलतच आहों. थोडे बहुत खर्चास देऊन आज्ञेप्रमाणे उमेदवार राखलेच आहेत. कळले पाहिजे हे[+] विनंती.

¶*It has been reported to Bajirao Ballal that the negotiations are opened, but the Portuguese are not willing to make over the fort Masjid. Efforts are being made to persuade Antaji Raghunath and Gangaji Naik to collect army to meet the threatening situation.*

---

No. 32] [17-2-1737

पो छ ८ रमजान

श्री

यादी येणे प्रमाणे लोक स्वामीजवळ आहेत त्यांतून निवडून काढावे

४०० किले पुरंधर येथील नेमणूक लोक ७०० पैकीं

१५० किले लोहगड नेमणूक २५० पैकीं

१०० किले कोरीगड नेमणूक २००

२५ किले घनगड

---

१ फिरंग्यावर मोहीम. २ सावकार. + लेखक वासुदेव जोशी.

पावले. बाकीचा यैवज देत नाहीत आणि सवालचा निमेमाहे देऊ म्हणतात आधिक महिनियाची आडिसेरी घोडबदरचा लोकास मात्र पावली. येथे खासबारदारास वगैरे लोकास अडिसेरी दिली नाही. रोजमरेयाविना लोकानी गवगवा केला. काम निकडीचे लागले आहे तरी स्वामी कृपालु होऊन रोजमरेयाचा यैवज देवणार स्वामी समर्थ आहेत. छ १९ सवाली मेढाचे काम लाविले. गगनबुरुज भरबुरुज जाहाला व हणमंत बुरुजाचे काम चालतच आहे; दरवाज्यांची लादणी जाहाली. पाणबुरुज बहुतयेक[१] पाडिला थोडका राहिला तोहि पडेल. लोक लाविले आहेत. यानंतर नागोजी मयाचे घरीहून पत्र आले की खर्चाची बहुत वोढ आहे तरी स्वामीनी कृपालु होऊन याचे घरचे बेगमीस रुपये २५ पंचवीस देवणार स्वामी समर्थ आहेत. याउपरी भिवजी जाधव खासबारदार सोनजी धनवडे याजवल आहे. त्याचे लग्न माघ वद्य पंचमीस नेमस्त केले आहे. त्यास स्वामीनी कृपाळु होऊन लग्नाची बेगमी करून रजा देवणार स्वामी समर्थ आहेत. याचे लग्न नेमस्त केले यास्तव सेवेसी लिहिले आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Chimaji Appa is informed of the progress of things at Vessava and Ghodbandar especially with a view to reducing the fort and holding the enemy in check. Further he is requested to sanction funds for the payment of dues to the men in army.*

---

*No. 30*] *[17-2-1737 ?*

पो छ ८ रमजान.

**पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान**
**स्वामीचे सेवेसी**

विनंती उपरी. वसईचे जरालानें ब्राह्मण बारा रुपये महिना करून आपणांकडे बातमीकरितां पाठविला आहे. गुजराथीं ठेंगणा गळा रुद्राक्षाची माल आहे. कृश आंगी आहे म्हणोन येकानें वर्तमान सांगितलें. तरी आपण बोभाट न होयें यैसे तजविजेनें जमाव करावा हे[+] विनंती.

¶*Bajirao Ballal is informed about a certain Brahmin employed as a spy by the General of Bassein to gather news.*

---

१ बहुतेक. + चिठ्ठी वासुदेव जोशाची.

No. 31] [17-2-1737

पो छ ८ रमजान

श्री

पुरवणी राजश्री पंतप्रधान
स्वामींचे सेवेसी

विनंती उपरी. तीर्थस्वरूप राजश्री नारायेण जोसी याचें पत्र चेवलाहून आजी आलें. त्याची नकल पाठविली आहे त्यावरून विदित होईल. फिरंगी याची बोलीचाली होत आहे परंतु मसीद सोडावी यैसे फिरंगी याचे मानस दिसत नाहीं. त्यास आमचे विचारें प्रस्तुत कार्य[1] करणें, तेव्हां सला करूं नये बोलीचालीवर घालावें आणि इकडे भोंक पाडावें. याप्रमाणे आपले विचारास येईल तरी चेवलास लेहून लांबणीवर घालावें. बहुत काय लिहिणें हे विनंती. अणजूरकरास कर्जदार[2] उपद्रव करिता(त); त्यास ताकीद करणें म्हणोन लिहिलें तरी त्यास कोणी गोष्टीचा उपद्रव लागणार नाहीं व स्वामींनी लिहिलें कीं राजश्री अंताजी रघुनाथ याचे लोक जमा करवणे, त्यासहि सांगितलें आहे व अणजूरकरासहि सांगितलें आहे. त्यासी समाधानाच्या गोष्टी बोलावयाच्या त्या बोलतच आहों. थोडे बहुत खर्चास देऊन आज्ञेप्रमाणे उमेदवार राखलेच आहेत. कलले पाहिजे हे[+] विनंती.

¶*It has been reported to Bajirao Ballal that the negotiations are opened, but the Portuguese are not willing to make over the fort Masjid. Efforts are being made to persuade Antaji Raghunath and Gangaji Naik to collect army to meet the threatening situation.*

---

No. 32] [17-2-1737

पो छ ८ रमजान

श्री

याादी येणे प्रमाणे लोक स्वामीजवल आहेत त्यांतून निवडून काढावे

४०० किले पुरंधर येथाल नेमणूक लोक ७०० पैकीं

१५० किले लोहगड नेमणूक २५० पैकीं

१०० किले कोरीगड नेमणूक २००

२५ किले घनगड

---

१ फिरंग्यावर मोहीम. २ सावकार. + लेखक वासुदेव जोशी.

३९ किले नारायण गड
५० लक्ष्मणराव पासलकर व आबाजी दळवी सरनोबत किले कोहजगड हे घरीं बसले आहेत त्यास आणावें. ते मर्दाने आहेत
७०० राजपुरीकर मोकासी अजमासें
२०० मोरोजी सिंदे व आबोजी सावंत वगैरे हशम
१००० रघुनाथ दळवी वगैरे स्वामीजवळ आजमासें देखील कर्णाटकी मो पुणें व बराबर शंकराजीपंत.

२६५०
३०० बाणकोट नेमणूक ८०० पैकीं
३०० होनाजी बलकवडे याजकडील
३०० खंडोजी माणकर

३५५०

येणेप्रमाणे लोक आणून सिध करावे व गड किले रोखोन याप्रमाणे स्वारीस आणवावे. यापैकीं कांहीं लोक राजकोटास गुंतले आहेत ऐसें स्वामीच्या चित्तांत येईल तरी च्यार रोज आगोदर पांचसें माणूस व तीनसें स्वार तेथें ठेऊन बाकी फौज रात्रीची काहाडून उंबरखिडीचें रोखे आणून त्या मार्गें इकडे आणावी. या प्रमाणें राजकोटास लेहून सिधता मात्र करावी. लोक कोठें फर्को देऊं नयेत. आम्ही जो दिवस नेमून सांगून पाठऊं ते समई त्याणी यावें. बोभाट न होये तें करावें. ठाणियाचे राजकारणास दोन हजार माणूस चोरीनें आलें पाहिजे. राऊताचा जमाव दुसरे दिवसीं पाठीवर आले कामास येईल. लोक आणावयास कारकून पाठवितो तो युक्तीनें मजलीची मजल घेऊन येईल. मलंग गडचे रानांत सोंट घेऊन तेथून कार्यसिधी करून. तरी अविलंबें लोक जमा करावे. कागदीपत्रीं बोभाट न करावा. राजकोटास कारकून कोण्ही पाठऊन याप्रमाणे लोक सिध करावे हे विनंती.

¶*Directions for the mobilization of the army and its movements to reach Thana are given in detail. All these preparations should be effected with utmost secrecy.*

---

१ दबा? तरतूद?

लेखक:—वासुदेव जोशी. पत्र चिमाजी आपास.

*No. 33*] [*28-3-1737?*

छ ७ जिल्हेज

**श्री**

सेवेसी विनंती. कृष्णाजी रत्नाजीराव येरूणकर याचे लोक जंजिरे अर्नालियास पाठविले आहेत त्यास सांगितले की जंजिरे मजकुरी काम करणें. तुम्ही राज्यातील लोक. ज्याप्रमाणे सर्व लोक जंजिरे मजकुरी काम करितात त्याप्रमाणे तुम्ही सर्व लोकास सांगोन इमारतीचे काम करवणे आणि खावंदाजवळी आपला मुजरा करून घेणे. जे गोष्टीने धणी बरे म्हणत ते करणे म्हणून कितेक प्रकारे सांगितले. परंतु काम करीत नाहीत. तरी स्वामीनी दोन हुजरे पाठऊन त्याजवल बसून काम घेत येसे करावे. पत्रहि त्यास बरेवेंजेने[१] ल्याहावे. कलावे याकरिता लिहिले असे हे[+] विज्ञापना.

¶*Letter probably to Chimaji Appa to warn the men not to proceed carelessly with the work of the fort.*

---

*No. 34*] [*1737*

पो छ २९ जिलकाद

**श्री**

**श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी.**

पोष्य वासुदेव जोशी कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ २१ जिलकाद मुकाम कुलगांव जाणून स्वकीय लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीनी आज्ञा केली कीं कल्याणास जाऊन राजकारण ठीक करून राा अंताजीपंत व गंगाजी नाईक व भिकाजी नाईक या त्रिवर्गास पाठवावे. त्यास आम्ही स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जाहालों ते राजमाचीस आलों. राजमाचीहून छ १९ जिलकादी स्वार जाहलो ते मौजे दहीवली ताा नीड पाा नसरापूर येथे आलों. तेथें भिकाजी नाईक भेटले. त्यास त्रिवर्गाचा विचार मनास आणून पाठवावे यास्तव भिकाजी नाईक यास समागमे घेतले. त्यास मार्गी नेरळाजवळी राा अंताजीपंत भेटले. त्यासहि घेऊन मौजे कुलगावास आलों. गंगाजी नाईक कल्याणास होते. त्यांस रातोरात बोलाऊन आणून बोली मनास आणून अंताजीपंत व भिकाजी नाईक यास स्वामीकडे पाठविले आहे. हे सविस्तर सांगतां कळेल. गंगाजी

---

१ बरेतऱ्हेनें, समज देऊन. +लेखकः—शंकराजी केशव.

नाईक यास कल्याणास नेले. यासहि मागाहून दो चौ दिवसा पाठवितों. कळावें याकरितां लिहिले असे. मागाहोन सविस्तर लिहोन पाठऊं. बहुत काय लिहिणे. लोभ करीत गेले पाहिजे हे विनंती.

¶*Wasudeo Joshi writes to the Peshwa that as per his instructions he managed to meet Antajipant, Gangaji Naik and Bhikaji Naik and consulted them in connection with the political situation in Konkan.*

---

*No. 35*] [?

छ ८ जिल्हेज

**श्री**

पुरवणी श्रीमंत राजश्री
आपा स्वामीचे सेवेसी

विनंती विशेष. तांदुळवाडीस इमारतीचे काम चालीस लाविले आहे. दोन लोहाराची दुकाने राजश्री बरवाजी पाटील यास लिहून तांदुळवाडीस पाठवावयाची आज्ञा केली पाहिजे. सेवेसी विदित होये हे विज्ञापना.

¶*Shankraji Keshav Phadke asks two blacksmiths from Chimaji Appa to be sent to Tandulwadi.*

---

*No. 36*] [?

**श्री**

सेवेसी विनंती. पोष्य विस्वासराऊ कृस्ण कृतानेक सां नमस्कार विज्ञापना यैसीजे. आज्ञेप्रमाण रा शंकराजीपंताच्या मोरच्याकडे खाडीपलाड आहोत. आजची सेवा परस्परे सेवेसी श्रुत जाहली असेल. पुढे या स्थली असोन. सेवा कोणा पुढे करावी? हशाम लोक निवडून संपूर्ण इकडून नेले. जुजंगल[१] कोन्ही राहिले. आपण व सितोले ढमढेरे च्यार पतके आहो. पुढे खाडी आणि किला मातबर. मार दुतर्फा, एक आरमाराचा एक किल्याचा. एसियास चिती उत्तर्कर्श[२] कीं दृष्टीपुढे सेवा करावी. अशयास अज्ञा करणार स्वामी समर्थ. आज्ञेप्रमाण वर्तणूक करुनं[३]. हे विज्ञप्ति.

¶*Vishvasrao Krishna describes how he is hemmed in between the creek and the fort, being made subject for attack from both.*

---

१ जुजबी (?)  २ ईर्षा, महत्त्वाकांक्षा.  ३ येथून अक्षराचें वळण निराळें.

No. 37] [28-7-1737?

छ ७ जिल्हेज

श्री

सेवेसी विनंती. स्वामीनी छ ४ जिल्हेजची पत्रे पाठविली. आजीच छ ६ जिल्हेजी प्रात:काळचे साहा घटका दिवसास पावली. जंजिरे आरनालियाचे काम इमारतीचे पके करीन म्हटल्यास दिवसगती लागेल याकरिता कोरे[१] काम करावे येसे आमचे विचारे आहे. त्यास तुमचे विचारे काय ते लेहून पाठवणे म्हणून लिहिले. त्यास स्वामीनी लिहिले हे येथार्थच आहे. त्यास आम्ही येका दो दिवसानी जंजिरे आरनालियास जातो. त्यास बुरजाचे काम तो पकेच केले पाहिजे व करीतहि असो. वरकड फांजीचे[२] काम तरी सर्वांचे विचारे मनास आणून चुन्याकारिता काम तटेसे असिले तरी कोरे कामास प्रारंभ कारितो, बाहेरून थोर दगड व आतून लहान दगड याप्रकारे लावून काम करवितो आणि स्वामीस लेहून पाठवितो. कळावे याकरिता लिहिले असे चुना न पुरे म्हणोन लोक पुढे रिकामे ठेवितो येसे नाही. दोन मास वावदलास[३] सुटावयास लागतील तोपर्यंत जागा राखतोच राखतो. स्वामीनी त्या जागियाची चिंता न करावी. पावसकाम सा महिने कोरेच काम चालऊन पुढे मागती टोपीकर सराईस (?) फौज पुर्तकाळेची घेऊन येईल तों कोरे पक्के होईल ते करीतच आहो. सारांश माणूस रिकामे राहून काम कोरे न करून हे सहसा होणार नाही. जितकी इमारत ताबडतोड उठेल ती कार्याचीच आहे. सेवेसी विदित होये हे विज्ञापना.+

¶*Shankraji Keshav gives his opinion as to how the work of the fort at Arnala should be effected. He insists on having the whole edifice built on a strong and permanent basis. The bastions that have to bear the brunt of the enemy's fire cannot afford to be erected out of bad material.*

---

No. 38] [29-3-1737?

पो छ ८ जिल्हेज

श्री

सेवेसी विनंती. मुंबईहून आजी एक गृहस्थ आला त्याणी वर्तमान सांगितले कीं ठाणियाचे वर्तमान व भेदभाद सर्व राजश्री अंताजी रघुनाथ, वानरेयाचे

---

१ कच्चें. (?) २ भिंतीचें. ३ वादळास.

+ लेखक:—शंकराजी केशव. चिमाजीस पत्र.

नाईक यास कल्याणास नेले. यासहि मागाहून दो चौ दिवसा पाठवितों. कळावें याकरितां लिहिले असे. मागाहोन सविस्तर लिहोन पाठऊं. बहुत काय लिहिणे. लोभ करीत गेले पाहिजे हे विनंती.

¶*Wasudeo Joshi writes to the Peshwa that as per his instructions he managed to meet Antajipant, Gangaji Naik and Bhikaji Naik and consulted them in connection with the political situation in Konkan.*

---

*No. 35*] [?

छ ८ जिल्हेज

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री
आपा स्वामीचे सेवेसी

विनंती विशेष. तांदुळवाडीस इमारतीचे काम चालीस लाविले आहे. दोन लोहाराची दुकाने राजश्री बरवाजी पाटील यास लिहून तांदुळवाडीस पाठवा-वयाची आज्ञा केली पाहिजे. सेवेसी विदित होये हे विज्ञापना.

¶*Shankraji Keshav Phadke asks two blacksmiths from Chimaji Appa to be sent to Tandulwadi.*

---

*No. 36*] [?

श्री

सेवेसी विनंती. पोष्य विस्वासराऊ कृस्ण कृतानेक सां नमस्कार विज्ञापना येसीजे. आज्ञेप्रमाण रा शंकराजीपंताच्या मोरच्याकडे खाडीपलाड आहोत. आजची सेवा परस्परे सेवेसी श्रुत जाहली असेल. पुढे या स्थली असोन. सेवा कोणा पुढे करावी? हशाम लोक निवडून संपूर्ण इकडून नेले. जुंजगल[१] कोन्ही राहिले. आपण व सितोले ढमढेर च्यार पतके आहो. पुढे खाडी आणि किला मातबर. मार दुतर्फा, एक आरमाराचा एक किल्याचा. एसियास चिती उत्तकेर्श[२] कीं दृष्टीपुढे सेवा करावी. अशयास अज्ञा करणार स्वामी समर्थ. आज्ञेप्रमाण वर्तणूक करुनें[३]. हे विज्ञप्ति.

¶*Vishvasrao Krishna describes how he is hemmed in between the creek and the fort, being made subject for attack from both.*

---

१ जुज्वी (?) २ ईर्षा, महत्त्वाकांक्षा. ३ येथून अक्षराचें वळण निराळें.

No. 37] [28-7-1737 ?

छ ७ जिल्हेज

श्री

सेवेसी विनंती. स्वामीनी छ ४ जिल्हेजची पत्रे पाठविली. आजीच छ ६ जिल्हेजी प्रात:कालचे साहा घटका दिवसास पावली. जंजिरे आरनालियाचे काम इमारतीचे पके करीन म्हटल्यास दिवसगती लागेल याकरिता कोरे[1] काम करावे येसे आमचे विचारे आहे. त्यास तुमचे विचारे काय ते लेहून पाठवणे म्हणून लिहिले. त्यास स्वामीनी लिहिले हे येथार्थच आहे. त्यास आम्ही येका दो दिवसानी जंजिरे आरनालियास जातो. त्यास बुरजाचे काम तो पकेच केले पाहिजे व करीतहि असो. वरकड फांजीचे[2] काम तरी सर्वाचे विचारे मनास आणून चुन्याकारिता काम तटेसे असिले तरी कोरे कामास प्रारंभ करितो, बाहेरून थोर दगड व आतून लहान दगड याप्रकारे लावून काम करवितो आणि स्वामीस लेहून पाठवितो. कलावे याकरिता लिहिले असे चुना न पुरे म्हणोन लोक पुढे रिकामे ठेवितो येसे नाही. दोन मास वावदलास[3] सुटावयास लागतील तोपर्यंत जागा राखतोच राखतो. स्वामीनी त्या जागियाची चिंता न करावी. पावसकाम सा महिने कोरेच काम चालऊन पुढे मागती टोपीकर सराईस (?) फौज पुर्तकालेची घेऊन येईल तों कोरे पक्के होईल ते करीतच आहो. सारांश माणूस रिकामे राहून काम कोरे न करून हे सहसा होणार नाही. जितकी इमारत ताबडतोड उठेल ती कार्याचीच आहे. सेवेसी विदित होये हे विज्ञापना.+

¶*Shankraji Keshav gives his opinion as to how the work of the fort at Arnala should be effected. He insists on having the whole edifice built on a strong and permanent basis. The bastions that have to bear the brunt of the enemy's fire cannot afford to be erected out of bad material.*

---

No. 38] [29-3-1737 ?

पो छ ८ जिल्हेज

श्री

सेवेसी विनंती. मुंबईहून आजी एक गृहस्थ आला त्याणी वर्तमान सांगितले कीं ठाणियाचे वर्तमान व भेदभाद सर्व राजश्री अंताजी रघुनाथ, वानरेयाचे

---

१ कच्चें. (?) २ भिंतीचें. ३ वादळास.

+ लेखक:—शंकराजी केशव. चिमाजीस पत्र.

फिरंगियास सांगोन पाठवितो येसे सांगितले, त्यावरून सेवेसी लिहिले आहे. तरी त्याची बंदोबस्ती करावी. नाहीं तरी अंताजीपंत यास तेथें न ठेवावे. नाहीं तरी येखादा दगा होईल याकरितां लिहिले असे. त्यास कल्याणास रवाना करावे. येकिले वर्तमान लिहिले असे. वानरेकराची व अंताजीपंताची मैत्रिकी आहे. मुंबईत लोक हासतात की येसी खबर कसी नाहीं म्हणतात. हे विज्ञापना.

¶*Shankraji Pant warns Chimaji Appa against the treacherous attitude of Antaji Raghunath, who, the writer adds, supplies secret information to the Portuguese.*

---

*No. 39*] [*1737?*

श्री

पुा श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे शेवेसी

विज्ञापना विशेष. जंजिरे अर्नाळा येथें इमारतीस चुना पाहिजे त्यास येथें चुन्याची भटी एक आहे तीस आग लावितो. चुना सेदीडसे खंडीपावेतो होईल. तेणेकरून जंजिरे मजकूरची चुन्याची बेगमी बहुते (क) होईल. प्रजन्य काल समीप आला तरी दारू वजन पके खंडी ३ पुण्याहून आणवून पाठवावी. प्रजन्य काली दारु पुण्याहून येता जाया होईल याकरितां सेवेसी लिा आहे व तोफाचे गोळे करावयास लोहार आणून काम चालीस लाविले आहे. गोले वरचेवरी तयार करीत असोत. आज तागायत कोळी व सुतार व लोहार व अरकशी लोक दीडशेपावेतो चाकर ठेविले आहेत. त्यास खर्चास तीनशे रुपये दिले व अडसरी देतो व दरअसामीस नीचे[१] पागोटे एक प्रमाणे दिल्हे, तेणेकरून सुखी जाहले हे विज्ञाप्ति.[+]

¶*This letter to Chimaji refers to the erection of the fort of Arnala which Bajirao completed on 23rd May 1737.*

---

*No. 40*] [*About May 1737*

श्री

विनंती उपरी. अरनालियाचा मजकूर तरी आरनाले पहिले वेतांच जाळून लोक आले. त्यास विचार पाहतां आरनालियासारिखी जागा दुसरे कोठे नाहीं.

---

१ उणाख, हलके.

+ अर्नाळा किल्ला बाजीरावानें ता. २३–५–१७३७ त बांधला त्यावेळचें पत्र असावें.

चहुकडील आरमाराचा मार्ग. खाडी मनवर मांडिवीपावेतो गेली आहे. ते स्थल जालिया दुसरा जंजिरा. फिरंगाण देखील हस्तगत होते यैसा विचार करून राजश्री बाजीराव[1] बेकसे याचे समाधान करून त्यासमागमे चिंतामण सिवदेव तीनसे माणसानिसी आरनालियास पाठविले. मेढियाचे काम चाली लाविले. गलाही पावता करितो. दारू गोली मात्र आपणाकडून आलियावरी प्रविष्ट करू. मेढा तयार होताच स्वामींनी पाथरवट पाठऊन द्यावे. दगडाचे अनकूल तेथे आहे तो किला मुस्तेद करावा. तोफाही आहेत आणखीही येथे आहेत त्याही पाठऊं. बंदर अवघे येक आहे तेथेही तो मेढा जालियावरी आसरा करून ठेवितील. येक महिना भोगला[2] म्हणजे चौ महिन्यावरी गोस्टी गेली. तोपावेतो आसरा करावा. तेथे हजार माणूसपावेतो भरती करावी म्हणजे दुसरी वसई निर्माण जाली! त्या खेरीज आणिक जागा आहे येसे नाहीं. त्या स्थलामुले नाहीम केळवे जेथपावेतो मेहनत करवल तेथवरी मुल्क कौलास येईल. येक स्थल मातबर जाले म्हणजे केल्या कर्माचे सार्थक जाले. याप्रमाणे आम्हास सुचले. स्वामीनीही आज्ञा करावी त्याप्रमाणे वर्तणूक करू. तोफेचे गोले आगत्य पाठविले पाहिजेत. . कृपा केली पाहिजे. हे+ विनंती.

¶*Shankraji Keshav, probably to the Peshwa, emphasises the importance of erecting a strong fortress at Arnala. " Arnala," he writes, " is a fine harbour commanding a good many creeks where the fleet can seek shelter or sally out for an attack swiftly and easily. It will be another Bassein from which the enemy's territory up to Mahim can be threatened."*

---

*No. 41*] [*April-May 1737*

**श्री**

**पुरवणी श्रीमंत आपा स्वामीचे सेवेसी**

विनती. पा। मनोहर व माहीम तारापूरप्रांते येक फौज जरूर पाहिजे. त्यास च्यार पाचसे राऊत सातसे माणूस पावत तरतूद करून तिकडे फौज सत्वर जाये तो आर्थ केला पाहिजे. तिकडे राजश्री पंताजी मोरेश्वर यासी पाठवावें. त्याजबराबर गोपाल माहादेव आहेत ते द्यावें आणि तांदुलवाडी वगैरे ठाणी घेवावी. दुसरें जदीद लोक ठेवावे. मनसबा थोर, माणूस फार पाहिजे. यासी सरंजाम केला पाहिजे. व फिरगी जनराल उरणास गेला आहे त्याणे मुंबईस इग्रेजासी

---

१ हा पुढें पेशव्यांच्या आरमाराचा सुभा झाला. २ क्रमिला.

+ लेखक :—शंकराजी केशव.

बोली घातली आहे कीं साष्टी तुजला देतो, माझा प्रात जमे तो सोडऊन द्यावा. त्याची याची बोलीचा सिध्धात होईल तो पाहावा. इंग्रेज कपटी आहे. स्वामी-पासी नम्रता दाखवील आणि कृत्रिम करील याचा विचार चितात आणीत जावा. बंदरकिनाराचे लोकाचा विश्वास न धरावा. इंग्रेज शामलास सामील करील आणि येईल याचा विचार करून शामलास देखील पत्रें पाठवावयाची असतील तरी पाठवावी. सारांश जदीदं[१] जमाव पांच हजारपावत ठेवावा, यात उतम आहे. गोवियासी दोन पतेमारी[२] काली मुजरद फिरगियाने पाठविल्या. तेथून जमाव येईल यास्तव आगोदर आपली तरतूद आसावी व मुलूक सुटला पाहिजे. विदित होय हे विज्ञाप्ति.

¶*Fresh reinforcements are necessary for the defence of Mahim and Tarapur. Pantaji Moreshwar and Gopal Mahadeo should be despatched on that side. It is feared that the Firangis might open up negotiations with the English at Bombay for succour and promise them Salsette in return. They might through the English prevail upon the Sidi to side with them. The writer of the letter cannot be traced. It is addressed to Chimaji Appa.*

---

*No. 42*] [*1-4-1737*

**श्री**

**श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी**

विनंती. सेवक शंकराजी केशव सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ ११ जिल्हेज प्रातकालपर्यंत वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीनी आज्ञापत्र छ ८ जिल्हेजचे पत्र पाठविले ते पावले. तेथें लिहिले कीं तुम्ही कैसे गेलेत, कोण्हेसमई पावलेत, कार्य किती जाहाले ते सविस्तर लिहिणे, म्हणून लिहिले. त्यास किले माहुलीचे रानातून गुरुवारी रात्रौ निघालों ते पाहाटेस घोटवडियाचे आरण्यात आलो. ते दिवसी पाणी मार्गी मिलाले नाही. याज-करिता दोघेचौघजण याणी पाणीकरितां मृत्य पावले. दुसरे दिवसी शुक्रवारी रात्रीस घोटवडियाचे रानातून निघोन तुंगारचे रानात येऊन पाहाटेचे राहिलो. ते दिवसी पाणी मिलालें. तो दिवस क्रमून निवड करून दोन टोल्या केल्या, येक निवडीची व येक दूंम[३] येसे केले. निवडीत आपण होतो. दूम लोकांत बालाजी केशव व खंडोबा होते. तेथून दोन घटका दिवस संध्याकालचा असतां निघालो, ते प्रहर दाहा घटिका रात्रीस खाडीवर आलो. तों तमाम चौकिया

---

१ नवा. २ फतेमान्या. ३ मध्यम, दुय्यम.

जागृत. दोनसे माणूस गोखरवेयाच्या बंदरावर आहे व तीस माणूस राजावलीचें उतारावर आहे व बाजे[1] मेटोंवरी[2] पंधरावीस माणूस आहे. तमाम परस्परे जाबसाल होतात यैसे नजरेने पाहोन मग गंगाजीचें (ला)गे समागमे आतील व बाहेरचे भेटलें होते त्यास पुसिले की याउपरी उपाय काये? ते बोलिले की राजावलीचे उतारावरील चौकीचे तीस माणूस आहेत, मारावे आणि पुढे जाऊन कार्थ साधावे.. यैसे बोलिले. मग आपणहि विचार चितात आणिला तों दुसरा विचार नाहीं. मग त्यास बोलिलों कीं संभरसवासें माणूस गलबतावरी उतरोन देणे. त्यासं त्याणी गलबत सिध केले होते ते राजावलीचे उताराचे डावेहातावरी कोसाभऱ्यावरी उतरोन मोराजी सिंदे व बाजीराव बेकसे खासे खासे उतरिले तों तेथून राजावलीचे उतारावर चौकीवर येत तोंच चद्रं मावलला. पाणी खाडीस आलें. चंद्र मावललियावरी दोन घटिकानी चौकीवर मारामार जाली. चौकीचे लोक ठार केले. जेव्हा चौकीवर आमचे लोक आले तेव्हा वीस माणूस चौकीवर उभे होते. त्याणी पायेदल जाली तिची चाहूल घेतांच त्याणें आमचे लोकांस हटकिले तों इतक्यात याणी मेळविले आणि तोडातोड केली. ते चाहूल दोही बाजूचें चौकीदारानी घेतली आणि बंदरावरी आवाज केला. तों तेचसमई अगोधरच खाडीचे किनारा गंगाजी ना्ा देखील काठी येऊन बसलो होतो तो पाणी भरले. चौकी मारिली, इळाज नाही यैसें जाले. स्वामी म्हणतील की आगोधरच कां पावलेस नाहीं? तरी लागे बोलिले कीं चंद्र मावलतांच खाडीवर जावे. तरी आपण तातड केली तो पाणी भरले. मग काये करावें. यैसे संकट प्राप्त जाहालें त्यास आगोधर पोहोणार याची निवड केली होंतीं. त्यास मग जे पोहणार होते त्यास दर आसामीस सेर सोन्याचे कडे बकसीस देऊ केले आणि खाडीत उड्या घालविल्या. त्यास दीडसे माणूस[3] पावता पाहोन घातलें. कितेकाच्या तरवारा बुडाल्या पांवरुणे गेली. तो तपसील फारच आहे. जो बंदुखी होता त्यास दुसरियाची तर (वार) देऊन घातला. ते परस्परें हत्यारे गेली. मुबदले जालें. यैसे बहुतप्रकारे श्रम करून अडीचसे माणूस पावत गेले. तो येक आगरुखाचे होडके सापडले. मग सटवाजी सालोंखे व रामजी तुगकर यास दोन कडी सोन्याची देऊ करून ते होडकेयासी दाहा माणसे लाऊन दुसरें दीडसे माणूस मेहनतीने घातले व गाताड्या (?) राजावलीचें गावातून आणून ताफा बांधला. त्याजवरी संभर माणूस पावत उतरले व पेंढें घालून त्याजवर माणसे दोनसे उतरिली. या प्रकारें लोक पलीकडे घातले. तेणेकरून हत्यारेहि कितीकाची गेली,

---

१ निरनिराळ्या. २ चौक्या. ३ दीडशे पावेतों माणूस.

चौकीदार मारामार करितां बोभाट जा (ला). मग हा इलाज केला आणि पलीकडे आपण खाडीत बसोन उतरले. खंडो चिमणाजी पोहोनच गेले. त्याणी श्रम बराच केला. व बाळाजी केशव व मोराजी सिंदे * * * * जीराव बाजीराव बेकसे * * * विचारे रामाजी सुर्वे व समस्त लोक उतेकर व मावळे व हेटकर याणी सर्वांनी बहुत मेहनत पोहोणारस जाली ते श्री जाणे. मग सकाळी फौज पेढियावर उतरली. बंदर उखळून काढिला. माणिकपुरियावर आलो. काही लोक उतरणेचे होते तों दोन घटिका दिवसास तीर्थरूप राजश्री माहादाजीपंतदादा फौज रा। बारवाजी पाटील ताकपीर याची वेऊन आले. पुढे आदकोस आपण सांगावयांस आले की फौज आली. तो सवेच पाठीवर राजश्री चिमणाजी भीवराव सा घटिका दिवसास जलदीनेच आले. तो आपण माणिकपुरियावर आहो. तेथून माणिकपुरियाचें देवळात आला. तों रा। चिमणाजी भीवराव व रा। बारवाजी पा। आले. भेटी जाल्या. मग तेथेच मुकाम केला. भोजन जाले. आणि रा। माहादाजी केशव व रा। खंडो चिमणाजी व मोराजी सिंदे व बाळाजीराव राजेबाराव[1] याजसमागमे लोक देऊन बाहादेरपुरियास[2] पाठविले. याणी जाऊन बहादरपुरियाचें सेवटी मांडी[3] आहे आहे तेथे माहादाजीपंती मोर्चा दिल्हा. तो त्याणे मार दिल्हा मग लोक जखमी जाले व पडिले त्याची यादी आलाहिदा पा। आहे त्यावरून विदित होईल. जे रीतीने मोर्चा समीप द्यावयाचा ते रीतीने दिल्हा. मोर्चा द्यावयासी कोताई जाली नाही. बाहादरपुरा आगदीच पाठीसी घातला आहे. वरकड वर्तमान उभयताचे नावे पत्र लि॥ आहे तेथे लिहिले आहे त्यावरून विदित होईल. जर इतकी मेहनत व बुधी केली नसती तर स्वामीचे चरण पाहावें थैसे न घडते. मी वर्तमान लिहिले आहे यात कोण्ही अन्यथा म्हणावे थैसे नाहीं. हेच पत्र सेवेसी आहे. पुढे सर्व निवेदन करितील त्यास अंतराये पडिला तरी मीच अन्याई होईन. पुढेहि जो विचार करावयाचा तो करीतच आहो. राजश्री चिमणाजीपंत व आम्ही व राजश्री बरबाजी ताकपीर सर्व येकविचारेंच आहो. येथे दुसरा अर्थ नाही. सेवेसी विदित होये हे विज्ञाप्ति.

¶*Shankraji Keshav sends a report of the capture of the fort of Rajawal and his advance upon Bassein from there.*

---

१ बुरुडकर.

२ या नांवचा पुरा किंवा वाडी वसईजवळ होती; पण आता तिचा कांहींएक ठावठिकाण लागत नाहीं.

३ गढी. कोकण प्रांतीच्या मोहिमांतच हा शब्द आढळतो.

1424

*No. 43*] [*1-4-1737 ?*

श्री

सेवेसी विनंती. स्वामींनीं छ ९ माहे जिल्हेजींची पत्रें पाठविलीं तीं कालीं छ १० जिल्हेजीं रात्रीस संध्याकालीचें चहुं घटका पावलीं. स्वामीनीं लिहिलें त्याचा विचार.

जंजिरें आरनालियाचे बेगमी येथें सोलासें खंडी गल्ला पाहिजे त्यास मोलासें खंडी गल्ला मिळत नाहीं. हजार खंडी गल्लयाची बेगमी करून बाकी साहासें खंडी भात पाहिजे. त्यास सा(हा)सें खंडी भात म्हणजे तीनसें खंडी तांदुळ जाहालें. त्यास भात हजार खंडीखेरीज जाजती मिळणार नाहीं. मुलकांत दाणा नाहीं. यास्तव सजगुरें जोंधलें गहुं पाठवावयाचा विचार करून गहुं पाहावयास पाठविलें त्यास गहुं सध्यां भिवंडीस चाळीस बेताळीस खंडी पाठविलें आहेत. आणखी पाठऊं म्हणून लिहिलें तरी उत्तम. स्वामींनीं गहुं पाठविल्हे हे पाहिले. बरें आहेत, तरी गहुं, जोंधळें सजगुरें, बजिनस तीनसें खंडीपर्यंत स्वामींनीं पाठवावें. कलम १

कापड समागमें आणावें कीं पाठऊन द्यावें. आम्ही कापड लोकांस दिल्हियास बहुत लागेल, तुम्ही दिल्हीयास थोडें लागेल. त्यास तुमचेंच विचारें तुम्ही द्यावेसें असेल तरी तुम्ही देणें. आम्ही द्यावेसें असेल आम्ही देऊं; परंतु याचा विचार काय तो लेहून पाठवणें. त्याप्रमाणें कापड पाठवून देऊं (न)

स्वामीनीं आपला यावयाचा विचार लिहिला. कळला. यैसियासी स्वामीचे विचारें सध्यां यावयाचा विचार असिला तरी यावें अगर तेथें मासपक्ष काम असेल तरी तेथील काम जाहालियावरी यावें. वरकड येथें फार दिवस राहावयास कार्यास न यें. आठ दिवस राहून आपलें जागेपासून जावयाचें लिहिलें तरी उत्तम गोष्टी. आमचें विचारें हेंच आहे. स्वामींनीं येथें फार दिवस राहावेंसें नाहीं. स्वामींनीं यावें आपलें जागें पाहावें. येथील जागियाचा बंदोबस्त आहे यापेक्षां आणीक करणें तो सांगावा. त्याप्रमाणें आम्ही वर्तोन. स्वामींनीं जावें परंतु स्वामीस वैशाखमासपर्यंत कोंकणांत राहावें लागेल, कां कीं स्वामीचा दबाव गनिमावरी फारसा आहे आणि गनिम वलवल करील तो या वैशाखपर्यंत करील. वैशाखांत वावदल जालियावर त्याची वलवल फार नाहीं. यास्तव वावदल जालियावरी स्वामींनीं जावें यांत स्वामीचें चित्तास काय येईल तें आज्ञा करावी. कलम १

हणमत बुरुजास तोफा पाहिजेत त्यास येथें तोफा आहेत किती व येथें

म्हणून लिहिलें. ऐसीयास स्वामींनीं लिहिलें हें खरेंच; परंतु आम्ही लोकांस कापड देणें तरी अगत्याअगत्य पाहून देऊन अगर स्वामीस विनंती करून देवणें तरी पाहूनच देऊं. विचार पाहून द्यावें हेंच उतम आहे. त्यास कापड पुढें पाठविलें तरी कार्यास येईल. समागमें आणिलें तरी उत्तम. वरकड लोकांनीं हरयेक गोष्टीची आडधाये नसें. माणूस इजाफेस दिवट्या व पोरगे व अफ्तागिरे द्यावयाची ते देऊन दिलासा केलाच आहे. याउपरी कार्याकारण ज्यास जें देणें देऊन स्वामींनीं शब्दें गौरव केलियास लोकाची छाती फुगोन स्वामीसेवा उल्हासानें करतील. कळलें पाहिजे १

सुरतेच्या सुभियास व राजश्री महिमाजी गायेकवाड व गंगाजी गायेकवाड यांस पत्रें पाठविलीं तीं रवाना करून. कळले पाहिजे. १

दवणेकडून योजोन आलियास फौज पाठऊन तें समयीं तुम्हास लेहून पाठऊंन तेव्हा तुम्ही येक सरदार व पन्नास माणूस समागमें पाठऊन देणें म्हणून लिहिलें. ऐसीयासी योजोन आले तरी यैसें न करावें. येकवेळ त्याप्रांतें घोडे स्वामीचे फिरोन आलेच पाहिजे. त्यासीं त्या प्रांतें फार फौज नलगे. दीड पाहिजेत किती त्या ठेऊन वरकड पाठऊं म्हणून लिहिलें. उत्तम गोष्टी. तेथें लागोन उरतील त्या पाठवाव्या. व राजश्री मानाजी आंगरे यांसहि लेहून तोफा दाहाबारा आणवाव्या. कळलें पाहिजे. कलम १

राजश्री दुर्जनसिंग याचे भिडेकरितां त्याचें जाहाज सोडावें लागतें म्हणून लिहिलें; त्यास उत्तम. द्यावे. कलम १

रोजमरियास रुा पाहिजेत त्यास द्वादशी त्रयोदशीस रुपये पंचवीस हजार पाठवितों. व पूर्णिमा जाहालियावरी साठीहजार रुपये पाठवितों म्हणून कळलें. १

चवट्यांविशी[१] राजश्री मानाजी आंगरे यास लिहिलें आहे म्हणून लिहिलें त्यास चवटे आणून पाठवावें. कळलें पाहिजे. १

सुरततून सुतार यावयास मास पक्ष लागेल त्यास आगोटी समीप आली. जंजिरे अरनालियास कोठी व सदर किल्ले वज्रगडी कोठी व सदर जाहली पाहिजे, वगैरे काम जाहालें पाहिजें. त्यास जाहाजाचें पंचवीस तीस सुतार आहेत ते घराचे कामास

---

१ चवटे (?)

दोन हजार स्वार पाठविलें म्हणजे महिना पंधरा दिवसा फिरोन कार्यभाग करून येतील. १

सुरतेहून जिनस आला तो गोवरीस आहे. त्यास येविशी रामनगरकर व जवारकर यांस लेहून राजश्री पंताजी पंत यांस लेहून त्याजकडून वेठे व बैल देऊन आणवावा. विदित जालें पाहिजे. १

सोरा राजश्री शिवरामपंत याजकडून देविला म्हणून लिहिलें तरी स्वामीचें पत्र पूर्वी आलें तें त्याजकडें पाठविलें आहे. तें पाठवितील तेव्हां खरें. स्वामींनीं त्यास लिहावें कीं उष्णकाल आहे तो पाठवणे म्हणून. १

हजार खंडी भात राजश्री बरवाजी पाटील व वरकडास सांगोन तजवीज करतों म्हणून लिहिलें त्यास हें गोष्टी उत्तम. परंतु उष्ण कालांत गला(ल्ला) आला पाहिजे. त्यास स्वामी ज्याज्याकडून गला (ल्ला) देवितील त्याजकडें स्वामींनीं आपलें दोन दोन हुजरे नेहमी ठेऊन त्यास वरचेवरी हुजरे महसली करून उष्ण कालांत गला (ल्ला) येऊन पावें तें करावें म्हणजे त्यासहि हलकें पडेल; व आम्हास आणावयास हलकें पडेल. याकरितां लिहिले आहे. विदित जाहालें पाहिजे. कलम १

सुरतेच्या जिनसाची यादी पाठविली त्यास गंधक मात्र कल्याणांस लाविलें तरी जाहाजाचें काम खोटी पडेल. यास्तव सदरा व कोठिया बांधावयास पुणें जुन्नर येथील सुतार वीस पाठवावें म्हणजे त्याजवळून सदर कोठिया करून घेऊ, व गलबताचें सुतार तें काम करतील. विदित जालें पाहिजे. १

लोखंडाची व वरकड जिनसाची यादी पाठविली ती पावली. जिनस प्रयोजनाचाच आहे. १

घोडबंदरास राजश्री खंडोजी माणकर हजार माणसांनसी येऊन तेथें कोरें काम उत्तम करविलें आहे, व दुसरी जागा घोडबंदरा आलीकडें तीन कोस व ठाणीहून तीन कोस ओवलें म्हणून गाव आहे तेथें संमुदेव आहे, तेथें उत्तम जागा बाधावयास योग्य आहे. तोही जागा बांधावयाची तजवीज करितो म्हणून लिहिलें. ऐसीयास खाडीजवळीं जागा असिली आणि उष्ण कालांत काम लावलियास कदाचित फिरंगी खाडी जाहाजें उभीं करून मार धरील यास्तव तूर्त चुना करावा व दगडाचें साहित्य करावें आणि पर्जन्यकालीं काम लावावें. यांत स्वामीचे विचारें होईल ते करावें. १

कल्याण प्रांतीचा गला व राजश्री नारायण जोशी याजकडून गल्ला देवितील तो कांबियास लौकर येई तें करावें. तेथून पुढें यावयाविशी शाहू

न्यावा. वरकडजिनस कोहजखाली गोन्हें येथें आणावा; तेथून अरनालियास आणून. यैसा विचार करावा.
कलम १

नाईक कोंकणांत आला आहे त्यास ताकीदपत्र पाठवावें, म्हणूस स्वामीस लिहिलें त्यावरून लिहिलें होतें. त्यावरून स्वामींनीं चारण मजकुरास ताकीदपत्र पाठविलें त्यास चारण मजकुराचा समाचार घेतां तो सुरतेकडे गेला. कळलें पाहिजे. १

येणेंप्रमाणें कलमें सेवेसी लिहिलीं असेत. विदित होय हें विज्ञापना.

¶*Shankraji Pant sends to Chimaji Appa several valuable points and suggestions on the subject of preparing an attack against the Portuguese.*

---

*No. 44*] [*1-4-1737?*

पो छ १२ जिल्हेज

श्री

विनंती उपरी. स्वामीनी छ ९ जिल्हेजचें पत्र पाठविलें तें छ ११ जिल्हेजीं संध्याकाळीं पावलें. तेथें आज्ञा कीं तिकडील स्थलें हस्तगत करावीं. स्वार व जमाव पाठवायास हें स्थल वसईपासून आरनालियापावेतों दाहा आकरा कोस जमीन लांब व रुंद तीन च्यार कोसपरयेंत संपूर्ण आगर लागलें आहे, इतकियाचा बंदोबस्त करावा. मोर्चे किलियानजीक गेले आहेत, त्याचेंहि साहित्य करावें. रात्रीचे स्वार चौकीस पाठवितों व पापडीच्या रमेदीजवळ[1] लस्करचा मोकाम आहे. लोक सारे गुराढोरांनीं गुंतले आहेत; याप्रकारची येथील स्थित आहे. राजश्री बारबाजी ताकपीर तीनशें माणसें घेऊन जिवधन घेतली. पुढें मांडवीस बराबर जमाव देऊन आजींच रवाना करितों. त्याचें माणूस येथें मोर्च्यास होतें तेंहि त्याजबराबर देतों. मांडवी हस्तगत जालियावरी पुढील ठिकाणें आहेत तेथेंहि पाठऊं. येथें फौज भारी असावी. यामध्यें स्वामी खावंद आहेत. आम्ही आपणापासून जे श्रम होतील त्यास आंतराये सहसा होणार नाहीं. स्वामीचें पुण्य समर्थ आहे, हें कार्यसिद्ध केली पाहिजे. बेलदारांचें[2] साहित्य आगत्य करावें. राजश्री संकराजीपंत व लोक कांहीं सेवेसी अंतराये करीत नाहीं. राजश्री संकराजीपंतीं बहुतच मेहनत करून

---

१ अजूनहि 'रमेदी' नांवाचा भाग वसईत आहे. रमेदी = पोर्तुगीज लोकांचें देऊळ, चर्च.

२ दगडफोडचे; फत्तरफोड.

आंत प्रवेश केला. राजश्री बरबाजी पाटीलहि कांहीं अंतर करीत नाहींत; सर्वही येकें विचारें आहेत. स्वामींनी लोकाचे व सामानाचें साहित्य करावयास विलंब न करावा, सेवक कांही सेवेसी आंतराय करणार नाहीं. कृपा केली पाहिजे हे विनती.

¶*Narayan Joshi to Chimaji Appa, informing him how zealously the writer and several others were exerting themselves in the conduct of the war and assuring him of their full support.*

---

*No. 45*] [*About 2-4-1737*

पो छ १३ जिल्हेज

**श्री**

विनंती+ उपरी. बाहादुरपुरियाच्या शेवटीं किलियानजीक मोर्चे गेले आहेत. मध्यें येक्या दो मालेचें अंतर आहे, त्यास पुढें मोर्चे चालवावें त्यास सामान मोर्च्यास अगदीं नाहीं. बेलदार पाहिजेत. तरी स्वामींनी कल्याण प्रांतें बेलदार असतील तर आगत्य आणून पाठवणें, अगर पत्र पावल तेंच क्षणीं पुण्यास पत्र पाठऊन दोनशें बेलदार सामानसुद्धां आणवणें. स्वामी म्हणतील कीं सामान पहिलेंच दिल्हे तरी पांच कुदळी व पांच सात खोरे या सामानानें किलियाचे मोर्चे होत नाहींत. आणि दिवसे दिवस जातात. तिकडील बंदोबस्त जाला पाहिजे. यास्तव राजश्री वासुदेव जोशी ठेवावे. स्वामींनी जमावासुद्धां आगत्य या स्थलास यावें, हें स्थल घ्यावें. जरी करितां स्वामी दिवसगतीवरी घालतील तरी गनिमाचें साहित्य होईल. आजीं लोक थोडकें आहेत (तरी) आतांहि कठीणच आहे. पुढें यापेक्षां भारी होईल. यास्तव सर्वेहि श्रम करून हें स्थल हस्तगत करावें. स्वामींचें पुण्य समर्थ आहे, तेणेकरून हें कार्य होत आहे. उगच दिवसगतीवर घातलिया पुढें श्रम फार पडतील. आतां जें कार्य प्राप्त जालें आहे तें करावेंच करावें; आम्ही सेवकलोकीं ल्याहावें यैसें काये आहे? परंतु दृष्टीस पडला मजकूर लिहिला आहे. जें क्षणीं पत्र पावेल ते क्षणींच उत्तर पाठवणार स्वामी समर्थ आहेत. कृपा केली पाहिजे हें विज्ञापना.

¶*Narayan Joshi to Chimaji Appa, requesting supplies of several articles for pushing on the siege of Bassein.*

---

+ लेखक:— नारायण जोशी (?)

No. 46] [2-4-1737

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

पोष्य नारायेण जोशी साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागाईत छ १२ जिल्हेज जाणोन स्वकीयें लेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. पहिलें दिवशींचें वर्तमान पूर्वी लिहिलें होतें. तीनशें धारकरी नेमिले होते त्यांस लोकांनीं कोण्हे गोष्टीची कमी केली नाहीं. किल्ल्याचे दरवाजियासी जाऊन लागले आणि किल्ल्यास पाठी दिल्या; परंतु हव्यापासोन थोडेसें अंतर पडिलें. पडकोटामधें लोक घेऊन जावें ऐसा विचार होता, त्यास हव्यानीं पुढें लागोन पाठीवर लोक न्यावें तें न जालें. लोकांस मार्ग ठावका नाहीं. मनमाने तिकडे गेले. परंतु शर्त केली. परंतु त्याणें रेजगारी मार केला. तेण्हेंकरून दाहावीस माणूस जायां जालें. आज दोन दिवस लोकांचें बहुतप्रकारें समाधान केलें. सांप्रत आज सर्वांचें समाधान करून सांगितलें आहे. उदईक लगट करावा ऐसा निश्चय केला आहे; परंतु लगटामुळें आप्लेचकरून साध्य जालें तर उत्तम, नाहींतर सेपनास माणूस जायां होईल ऐसा अर्थ आहे, याकरितां लिहिलें असें. आज्ञा होईल तैशी वर्तणूक करूं(न). येथें दिवसगत लागल्यानें स्थल बहुत कठीण आहे. बळावत बळावत इलाज नाही ऐसें होईल ऐसा विचार दिसतो. लगटानें कार्य जालें तरी उतमच जालें. कार्य न होतां शेंपनास माणूस जायां जालें तरी आपण शब्द लावितील, याकरितां लिहिलें असें. जैसी आज्ञा होईल तैशी वर्तणूक करून. लगट करावा ऐसें जालें तर अलाहिदां सरदारांची याद पाठविली असें, त्याप्रमाणें वेगळीं वेगळीं समाधानपत्रें पाठविलीं पाहिजेत. कितेक लोक रोजमुरियाकरितां श्रमी होतात. त्यांचा रोजमरा पाठविला पाहिजे. लोभ करीत गेले पाहिजे हें विनंती.

¶*Narayan Joshi to Chimaji Appa, describing to him the attack that he led against the fort and the gallantry of his men in the face of overwhelming odds. Some diffidence is expressed towards the end as regards another attack on account of the impregnable nature of the fort.*

---

No. 47] [1737

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

पोष्य नारायण जोशी मुरुडकर साष्टांग नमस्कार विनंती. आज गुरुवारीं सायंकाळीं चौघटिका दिवसां फिरंगियांची उरणहून माहागिऱ्या ७ सात

व मचवे २ दोन ऐशीं नव गलबते आलीं. मचव्यांवर दोन दोन तोफा होत्या. दोनी खाडींत आमच्या मोर्च्यासमोर येऊन तोफाचा मार करूं लागला. इकडे खोचीमध्यें लाहान गलबतें येऊन सेसवाशें माणूस खाली उतरले. कोटांतून पंनास पाऊनशें माणूस बाहेर निघालें तें त्यांस सामील जाहालें, आणि कोइलासेवर सुर्वे व खासबारदार व कुवारकर वगैरे यांचे मोऱ्या (माऱ्या?) पलीकडे राजश्री कृष्णराव याचे लोकांस मोर्चा दिला आहे, तेथें त्यांणीं खासबारदार वगैरें याच्या मोर्च्यावर चालोन आले. आमच्या लोकांनीं मोर्चे सोडिले नाहींत. दोन हिरिन्या त्याणीं केल्या; आमचे लोक बाहेर निघोन झुंज जालें. त्याचा करणेकरी पाडिला. आणिकहि पांच माणूस पडिलें म्हणून सांगतात; परंतु चार झोळ्या[१] त्यांणीं उचलून नेल्या त्या आम्ही इकडून अवघियांनीं पाहिल्या. इतकें तिकडें झुंझ होय तों इकडे लाहान माहागिऱ्या खोंचींत आल्या होत्या. त्यांजवर कोटांतील रांडा पोरें व काहीं फिरंगी ऐसें पाऊणेकशें माणूस चढोन गलबतें बाहेर निघालीं मग मचवेहि बाहेर निघोन नवहि येकें जागां होऊन माघारां निघोन बाहेर लाग वैवाटून राहिला आहे. वोहट जालियावर जाईल. आम्हांकडील च्यार माणूस जखमी जालें. त्यांमध्यें खासबारदार १ गोळ्यानें जखमी जाला; हात उडोन गेला, थोडीशी माया राहिली आहे. तिघेजण गोळ्यांनीं जखमी जाहाले. गनीम हटऊन माघारां घातला परंतु किल्लेयांतील कबिले वगैरें काहाडून नेले. लोकांनीं शर्त केली. ठिकाण सोडिलें नाहीं. तळ्यांतील पाणी कालपासून जेजालांनीं व दाही (दोही?) मोर्च्यांतील बरखंदाजांनीं बंद केलें आहे. डोखल्यांतील मात्र पाणी. रात्रीस सेर[२] घालितो परंतु सकाळीं काहाडून सायंकाळचें दाहावीस घागरी पाणी नेतो. आज तर केवळ हातघाई जाली. आणखी येकवेळ गनीम येईलसें दिसतें. दारू तों येथें आहे परंतु गो(ळ्या) दोन तीन हजार पाठविल्या पाहिजेत; व सुरुंगाचें काम चाललें त्यास उजेडास कांहीं तेल, व मेणवाती पाठविल्या पाहिजेत. कदाचित तेल तेथें नसिलें तर इकडून आम्ही आणऊं; परंतु मेणवाती अगत्य पाठविल्या पाहि [अपूर्ण.]

¶*Narayan Joshi to Chimaji Appa, describing an action between the Portuguese and his own men at Belapur.*

---

१ जखमी माणमास पासोडीच्या झोळींतून नेण्याची पद्धत असे. २ नासण्याकरितां.

No. 48] [पो 2-4-1737

पो १२ जिल्हेज

श्री

सेवेसी विनंती. येथे गवंडे चोवीस आहेत ते जंजिरे आरनाळा व किले वज्रगड येथे कामास गुंतले आहेत. याखेरीज टाकियाची सरसगिरी करावयास गवंडे पाहिजेत आसामी

५ तांदुळवाडी टाकी सात याची सरसगिरी करणे

४ किले असावा हौद येक व टाके येक याची सरसगिरी करणे यास गवंडे

२ काळर्दुग येक टाके आहे त्यास सरसगिरीस पा।

२ किले जीवधनगड टाकी सुमार २ दोन येकूण

३ कामणगड टाकी सुमार २ दोन यास सरसगिरी करावी

---

१६

येकूण सोळा गवंडे स्वामीनी पाठवावे. महिना दिढा महिनियात काम होऊन सदरहू किलियावरी उतम पाणी होईल. परंतु गवंडे या चैत्रवैशाखात पाठवावे. पर्जन्यकाली पाठऊ म्हटलियास कार्याचे नाही. कां की ऊष्ण कालात सरसगिरी जालियास पर्जन्य पडो लागलियास पाणी धरावे लागते. यास्तव आलाकडे ऊष्ण कालात पाठवावे. विदित जाले पाहिजे. सेवेसी विदित होये हे विज्ञापना.

¶*Shankraji Kesheo requests the Peshwa to send some masons to build water-tanks at Tandulwadi, Asawa, Kaldurg, etc.*

---

No. 49] [5-4-1737

पौ छ १६ जिल्हेज

श्री

विनंती उपरी. ता। छ १५ जिल्हेज प्रात:काळपावेतो स्वामीचे कृपादृष्टीकरून सेवकांचे वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीनी छ ११ जिल्हेजचे पत्र पाठविले

ते छ १४ मिनहूस संध्याकाळी पावलें. तेथें आज्ञा कीं वानरे वेंसावे बेलापूर येथे मोर्चे दिल्हें आहेत म्हणोन स्वामीनी लिहिलें तें कळो आलें. स्वामीचे पुण्य समर्थ आहे. तेथे चिंता कांही नाहीं. मुख्य गोष्ट लोकांची बेगमी पोख्ती असावी. तेहि स्वामी करितीलच. वरकड आम्हाकडील वर्तमान पुर्वील पत्री सविस्तर लिहिलें आहें त्यावरून विदित होईल. कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Chimaji Appa is requested to send more reinforcements to Bandra, Belapur and Vesova where batteries have been thrown up.*

---

*No. 50*] [*5-4-1737*

श्री

**श्रीमत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी**

आज्ञाधारक खंडोजी माणंकर मो वानरें सां दंडवत विज्ञापना. ता छ १९ जिल्हेज मंगळवारपावेतो येथील वर्तमान स्वामीचे कृपावलोकनेकरोन वर्तमान येथास्थित असे विशेष. येथील सर्व वर्तमान निवेदन करावयासी राजश्री सखोपंत व रा बापूजी कृष्ण सेवेसी पाठविले (ते) निवेदन करितां विदित होईल. त्याचा सरंजाम करणार स्वाम समर्थ आहेत. आजपावेतो भांड्याचे गोळे मोर्च्यावर टाकीत होता. हालीं गरनाला व फटकडीचे गोलें टाकितो, याकरिता लादन्या मोर्च्यास कराव्या लागल्या. सेवेसी कळावे. रोजमरियास्तव लोक हैराण आहेत तरी रोजमरा पाठविला पाहिजे. सारांश लोकांचे उर्जित केले म्हणजे स्वामीचे प्रतापे कार्य व्हावयासी विलंब नाही. स्वामी उर्जित करितील हे तो खरंच आहे परंतु शिपाई लोकांचा धीर पुरत नाही यास्तव क्षिणक्षिणा ल्याहावे लागतें. हाली मशारनिलेस पाठविले आहेत. हृद्गत मनास आणोन आज्ञा करतव्य ते केली पाहिजे. राजश्री होनाजी बलकवडे हे आपले जागां बहुत अर्जुर्दा[१] आहेत; निमित्य कीं प्रताप मागे केला मोडावले यास्तव राहिले (?) आलीकडे वेसांव्यांस माणूस दुखऊन येश न आलें याकरितां दिलगीर आहेत. त्यांस संतोशाचें पत्र पाठविलें पाहिजे. सेवेसी श्रृत होये. रा बापूजी कृष्ण यांही पहिल्यापासोन सेवा केली आहे तरी यांचा व लोकांचा सरंजाम केला पाहिजे. हे विज्ञाप्ति.

¶*Khandoji Manker to Chimaji Appa, asking for more funds to pay off the men in the army. He further requests Chimaji Appa to console Honaji Balkavade who is disheartened by the set-back which he received at Vesova at the cost of several casualties.*

---

१ कष्टी, खिन्न.

*No. 48*] [पाो *2-4-1737*

पाो १२ जिल्हेज

**श्री**

सेवेसी विनंती. येथे गवंडे चोवीस आहेत ते जंजिरे आरनाला व किले वज्रगड येथे कामास गुंतले आहेत. याखेरीज टाकियाची सरसगिरी करावयास गवंडे पाहिजेत आसामी

५ तांदुळवाडी टाकी सात याची सरसगिरी करणे
४ किले असावा हौद येक व टाके येक याची सरसगिरी करणे यास गवंडे
२ काल्र्दुग येक टाके आहे त्यास सरसगिरीस पा
२ किले जीवधनगड टाकी सुमार २ दोन येकूण
३ कामणगड टाकी सुमार २ दोन यास सरसगिरी करावी

---
१६

येकूण सोला गवंडे स्वामींनी पाठवावे. महिना दिढा महिनियात काम होऊन सदरहू किलियावरी उतम पाणी होईल. परंतु गवंडे या चैत्रवैशाखात पाठवावे. पर्जन्यकाली पाठऊ म्हटलियास कार्याचे नाही. कां की ऊष्ण कालात सरसगिरी जालियास पर्जन्य पडो लागलियास पाणी धरावे लागते. यास्तव आलाकडे ऊष्ण कालात पाठवावे. विदित जाले पाहिजे. सेवेसी विदित होये हे विज्ञापना.

¶*Shankraji Kesheo requests the Peshwa to send some masons to build water-tanks at Tandulwadi, Asawa, Kaldurg, etc.*

---

*No. 49*] [*5-4-1737*

पौ छ १६ जिल्हेज

**श्री**

विनंती उपरी. ताा छ १९ जिल्हेज प्रात:काळपावेतो स्वामीचे कृपादृष्टीकरून सेवकांचे वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामींनी छ ११ जिल्हेजचे पत्र पाठविले

ते छ १४ मिनहूस संध्याकाळी पावलें. तेथें आज्ञा कीं वानरे वेंसावे बेलापूर येथे मोर्चे दिल्हें आहेत म्हणोन स्वामीनी लिहिलें तें कलो आलें. स्वामीचे पुण्य समर्थ आहे. तेथे चिता कांही नाहीं. मुख्य गोष्ट लोकांची बेगमी पोख्ती असावी. तेहि स्वामी करितीलच. वरकड आम्हाकडील वर्तमान पुर्वील पत्री सविस्तर लिहिलें आहें त्यावरून विदित होईल. कृपा केली पाहिजे हे विनंती.

*¶Chimaji Appa is requested to send more reinforcements to Bandra, Belapur and Vesova where batteries have been thrown up.*

---

*No. 50]* *[5-4-1737*

**श्री**

**श्रीमत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी**

आज्ञाधारक खंडोजी माणंकर मो वानरें सां दंडवत विज्ञापना. ता छ १९ जिल्हेज मंगळवारपावेतो येथील वर्तमान स्वामीचे कृपावलोकनेकरोन वर्तमान येथास्थित असे विशेष. येथील सर्व वर्तमान निवेदन करावयासी राजश्री सखोपंत व रा बापूजी कृष्ण सेवेसी पाठविले (ते) निवेदन करितां विदित होईल. त्याचा सरंजाम करणार स्वाम समर्थ आहेत. आजपावेतो भांड्याचे गोले मोर्च्यावर टाकीत होता. हालीं गरनाला व फटकडीचे गोलें टाकितो, याकरिता लादन्या मोर्च्यांस कराव्या लागल्या. सेवेसी कलावे. रोजमरियास्तव लोक हैराण आहेत तरी रोजमरा पाठविला पाहिजे. सारांश लोकांचे उर्जित केले म्हणजे स्वामीचे प्रतापे कार्य व्हावयासी विलंब नाही. स्वामी उर्जित करितील हे तो खरंच आहे परंतु शिपाई लोकांचा धीर पुरत नाही यास्तव क्षिणाक्षिणा त्याहावे लागतें. हाली मशारनिलेस पाठविले आहेत. हद्दत मनास आणोन आज्ञा करतव्य ते केली पाहिजे. राजश्री होनाजी बलकवडे हे आपले जागां बहुत अर्जुर्दा[१] आहेत; निमित्य कीं प्रताप मागे केला मोडावले यास्तव राहिले (?) आलीकडे वेसांव्यांस माणूस दुखऊन येश न आलें याकरितां दिलगीर आहेत. त्यांस संतोशाचें पत्र पाठविलें पाहिजे. सेवेसी श्रुत होये. रा बापूजी कृष्ण यांही पहिल्यापासोन सेवा केली आहे तरी यांचा व लोकांचा सरंजाम केला पाहिजे. हे विज्ञाप्ति.

*¶Khandoji Manker to Chimaji Appa, asking for more funds to pay off the men in the army. He further requests Chimaji Appa to console Honaji Balkavade who is disheartened by the set-back which he received at Vesova at the cost of several casualties.*

---

१ कष्टी, खिन्न.

No. 51] [5-4-1737

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे शेवेसी

विज्ञापना येसीजे. आज छ १९ जिल्हेज मंगलवारी चवथेप्रहरी बातमी आली की इंग्रेज फिरंगीयासी शामलाकडील तीनसें माणूस मदत आली आहे. येसा जमाव च्यार हजार जाला असे. अम्ही कोल्यांस कौल[1] देऊन हस्तगत करावयाचे तलाशांत[2] होतो. त्यांही तमाम कोली जमा करून आज उद्यांचे सामान सुदां येथे यावे हा ईतेर्थ[3] असे. मौजे वेसावे येथील कोल्यांस कौल दिल्हा होता त्यांस कबिल्यासुधा[4] धरोन नेले आण सींवास जमाव केला असे. स्वामीस कलावे म्हणोन लिा आहे. सींवची तर बंद केली पाहिजे. याउपरी दुसरे स्वार सेमर पाठविले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे[+] विज्ञाप्ति.

¶*Chimaji Appa is informed of the English and the Portuguese being reinforced by the Sidi with three hundred men.*

---

No. 52] [11-4-1737?

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक खंडोजी माणकर मो वानेरें साष्टांग दंडवत विज्ञापना. ताा छ २१ जिल्हेजपावेतों स्वामीचे कृपावलोकनेकरोन वर्तमान येथास्थित असे विशेष. शंकराजी रघुनाथ यांजसमागमे सामान पाठविला बितपसील

| | | | |
|---|---|---|---|
| तोफ | तोफचा गाडा | दारू वजन पक्के | नवघणे |
| १ | १ | ८३॥. | १० |
| चराटे सुताची | सोलमीचे झाड | गोले सुमार | |
| ६ | १ | ९७ | |
| पाइले | कुराडी | जंजिरा लोखंडी | |
| २ | २ | २ | |
| किता नवघणे चाकास | सुतार | पाव्या | लंग |
| २ | १ | ७ | ० |

---

१ अभयपत्र. २ विचारांत, तजविजींत. ३ इत्यर्थ.
४ कुटुंब, खटलें. + पत्र खंडोजी माणकराचें.

पैकी येथून हुजूर रा। कुराडी २ पाईले[1] २ बाकी येथं पावले सामान बितपसील

| | | |
|---|---|---|
| तोफ | तोफचा गाडा | नवघणे[2] किा यो |
| १ | १ | १२ |
| चराटे सुताचीं | | सोलमीचे[3] झाड |
| ४ | | १ |
| गोळे | जंजिरा[4] लोखंडी | सुतार |
| ५७ | २ | १ |
| पाव्या बुरडी | | |
| ७ | | |

यकूण शाइसी दागिने सुमारी व दारू वजन पके ८३॥ साडेतीन मण पावलें. बाकी सुताचीं चराटें दोन पावलीं नाहींत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति. व कुराडी दोन येथें असेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति

¶*Khandoji Manker to Chimaji Appa, acknowledging the receipt of ammunition and other warlike material.*

---

*No. 53*] [*15-4-1737*

पौ छ १ मोहरम जाबसूद

**श्रीमलारीमार्तंडभैरवाये नमा**

**श्रीमंत राजश्री आपा**

**स्वामीचे शेवेसी**

आज्ञाधारक नरसो कुकाजी सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुषल चैत्र बहुल १२ शुक्रवार जाणौऊ स्वकीये स्वानंदवैभवलेखनआज्ञा केली पाहिजे आज्ञापत्र पाठविलें (तेथे) लिहिलें कीं जमाव बरकंदाज पाठवणे, त्यास नवाब साहेबीं चिरंजीव सिवराम व जमाव सेवेसी पा। आहे. आम्ही तो चाकणेंत आहों. ये प्रांती तो जमाव बरकंदाज मिलत नाहीत. वैजापूर गांडापूर येवले संगमनेर पाटवदे ये स्थली बरकंदाज उमेदवार आहेत. परंतु तिकडे येक मनुष पा। होते त्यास

१ पाइले (?)

२ नवघण=ओझें उचलण्याकरतां दोर लावलेला एक लांब बांबू.

३ सोलमीचें झाड (?)

४ जंजिरा = साखळदंड.

त्याचा विचार दुमाहा रोख द्यावा. शेरा[1] पोखता करावा. फिरंगाणांत राहावे लागते. आम्ही कधीं राहिलों नाही. त्याहीवर कौल येईल शरा लेहोन येईल दुमाहा रोख येईल तर येऊन, यैसा विचार आहे. त्यास जे चाकर करावे ते तेथे तैनाती मोकरर राहावें हे बोली करावी किंवा स्वामी ते प्रांती आहेत स्वारीबाार ठेवावे हे आज्ञा केली पाहिजे. कदाचित लोक आले तर ते ठाणी आहेत जमोन[2] घेतला पाहिजे. आजी माणसाचे शाश्वत नाही. द्रव्याकारणे जीव देतात यैसा प्रसंग त्याचा आहे. येका जागा जमाव नाही. जागा जागा माणसे पाठऊन येकयेक माणूस मेलऊन आणावे लागते याजसाठी सेवेसी विनंती लिहिली. जैसी आज्ञा येईल त्याप्रमाणे वर्तणूक केली जाईल. चिरंजीव स्वामीच्या च्यरणापासी आला आहे स्वामी तो सांभाळ करतीलच. परंतु सूचना लिहिली आहे विज्ञापना केली आहे. बहुत काये लिहिणे हे विज्ञापना. जमावासाठी येक कारकून पाठविला पाहिजे. त्यास वैजापुरापावेतो जावे लागेल. रुबरू मनास आणून चाकर ठेवतील. आम्हींहि त्याजबाा आपली माणसे देऊन आणि त्याची बोली ते करतील. याजसाठी कारकून जरूर पाठविला पाहिजे. बहुत काय लिहिणे. विज्ञापना.

¶*Letter to Chimaji Appa, explaining the difficulties of employing upcountry matchlockmen for the war against the Portuguese.*

---

*No. 54*] [*22-4-1737*

पौ छ २ मोहरम जावसूद

**श्री**

**श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी**

सेवक अंताजी रघुनाथ कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल वैशाख शुध चेतुर्थी भृगवासर प्रहर दिवसपर्येत कुशल जाणून स्वकीये स्वानंदवैभवलेखन-आज्ञा केली पाहिजे विशेष. आज्ञेप्रमाणें सेभर वोझे गवत झावळया घेऊन वानरे-यास आलो. राा सूर्याजी नाईक नाखते व आमची दोन माणसे देऊन नेमल्या जाग्यास पाठविले; तंव तेथे बुधवारीं रात्रेऊ ताडाचा मेढा[3] घातला. दरव्याज्या-पुढें वीस हात व पच हात आश्रेने दरवाज्यापुढें जागा रिता आहे. त्यामध्यें बरकंदाज से दोनसे आश्राने आहेत. तेथें दारूची बुधली पुरली आहेत म्हणोन

---

१ पगाराचा दर. २ जामीन.

३ तात्पुरता आसऱ्यासाठीं किंवा बचावासाठीं झाडांचा किंवा लाकडांचा किंवा डांभांचा तट घालतात तो.

बातमी आहे. त्यास आम्ही वोशी नेऊन टाकावीं ती मेढ्या बाहेर पडतात. अग्न लाविली तर लाकडाचा मेढा असता तरी जलता, वोल्या ताडांचा मेढा जलणार नाहीं. डोंब होऊन टाकणारास पळता मुस्कील होईल. याउपर याही सुलतान[१]- ढवा करावा म्हणून विचार केला आहे. परंतु स्वामीचेच पुणेकरून सर्व होऊं सकेल परंतु सेवकाचे वेड्या विचारे दिसते जर त्याणे भवता मेढा घातला आणि पचे- मेच्या दरव्याज्यापुढे तोफा दोन भुंईवर माडिल्या आहेत. वरत्या सा तोफा थोरल्या दो बुरजा—

( पुढील पान गहाळ. )

¶*Antaji Raghunath Kavale informs Chimaji Appa that the orders given by him were duly carried out.*

---

*No. 55*] [पो *16-5-1737*

छ २६ मोहरम

**श्री**

**पुरवणी श्रीमंत राजश्री आपासाहेब**
**स्वामीचे सेवेसी**

सेवेसी विज्ञापना. प्रजेनकालचे मुकाम त्या मुलकांत जाहाले यैसे दिसोन येते. त्यास वसई व वानरे यासी मोर्चे तो लागलेच आहेत. स्वामीचे पुनेकरून इतक्या- मधें हस्तगत जाहाले तरी बरेंच जाहाले. त्यास गोवेयाहूनहि त्यास कुमक आली आहे. उनाला आहे तों फिरंगी चलवल करील. प्रजनेकालीं आगीचा मार त्याचा चालता दिसत नाही तेव्हा आपला माना पडेल यैसे वाटते. सेवकास सुचली गोस्ट सेवेसी निवेदन केली आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Chimaji Appa is informed of the siege of Bassein and Bandra. The Firangis have sent reinforcements thither from Goa. The Firangis will be only active in summer.*

---

*No. 56*] [*28-4-1737*

**श्री**

**श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी**

पोष्य नारायण जोशी मुरुडकर साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागाईत वैशाख शुद्ध दशमी मुकाम बेलापूर जाणून स्वकीय लेखन करावयास आज्ञा केली

---

१ निकराचा हल्ला.

पाहिजे विशेष. बेलापूरकर फिरंगी जेर जाहाला आणि मंगळवारीं तिसरें प्रहरीं बोलों लागला कीं आपलें सामान गलबतावर येतें तें येऊं द्यां आणि पाणी मोकळें करा आणि आपण येक कागद वसईस पाठवितों तेथून जाब आलियावर किल्ला तुम्हास देऊन आम्ही जाऊन ऐसें बोलला; आम्ही कबूल केलें नाहीं. त्याजवर काल बुधवारीं तिसरें प्रहरीं तिघे फिरंगी व येक मुसलमान बाहेर आले; भेटी जाहालियावर कितेक गोष्टी त्याच्या आमच्या जाहल्या, कितेक मतलब त्यांणीं घातले, कितेक आम्ही घातले; परिणामीं आज गुरुवारीं सायंकाळच्या चौ घटिका दिवसां त्यांणीं गलबतें आणून त्यांत बसावें आणि कोट आमचे स्वाधीन करावा ऐसा करार करून कौल देऊ(न) आपलेंहि वचनप्रमाण देऊन कोटांत गेले. त्याप्रमाणें आज त्याचीं गलबतें येऊन कऱ्हाव्याचे जवळ खाडींत राहिलीं. लाहान कोल मचवे बंदरी येऊन अगदीं फिरं(गी) कबिलेसहवर्तमान उतरोन गेला. स्थल स्वामीच्या प्रतापेंकरून हस्तगत जाहालें. आपणांस कळावें म्हणून लिहिलें असें. सविस्तर धोंडजी शिंदे जबानीं सांगतां कळों येईल. लोभ करीत गेले पाहिजे. हें विनंती.

¶*The negotiations between the Portuguese and Narayan Joshi are reported to Chimaji Appa. It was agreed that the Portuguese should hand over the fort on Thursday evening and should board the ship for Bassein.*

---

No. 57] [28-4-1737

श्री

चिरंजीव वासुदेव जोशी यासी नारायण जोशी आशीर्वाद उपरी. तुम्ही राजश्री यजमानाचीं पत्रें व आपलें पत्र कान्ह्याबराबर पाठविलीं तीं आम्ही कागदाचा लाखोटा केला इतकीयांत पावलीं. सविस्तर वर्तमान कळलें. कार्य व्हावयाचा कितेक अर्थ व प्रकार लिहिला तोहि कळला; इतकें लिहावयाचें कारण होतें ऐसें नाहीं. हरकोणी गृहस्थाच्या भाषणाचा क्रोध मानून कार्यनाश करावा हेंहि गोष्ट कशी घडेल? तुमचीं पत्रें आलियापूर्वीच अवघियांस कांहीं प्रीति कांहीं भय ऐसें दर्शऊन समजाऊन सांगोन आपलें कार्य केलें. सूर्यास्तानंतर आपले लोक किल्ल्यांत चढऊन त्याचे उतरिलें. कळलें पाहिजे. कान्हापा आतांच आले; त्या पत्राचे उत्तर हेंच लिहिलें असें. सविस्तर प्रात:काळीं लिहोन पाठऊन. बहुत काय लिहिणें हें आशीर्वाद.

¶*Narayan Joshi informs Vasudeo Joshi of the evacuation of the fort by the enemy and subsequently being occupied by his own men.*

No. 58] [28-4-1737

श्री

चिरंजीव वासुदेव जोशी यासी नारायण जोशी आशीर्वाद उपरी. कालचें परवाचें वर्तमान वरचेवर लिहिलेंच आहे. आज गुरुवारीं सायंकाळीं बेलापूर हस्तगत जालें; सविस्तर धोंड्या सांगतां कळेल. रोजमरियाची हमी मागोन घेऊन सत्वर पाठवावी व खासगत खर्चास रुपये १०० पाठवणें. आम्हास येथें दोन तीन दिवस लागतील. सविस्तर मागाहून लिहून पाठऊन. बहुत काय लिहिणें हें आशीर्वाद.

¶*Narayan Joshi informs Vasudeo Joshi of the capture of Belapur.*

---

No. 59] [1737

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

पोष्य नारायेण जोशी साष्टांग नमस्कार विनंती उपरी. आजचें वर्तमान, दोन प्रहर ढकलतां फिरंगी याचीं पंधरा तारवें आलीं. त्यांमध्यें थोर सात व लाहान आठ येऊन कोटाचे पछयेमेस खाडीमधें येऊन तारवांवरील शंभर माणूस उतरले व कोटांतील च्याळीस पंनास माणूस बाहेर आलें आणि कोयेरासचे मोर्च्यावर चालोन जाऊन मार केला. मोर्चेकरांनीं मारून काढिलें. गलबतें खाडींतून नीट पुढें येऊन पूर्वेचे मोर्च्यावर मार केला. मोर्च्यावरून जेजालाचा मार व पणवेलपैकी तोफ लागू केली आहे, तिचा मार केला. तेव्हां गलबतें निघोन मागती पहिलें ठिकाणीं जाऊन नांगरून राहिलीं आहेत. कोयेरासचे मोर्च्यावर पायउतारा लोक आले होते ते कोटांतील कोटांत कांहीं गेले. कांहीं लोक व तारवांवरील लोक ऐसें जाऊन पश्चिमेकडील बंदरावर राहिलें, गलबतामध्यें चढले नाहीं. काय मुद्दा आहे हें न कळे. वरकड आज त्यांणीं ऐसा विचार केला होता कीं मोर्चे उधळून काढावें परंतु स्वामीचे प्रतापेंकरून मोर्चे काईम राहिले. पुढें त्याचे दोन मुद्दे दिसतात. येक मुद्दा रात्रीस फिरोन मोर्च्यावर चालोन घ्यावें, अगर कोटांतील कपितानास काढोन न्यावें, ऐसा तर्क दिसतो. आज मोर्चे कायम राहतील असा भरवसा नव्हता. सवाप्रहरपर्यंत पांच गलबतें येकामागें येक वळीनेंच नांगर टाकून आवघ्या मोर्च्यांवर तोफाचा मार केला. तोफा थोर नव्हत्या. गलबतें लहान तैशा तोफाहि लाहानच; येकयेकावर दोन दोन होत्या. सवाप्रहर होता

मग सायंकाळचा च्यार घटिका दिवसां निखार[1] वोहट जाहला तेव्हां थोरली खाडी टाकून दोही दिवेल्यांमधून[2] खाडीच्या पाटानें निघोन पश्चिमेच्या खाडीचें तोंडीं बाहेर नांगर टाकून राहिला आहे. लहान होडकी सात आठ होतीं तीं खोचींतच[3] पश्चिमेच्या आहे. बाहेर लोक उतरले होते त्यांपैकी चाळीस पंनास चढले, कांहीं राहिले ते दरवाज्याजवळ, कांहीं बुरजाजवळ, कांहीं कोटांत ऐसें उभेच आहे; पुढें काय करील तें पाहावें. हा कालपर्यंत मोर्चे आहेत. याउपरीही येकायेकीं टाकितों ऐसें नाहीं. स्वामीचें पुण्य समर्थ आहे, मारून काहडीतच आहेत. लोकांनीं पाईकीचीं[4] शर्थ केली; पुढेंही करावयास चुकत नाहीं. आम्हांजवळ गोळ्याचें सामान निपट[5] नाहीं. काल आठराशें गोळ्या पाठविल्या त्या आज आयतेवेळेस पाहातां आवघ्या थोर जेजालेजोग्या आहेत. ते कांहीं आम्हाजवळ हजार बाराशें होत्या. थोरांतील नवेंशें लाहान निवडून काम चालविलें, आतां निपट नाहीं. गोळ्यांमुळें आम्हांकडे कमी पडलीसी जाहाली तर पांच हजार गोळी येकदांच पाठविली पाहिजे. सत्वर पावें ऐसी पाठविली पाहिजे. आज झुंज थोर पडिलें. रात्रीसही न पडें ऐसा भरवसा नाहीं. स्वामीच्या प्रतापें जें होणें तें होईल. बहुत काय लिहिणें लोभ करीत गेले पाहिजे हें विनंती. रात्र रविवार आवशीच्या घटिका ६. रुपये हजार पाठविले ते पावले. आजपर्यंत थैल्या १० धोकव्या ४ आल्या त्यांपैकी तीन थैल्या ठेऊन बाकी पाठविल्या आहेत. पावतील हें विनंती.

¶*Narayan Joshi describes to Chimaji the attack that he led against the Portuguese just near the Koyeras Creek. He further discusses the probable plans of the enemy and suggests remedies how to meet them.*

---

*No. 60*] [*May 1737*

श्री

सेवेसी विनंती. आमची गलबते स्वारीस गेली होती. त्यानी तारापूरच्या माहागिऱ्या साहा धरून आणल्या व येक माहांगिरी बुडाली. त्यास साहा माहांगिऱ्यावरी कोली सत्तेचालीस आसामी सापडले. त्यास बेडिया घालून धोंडे वाहावयास लाविले आहे. त्याचे कबिले आणऊन जंजिरे आरनालियास त्यास चाकर ठेवावे. या प्रकारेच कोली हाताखाली घालून आरमारास कोलियाची बेगमी

---

१ पूर्ण. २ भिंत, तट.

३ A little bay or cove, a hollow or recess up a creek or inlet.

४ शिपाईगिरी. ५ मुळीच, यत्किंचित्.

करितो. सतेतालिसा कोलियातून दोन कोली पाठऊन कबिले आणावयाचा इलाज करितो. विदित जाहाले पाहिजे +सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना. स्वार आम्हाकडील आहेत त्याचीहि नेमणूक उदईक पाठवितो हे विज्ञापना.

¶*Shankraji Keshav announces that forty-seven Kolis have been captured in a raid. They with their families will be useful to carry stones for the buildings.*

*No. 61*] [*2-5-1737*

छ १७ मोहरम

जावसुद

**श्रीमंत माहाराज राजश्री आपा**

**स्वामीचे सेवेसी**

विनती सेवक आज्ञाधारक विठल विश्वनाथ चरणावर मस्तक ठेऊन साष्टाग नमस्कार विज्ञपि. तां छ १२ मोहरम सोमवार मुा तांदुलवाडी सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. आजी सोमवारी प्रातःकाली किले तादुलवाडी स्वामीचे पुन्यप्रतापे करून फते जाली. किले मजकुराकडे स्वारी आली आणि ज्या प्रकारे किला फते केला ते हकीकत सविस्तर राजश्री आवजी कवडे यानी सेवेसी लिा असे, त्यावरून विदित होईल. येथून मकुंद प्रभू सेवेसी पाठविले आहेत. तर किल्याची बेहबुधी करणार समर्थ स्वामी आहेत. कलमा (ची) याददास्त पाठविली आहे. ते मनास आणावी आणि कृपा (लु) होऊन त्याचा सरंजाम करणे तो कृपाळु होऊन करावा. मंगलवारी स्वार होऊन मणोरास गेलो. सेवेसी विदित होये हे विज्ञापना.

¶*Vithal Vishvanath writes to Chimaji Appa about the capture of the fort of Tandulvadi.*

---

*No. 62*] [*4-5-1737*

**श्री**

**पुरवणी श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी**

विज्ञापना. माडवीचा कपितान जात होता त्यास आणावयास आम्ही स्वारी[१] पाठविली होती. तेथून येक फिरगी आणिला त्यास पुसिले की माडवी जेर

---

\+ पत्र शंकराजी केशवाचें चिमाजी आपास. १ वाहन वगैरे.

कोणत्या मोर्च्याने जाली? त्याणे सांगितले कीं तुकनाकाचे मोर्च्याने माडवी जेर जाली व तोफ थोरली बंदरावरील पाठविली त्याणेहि माडवी जेर जाली. ऐसे त्या फिरंगियाने सागितले. तो फिरंगी येथे आम्हाजवळ आहे. त्यास सोडून कोटांत जाऊ द्यावा की काये ते आज्ञा केली पाहिजे हे विज्ञाप्ति.

¶*The enquiries made with the Portuguese soldier of the fall of Mandavi are communicated to Chimaji Appa. The writer asks for orders whether that Portuguese soldier should be allowed to go back to the fort.*

---

*No. 63*] [*About 4-5-1737*

श्री

चिरंजीव वासुदेव जोशी यासी नारायण जोशी आशिर्वाद उपरी. प्रात:कालीं रामाबराबर पत्र पाठविलें आहे त्यावरून कलेल. हल्ली वर्तमान आलें आहे. मुंबईहून लाहान साहान होडकीं मिलऊन जागांजागां रवाना केलीं आहेत. अरनालियास तीन गलबतें, माणूस १००; मढ, वेसावें गलबतें पांच, माणूस १००; वसईस दोनशेंपावेतों माणूस रवाना केलें आहे. कळलें पाहिजे. वरकड मांडवीकर फिरंगियांस कौल देऊन गलबतांत बसवावा ऐसा करार केला होता; त्याप्रमाणें त्यास वाटेस लाविला. पावावयास[1] केशव सजणाजी दाहावीस माणूस बराबर दिलें होतें; त्यांजवर राजश्री शंकराजी केशवानीं स्वारी पाठविली तों इतक्यांत फिरंगी गलबतांत बसिला. मागाहून त्याचेहि स्वारीचे लोक चढों लागले तेव्हां फिरंगी यांनीं बंदुखां संभाळून आवाज केले. शंकराजीपंताकडील दोघे ठार झाले. फिरंगी निघोन गेले. केशव सजणाजीस शंकराजीपंतीं बलाऊन मार दिला, फार मारिला आहे. राजश्री बरवाजी पाटील याणी पालखींत घालून भिवंडीस पाठविला; मारिला फार आहे, ऐसें वर्तमान आलें आहे. कौल देऊन वाटेस लाविला त्याजवर स्वारी पाठवावी, हा कोण विचार? पावावयास गेला त्यास मारावें हेंहि गोष्ट अनुचितच आहे. काय समजोन गेले असेल तें नकळे. बहुत काय लिहिणें हें आशीर्वाद. शुक्रवार दिवस प्रात:काळचा प्रहर १॥

¶*Narayan Joshi writes to Vasudeo Joshi about the reinforcements sent to various centres, viz., Arnala, Vesave and Bassein. He further gives the news about an unwarranted attack by Shankraji Keshao on Keshao Sajanaji who was asked to accompany the Mandviker Firangi.*

---

१ पोचवावयास.

*No. 64*] [*18-5-1737*

छ २८ मोहरम

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सवेसी

सेवेसी आज्ञाधारक कृष्णाजी महादेव मोकाम वानरें सां नमस्कार विनंती. ताा छ २८ माहे मोहरमपावेतों स्वामीचे कृपादृष्टीकरून सेवकाचें वर्तमान व मोर्चे मजकूरचें वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन आलों. आज्ञेप्रमाणे राजश्री खंडोजी माणकर सुभेदार यांसी सांगितलें. आज्ञेप्रमाणें मोतीचे देवळाचें काम चालीस लाविलें. छेपरबंदी जाली पाहिजे. सुतार नाहीं, तरी सुतार ४ व लोहार २ एकूण सा आसामी येका महिन्याचे मुदतीनें पाठविले पाहिजेत. काम खोटी जाले असे. वरकड मोर्चीचे वर्तमान तरी मोर्चे तोफांचे देखील सिध्ध जाले. तोफा अद्याप आल्या नाहीं. प्रजन्याचें अवसान तरी आजी दोनी दिवस प्रजन्न लागतो. लोकांस वाहाणा कांबळे नाहीं व रोजमुरा येत नाहीं. यामुळें गवगवा करितात. सरंजाम करणार स्वामी समर्थ आहेत. विशेष. फिरंगियांची गलबतें आठ नव धारावीकडून काली रात्रीस माहीमास आलीं. वानरें याचे बुर्जावरून फिरंगियानें हाक मारून सांगितले कीं आज उद्यां तुम्हावरी चालोन येतों. तुम्ही खबरदार राहणें. धारावीस फिरंगी गेला होता तोच येथें आला असे. कोण्हे समई बाहेर पडेल किंवा न पडे हें न कळे. बरकंदाज १०० सेंभर यास देविले होते तेही अद्याप आले नाही. त्यास आज्ञा करून पाठविले पाहिजे. व येथून लोक से पनास ठाणियास गेले आहेत त्यांस ताकीद करून पाठविले पाहिजे. वरकड पुण्येप्रताप स्वामीचा समर्थ आहे. यथाज्ञाने चाकरी करीत असे. सेवेसी श्रुत होय, कृपा वर्धमान केली पाहिजे हे विज्ञाप्ति.

¶*Krishnaji Mahadeo to Chimaji Appa, informing him of his instructions being duly communicated to Khandoji Manker. He further writes that the enemy had gone to Dharavi but had returned to Mahim with some ships and expressed his desire of making an attack the very next day.*

---

*No. 65*] [*18-5-1737*

पोा छ २८ मोहरम जाबसुद

श्री

श्रीमंत राजश्री आपा साहेब स्वामीचे सेवेसी

सेवेसी आज्ञाधारक समस्त सरदार व लोक मोा वानरें चर्णावरी मस्तक ठेऊन विनंती. ताा छ २८ मोहरमपावेतों स्वामीचे कृपादृष्टीकरून सेवकांचे व

मुर्चेमजकूरचें वर्तमान येथास्थित असे विशेष. आज दोन दिवस प्रजन्न लागतो लोकांस घर खोपट बिऱ्हाड नाहीं. झोलणे भिजलें. याकरितां मनुष्य हैरान होतें. हें सामान साहेबांचे पदरींचे मधिलेमालीं[1] जायां होतें. येथें सरदारांस विचार पुसावा तरी त्यांसहि सुचत नाहीं. याकरितां सेवेसी विनंती लिहिली आहे तरी स्वामींचे सामान जतन होये आणि गनिमास नतीजा पावे यैसा विचार करून जागा-योजोन पाठविला पाहिजे. चौवे भले लोक च्यार गोष्टी साहेबांस सांगतील परंतु सामान मेलवणें साहेबांसच लागतें याजकरितां ये गोष्टीचा विचार स्वामीनेच केला पाहिजे अथवा सेवक लोकांस आज्ञा केली पाहिजें कीं जेण्हेंकरून सामान जतन होये आणि गनिमास नतीजा बसे व साहेबांचा रंग राहे यैसे स्थल योजोन राहावें. हे स्वामीचे चित्तास येईल तरी आज्ञा केली पाहिजे. समस्ताचे मत्तें जागा योजोन अलंगा[2]·बांधोन. सहश्र पत्रांचे जागां हें पत्र मानून आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये कृपा वर्धमान केली पाहिजे हे विज्ञाप्ति.

¶*Chimaji Appa is requested to erect temporary quarters for the soldiers as they were badly exposed to rain.*

---

*No. 66*] [*About 20-5-1737*

श्री

पुा श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनती यैसीजे. स्वामींनी आज्ञापत्र पाठविले तेथे आज्ञा की साष्टीची घांटं[3] तुम्ही नेता म्हणौन विदित जाहाले तीं न नेणें. फटकडिया[4] वोतावयासी रा बारवाजी ताकपीर याचे स्वाधीन करणे म्हणौन अज्ञा केली. त्यासी अम्ही सास्टीची घाट आणिली नाही. रा खंडोजी माणकरानी दोघा चउ घाटा दिल्या. आम्हासहि येक घाट तिरंदाजची (?) देविली. त्याचा कागद आहे. आम्हीं उतरून आणिली. कोणाची चोरून अगर जोरावारीन आणिली नाही. स्वामीस पाहिजेसी असल तर कल्याणीत ठेविली आहे. घाटेन आमचा संसार होणे नाही.

---

१ मधल्यामधें. २ बराकीवजा खोपटी.

३ साष्टीच्या लुटींत मिळविलेली पोर्तुगीज देवळांतली असावी. या घांटा फार मोठमोठ्या असत. भीमाशंकराचे देवळांतल्या घाटेवरहि पोर्तुगीज अक्षरें आहेत. ४ एकप्रकारची तोफ.

संसार चालवणार स्वामी समर्थ आहेत. आमचे गावी श्री सिधेस्वर स्वयेंभ स्थान आहे. घाट स्वामीची पुन्य स्वामीचे आहे. कृपा करून दिली तर माहालई कीर्ति स्वामीची आहे. बहुत काय लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*In reply to Chimaji's letter, the writer submits that he has not forcibly carried off any bell but has been given one by Khandoji Manker. If it is required it may be taken away from Kalyani where it is kept. The writer is Tubaji Anant.*

---

*No. 67*] [*20-5-1737?*

छ २ सफर

**श्रीशंकर**

**पुरवणी श्रीमंत माहाराज राजश्री आपा**
**साहेबाचे सेवेसी**

विनंती कीं आज शुक्रवारीं दोन प्रहरीं साहेबास पत्र लिहिल्यावरून दोन प्रहरीं फिरंगियाचीं तारवें दाहा पंधरा मणोहराचे खाडींत येऊन बसला. त्यास लस्करांत आरोळी जाहली कीं फिरंगी आला त्यावरून आपण स्वार व पावलोक व जेजाला घेऊन गेलो. त्यास आवजी कवडेहि व बरवाजी ताकपीरहि आले. त्यास फिरंगी यासी आम्हासी सर्जून येक प्रहर युध्ये बहुत कठीण जाहालें फिरंगी तारवांतून पायेउतारा होऊन आम्हावर चालोन घेतले. त्यास साहेबाचें प्रतापें त्याचा गर्व परिहार करून मागती तारवांवर घातलें. त्याजकडील शेंपंनास माणूस जखमी जाहालें, व दाहा पंधराजन ठार जाहाले. व आपणांकडील राजश्री आवजी कवडे याकडील घोडीं दोन व माणूस १ येक यैसीं तिघेंजण जखमीं जाहाले. साहेबास कळावें. वरकड येथें जी सेर्त (शर्थ) करावयाची ते केली. साहेबांस परस्परें कळों येईल, त्यावरून विदित होईल. बहुत काय लिहूं? कृपा केली पाहिजे हें विज्ञप्ति.

¶*Letter to Chimaji Appa, reporting an engagement between the forces of Barvaji Takpeer and the Portuguese near the creek of Manohar.*

---

*No. 68*] [?

छ २१ मोहरम

**श्री**

सेवेसी विनती. मनोर परगणियात केलवे माहीम तारापूर काही डाहाणूकडील रयेत येते त्यास असेरीकराचा उपद्रव होतो म्हणून राजेश्री होनाजी बलकवडे याचे

---

१ महादेवाच्या देवळांत. + पत्र लेखक तुबाजी अनंत. २ झुंजून.

पत्र आले की मनोर बांधावे लागते त्यास उत्तर पा। म्हणून त्याणी लि। आहे. त्यास याचा विचार काये तो लिहिला पाहिजे. मा।निले ते मनोरास गेलेच आहेत त्यास स्वामीचे आज्ञेचा मार्ग[१] पाहावा लागला आहे. त्यास विचार लि। पाहिजे. हे विज्ञापना,[+]

¶*Chimaji is requested to stop the troublesome activities of the Portuguese at Aseri as it caused much distress to the ryots of Pargana Manor.*

---

*No. 69*] [*29-8-1737*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी

आज्ञाधारक खंडोजी माणकर साष्टांग दंडवत विज्ञापना. ता। छ १३ जमादिलोवलपावेतों स्वामीचे कृपावलोकनेकरोन वर्तमान येथास्थित असे विशेष. फिरंग्याची रवानगी अरमाराची जाली म्हणोन मुबईहून तहकीक[२] बातमी आली. इंग्रेजास लि। आलें. गनीम अमवाझ्याअलीकड अगर पलीकडस खामखा यावें[३]. त्यांत फिरंग्याचा आशेये आपले ठाणे म्हणायास गेले याकारितां येक वेल सिन्यांचा[४] कोट करणे तो सर्वांनी मिळून ठाण्यासच झटावे मारावे मरावे. आपली तपसामग्री वेचावे. हा विचार करून विजयादसमीआलीकड आल्यानी कार्ये साध्ये होईल पुढें फौज उतरतील यासाठीं तातड करणार. गनीम हांवेंभर[५] आहे. त्यास तो बेधडक येखादे जागा तोंड टाकील तेथे मारून खर्च व्हावे गइबत (?) करून खरडून काढावे तेव्हा हालखुद[६] राहील याचा विचार स्वामीचे पुण्यप्रतापे करून होईल. संदेह नाही. परंतु गनीम दगेखोर आहे. आपले जागा सावध असावे. घोडबंदर जागा आशेर प्रा। बांधित आव्हो. पडला झडला प्रजन्यामुळें वरचेवर बांधावेच लागतें. ते फुटके भांडे. सिन्याचा कोट करून राखावे. त्यास शेवकच ते ठिकाणी आहे परंतु पाणबुरुज ठाणे सारा जीव आहे. आमचा जीव दोंकडेस लागला. रात्रदिवस काळजी वाहावी लागते. येकवेळ स्वामीचे प्रतापेंकरून येश प्राप्त होईल तोच सुदिन म्हणावा. नाहींतर मरण बेहतर आहे. स्वामीनी कृपा करून पाचसातसे निवडुक माणूस खामखा इतक्यांत येऊन पावे

---

१ वाट.

+ पत्र शंकराजी केशवाचें चिमाजी आपास.

२ खरी, विश्वसनीय.

३ यावा.

४ छातीचा.

५ आवेशानें बेफाम.

६ ठिकाणीं, ठीकेठाक, नरम.

तो अर्थ करावा. दुष्ट स्वप्न देखिल्याने सावध असावे, उतम आहे. याउपरी फिरंग्याकडील कागद आला तोच बजिनस पाठविला आहे. त्याणी तहरह करितां मुबईकरावर टाकिले असे. तेथेच आपणाकडील कोणी पाठवावे म्हणोन लिा असे त्याविशी आज्ञा करणार स्वाम धणी आहेत. शेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Khandoji Manker informs the Peshwa of the equipment of the Portuguese and the probable day of attack and in view of the aggressive attitude adopted by them, makes a timely suggestion regarding the proper defence. Towards the end of the letter he incidentally refers to a letter from the Portuguese regarding the peace-negotiations.*

---

*No. 70*] [पो *10-9-1737* ?

पाा छ २९ जमादिलैावल

जाबसूद

**श्रीपांडुरंग**

**श्रीमंत राजश्री पंतप्रधान साहेबाचे सेवेसी**

विनंती. सेवक दमाजी गायकवाड समसेरबहादर सेवेसी विज्ञापना विनंती उपरी. येथील क्षेम ताा १२ जमादिलौवलपावेतों साहेबाचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे. यानंतर साहेबी कृपा करून राजश्री गोविंदे[१] गोपाल याजबराबर पत्र पाठविले ते उतमसमई प्रविष्ट होऊन बहुत समाधान जाले. फिरंगी यानी हिंदूधर्मास छल आरंभिला. त्यामुले राजश्री आपा याणी स्वारी करून येक दोन स्थले हस्तगत केली. वसई वगैरे येक दोन स्थले राहिली ते दस्त[२] करणे लागतात. याजकरितां आरब व जेजाला व गोलदाज व दारूगोला वगैरे जिनस पाहिजे. त्याचा प्रेत्न करून पाठवणे म्हणून लिहिले. यैसियासी जेथे जिनस मिले यैसे होते तेथे पत्रे पाठविले आहेत. जे साहित्य होऊन येईल ते प्रविष्ट होईल. राा गोविंदपंत यास सुरतेस पाठविले आहेत. त्यास पत्रे दिल्ही आहेत. तेथे अनकूलता होईल ते करितील. मातुश्री बाईसाहेबी वरात दिल्ही त्यापैकी दाहाहजार रुा ये मारनुले चे हवाला केले. राहिले साडेसोला हजार तेहि पावते करून. येथील कितेक अर्थ राजश्री गोविंदपंत याणी सेवेसी विनतिपत्र लिहिले आहे त्याजवरून श्रुत होईल हे विज्ञापना.

¶*Damaji Gaikwar congratulates the Peshwa on the successes attained by Chimaji Appa over the Portuguese and further promises to send men and munition as desired by the Peshwa for further conquest.*

---

१ (?) २ ताब्यांत घेणें.

No. 71] [12-9-1737

श्री

राजश्री संताजी जाधव गोसांवी यांसी

॥ अखंडितलक्ष्मीआलकृत राजमान्य श्रीा पिलाजी जाधवराव. रामराम. सुा समान सलासीन मयां व अलफ. तुम्हास वसईचे कामगारीस रवाना केले आहे. ऐशियास तुम्ही घाटावरी यावयाची तातड कराल तरी न करणे. राजश्री बाजीराऊ वरते कदाचित आले (तऱ्हीं) तुम्ही न येणे. तुम्हास मुबदले[1] पाठऊन वरघाटे बोलाऊन तेव्हाच येणे. तुम्हास मुबदले व आमचे पत्र येईतोपर्यंत आवघे लोक तेथेच राहाणें. जाणिजे छ २७ जमादिलोवल. बहुत काय लिहिणे.

(शिक्का व मोर्तब)

¶*Santaji Jadhao is addressed by Pilaji, who asks him to stay in Konkan and not to come up.*

---

No. 72] [Octo.-Nov. 1737

छ २३ मोहरम

श्री

सेवेसी विनंती. कामावर माणूस खपतात पोटास नाही. पोट दाबितात. माझें कैदीमुळे मात्र आजीताा लोक राहिले आहेत. आम्हास श्रमे[2] तेच की माहीम सिरगावास लोक गेले होते ते फिरंगियाचे भये पलोन गेले. स्वामीचा मनसबा फसला. तसे आम्ही न करिता आमचे प्राक्तनास गलिमामुळे हे गोष्टी येते. सारे लोक बहादरपुराचे पलाले तरी अपण जातीने येथे राहीन. मग गनीम काये करणे ते माझे करूत. कल्याणप्रांते माहागदाणा विकावयासी अहे. दोहो पाइलीने सवंग विकावयास नाही. आजीपावत कल्याण भिवडीस गला मिलाला पुढेहि मलेसा आहे. अम्ही अदावतीने[3] लिहून तरी अपले केले पावोन. दरगावी टोणगे बैल रयतीजवल पाठवल आहेत. याउपरी लोक पलतात. जातीने बहादरपुरियासी राहून. लोकास पैसा नाही दाणा नाही. कोटावर चौकीदार ठेवावे ये कामास दाणा विकत मिलाला अण स्वामीनी सोळाशे खंडी

---

१ बदली माणूस. २ वाईट वाटते. ३ द्वेषाने, आकसानें.

गला पा त्याखेरीज दोनसें बहादरपूरचे लोकाचे बेगमीस रवाना तलास करून करविला म्हणजे अठरासे खंडीनें अश्विनमासपावत बेगमी होईल. राउतास दोन मास रोजमरा अगाऊ आजी द्यावा म्हणजे बेगमी होईल हे विज्ञापना.+

¶*Shankraji Keshav Phadke on being severely reprimanded by the Peshwa for his cowardly retreat from Mahim assures him that he would now stick up to his post to the last minute. The writer is camping at Bahadurpur and asks the Peshwa to replenish his treasury and store of grain both of which are completely depleted.*

---

*No. 73*] [*3-11-1737*

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनति सेवक मल्हार हरि कृतानेक साष्टांग दंडवत विनती. येथील क्षेम ता छ २० रजब मुकाम मौजे बेटेगांऊं प्रांत तारापूर नजीक पांच कोस स्वामीचे कृपाद्रष्टीकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. हिलालपूरचे मुकामाहून सविस्तर सेवेसी लिहिले आहे त्याजवरून निवेदन जाहालेंच असेल. तेथून आज्ञेप्रमाणें मुकामाचीं मुकामें करून रविवारीं मौजे माण प्रां मजकूर नजीक साहा कोसांवर छ १७ रजबीं येऊन मुकाम केला. आज्ञेप्रमाणें तारापुरास दुसरे दिवसीं जावें त्यास राजश्री विठलपंत केळवियास जाऊन गुंतले. यामुलें त्याची भेटी जाली नाही आणि राजश्री शंकराजीपंत याचें पत्र वसईहून आलें व रा माहादाजी केशव यांणीं केलवियाहून चिरंजीव खंडो चिमणाजी यास पा कीं इंग्रेज व फिरंगी मुंबईस येकत्र होऊन वसईच्या मोर्च्यावर येणार त्याचा हात आपणास धरवतो असा अर्थ नाहीं. तरी तुम्हीं तांदुलवाडीचे नैॠत्येस चहू कोसांवर जळसार आहे तेथें मुकाम करून राहाणें. आणि आरनालियाचीं इशारतीचीं[1] भांडीं पांच होतील त्यासमई दातिवरेयांस गलबतांवरून उतरून आमची मदत करणें म्हणून सांगोन पाठविलें. त्याजवरून दोन दिवस मुकाम केला. तिसरे दिवसीं रा माहादाजी[2] केशव केल्याहून जमावसुधा उठोन वसईस गेले. राजश्री विठलपंत आम्हाकडेस भेटीस आले. बेटेगावचे मुकामीं त्यांची भेट जाली. दुसरे दिवसीं रा शंकराजीपंताचे सांगितल्याप्रमाणें जलसारास जावें त्यास दातिवरेचे मुकामचें पत्र माहादाजी केशव यांचें आलें कीं पेशजी जलसरावर येऊन मुकाम करणें म्हणून वसईहून व आपण लिहिलें होतें, त्यास आम्हीं अगदींच

---

\+ लेखक :—शंकराजी केशव. १ तोफा. २ शंकराजी केशवाचा वडील भाऊ.

केल्याहून उठोन वसईस गेलों. तुम्हीं जलसारास न येणें आपल्या कार्यास जाणें म्हणून आज पाहाटेचे प्रहर रात्रीस पत्र आलें त्याजवरून तिकडे जावयाचा विचार ठेऊन आपण व राजश्री विठलपंत येकत्र होऊन तारापुरास जावे त्यास दारूगोलीचे साहित्य समागमे आले नाहीं; पोख्ता सामान त्या स्थळास असावा तो आलियावर तेथे जाऊन. सेवेसी निवेदन होये हे विज्ञापना.

¶*Malhar Hari explains why he was detained in his march upon Tarapur and asks Chimaji Appa to equip him with plenty of ammunition.*

---

*No. 74*] [*4-11-1737*

**श्री**

**श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी**

विनंती सेवक मल्हार हरि साष्टांग दंडवत. ता। छ २१ रजब मुकाम मौजे बेटेगाऊ स्वामीचे कृपेकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. पूर्वपत्रीं मौजे सिरगावांवर स्वारीस जातों म्हणऊन लिहिलें आहे. त्यास विसावे रोजीं रात्रीस आमचे व राजश्री विठलपंताचे मतें सरदारच पाठऊन स्वारी करावी, त्याजवरून रा। आपाजीराऊ खानवीलकर यांजबा। वरकड माणसाची निवड करून सातसें माणूस इकडील व तीनसें माणूस विठलपंताकडील ऐसें हजार माणूस चंद्रोदई रा। केलें. दारूगोलीचें साहित्य मुतलखे[1] नव्हतें. त्यास विठलपंताकडील दारूगोली घेऊन दर आसामीस तीन तीन बारांची दारू व गोल्या देऊन रा। केली. त्यास उजेडतां यांची त्यांची गाठ पडली. माडीच्या दरवाज्यापावेतों लोक मारीत गेले. लोकाहीं कस्ते[2] बरीच केली. आपल्याकडील दोन ठार व १२ जखमी जाहाले. गनीमाकडील सात ठार व गडीतील कितीक ठार कितीक जखमी हें न कले. माडीचा मार चुकाऊन आंगांसीं[3] गेले. कार्य जाहालें होतें परंतु तीन तीन बाराची दारूगोली दिल्ही ते सरली. याउपरी आणखीं दारूगोली मागावयास लागले तों साहित्य नाहीं, याजकरितां गोड्यां[4] हात्येरानें लोकांचा टिकाव कैसा होईल? आणखी दारूगोलीखेरीज तेथें दुसरा उपाय नाहीं. याकरितां केलें

---

१ मुदलींच, मुळींच. २ मेहनत, मर्दुमा. ३ कोटाच्या, माडीच्या.

४ भाला, तरवार वगैरे हें सर्व गोडे हतेर व बंदुक तोफ हें उडते हतेर. जसे गोडी फौज म्हणजे शिलेदारांची भाला तरवार घेऊन लढणारी फौज.

काम टाकून दीडेकसें ढोरें घेऊन बेटेगांवचे मुकामी तळावर आले. इतक्यात दारूगोली सामान आले तरी माडी कठीण आहे. परंतु स्वामीचे पुण्यप्रतापे हस्तगत होईल. विदित होये हे विज्ञाप्त.

¶*Malhar Hari writes to Chimaji Appa how he owing to the shortage of ammunition, had to break off a battle in which his own men and those of Vithalpant were engaged. He therefore asks for more ammunition.*

---

*No. 75*] [?

श्री

आशीर्वाद उपरी उदेक कोहजेपुढें दोन कोस जाऊन मुक्काम करणे. परवा सकाळच्या प्रहरा सा घटकांत बरानपुरास दाखल होऊन. फिरंगी याचे लोक असतील त्याचा निपात करणें. तैसेच तारापुराकडील रस्ता अखेरीस वाहतो तो तारापूरपर्यंत जाऊन मारणें, तदोत्तर माहिमाकडील वाट चालत असेल तर कांहीं स्वार पाठवून तिकडील परा[१]मर्श करणें. सारांश परवा बरानपूरच्या लोकांचा निर्वाह करणें व तारापूरचा रस्ता मारणें. एके दिवसांत दोनीं गोष्टी उरकणें. वाटेचे माहित राऊत राजश्री पंताजी मोरेश्वर तुम्हाजवळ पाठवितीलच. छ[+] १ जिल्काद हे आशीर्वाद.

¶*Chimaji Appa gives some directions regarding the capture of the enemies, forts and guarding the road from Asheri to Tarapur. The letter may have been addressed to Ramchandra Hari.*

---

*No. 76*] *[12-11-1737*

पौ छ १ शाबान

राजश्रियाविराजित राजमान्य

राजश्री रामचं[२]द्रपंत स्वामींचे सेवेसी

सेवक चिमणाजी बापूजी कृतानेक सा। नमस्कार विनंती. येथील क्षेम तागायेत मार्गसीर्ष सुध प्रतिपदा मंदवार पावेतों मु॥ माहीम क्षेमरूप असो विषेष. आपले आगमन सेनेसहवर्तमान या प्रांते जाहले. देहरजेचा मुकाम कालचा होता. आज

---

१ बंदोबस्त.

+ हातचिठी चिमाची आपाची.
येथून अक्षर खास आपाचें.

२ रामचंद्र हरी पटवर्धन.

ब्‍न्हाणपुरावर येणार म्हणऊन राजश्री पंताजीपंत यांचें पत्र रा॥ माहादाजीपंतास आलें त्यावरून वर्तमान कलोन संतोष जाहाला. यैसियासी परस्परें यैकितो कीं आपण तारापुरचें रोखें जाणार; तरी त्या प्रांते प्रस्तुत कार्य आहे यैसे नाहीं. रा॥ लाडोबानी सिरगांवावर मोरचे दिल्हे आहे. माहिमापासून सिरगाव दीड कोस आहे. आपण आधी या प्रांतेच यावयाचा विचार करून सत्वर आलें पाहिजे. परस्परे भेटी होतील. वर्तमानहि सविस्तर येथील चितांत आणून मग काये विचार कर्तव्य तें करावें, या करितां सत्वर आलें पाहिजे. येथें अद्यापि मोर्चे कायेम नाहींत. आपण पत्र पावताच येथे उदईक येऊन पोहचले पाहिजे. भेटीनंतर येथील विचार मनास आणून जे कर्तव्य ते केलें पाहिजे. बहुत काय लिहिणे कृपा लोभ असो दीजे. हे विनंती.

---

*No. 77]* *[1737?*

**श्री**

**पुरवणी श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेशी,**

विनंती उपरी. सिरगावचे माडीचा विचार तरी मनोहराच्याच प्रतीची जागा आहे. आसमंतादभागीं शहर वसले आहे. पांचेकसें घरें व आगर नारळी पोफली पानवलीचा[१] आगर आहे. मोर्चे द्यावयास दडण बरीच आहेत. मोर्चे देऊन काम झाल्यास केळवे माहीमचा उपराळा होऊन पायबंद तोडिलासाच होतो. माहीमचे उतरभागी दीड कोसावरी समुद्र किनारियाची जागा आहे. माडीवर तोफा ७ सात त्याजमध्यें दोन मोठ्या व पाच लहान व दोनकसे माणूस माडीवर झुंजते आहे. दुतर्फा दोन खाड्या आहेत. जागा बांका आहे याकरितां आधी हाच जागा फते करून माहीमास पायबंद द्यावा, ऐसा विचार करून दारू गोलीच्या साहित्याविसीं रा॥ माहादाजी केशव यांस लेहून पाठविलें आहे. त्यांजकडून साहित्य होऊन आल्यास सिरगावास एक दोन रोज बसोन काम फते करितो. हुजुरचे साहित्य दारुगोलीचे रा॥ करविले ते अद्याप आले नाहीं. दारुगोळीविना मोर्चीयाचें काम कसें होते? दारुगोलीची बेगमी पोक्त करावी. दारुगोली स्वामीनी पाठविली आहे ते येऊन पोहचली. याउपरी तारापुरास जाऊन बसतो. वरकड दाण्यागल्याचा आटोप करणे तसा केलाच आहे. खाडी किनारेचे गाव बहुतेक

---

१ पानवेलीचा.

पर्जन्याकरिता मयत सेतें जाली आहेत व मुलूखहि वैरान आहे. जेथे पीकदाव[१] व वस्ती आहे तेथे बंदोबस्त केला आहे. वरकड जेजाला पाठवावयाची आज्ञा जाली होती त्याहि अद्याप आल्या नाहीं, बरें जालें नाहीं. एवंक्रमेण सरंजामाची हेळणाच दिसते. अस्तु. एकादे जागा सेवक जातीनसी खर्च होईल. परंतु ध्योजतीने[२] तोंड दाखवील ऐसे नाही. याउपरी सेवकाचे साहित्य सर्व प्रकारे करून सेवा होऊन येई ते करणार स्वामी वडील आहेत. स्वामीच्या चरणायितिरिक्त दुसरा अवलंब अथवा कैपक्ष करी ऐसा कोणी नाहीं. सेवेसी निवेदन जाले पाहिजे. बहुत काय लिहूं हे विज्ञापना.+

¶*Letter describing the military position of Mahim and places in the vicinity.*

---

*No. 78*] *[13-11-1737*

**श्री**

**राजश्रियाविराजित राजश्री रामचंद्रपंत स्वामी गोसावी यासी**

पोष्य मल्हार हरि दंडवत प्रा॥ विनंती. येथील कुशल जाणून स्वकीय लेखन केले पाहिजे विशेष. आपण देहेरजेची मु॥ हून पत्र प्रा॥ तें आजी छ १ माहे साबान त्रितीय प्रहरी सिरगावचे मुकामी प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत जाहाला. येशास आज (?) येजमानाचे आज्ञे प्रा॥ मजल दरमजल येऊन पोहचलो. * * स्वामीकार्यास अंतर पडिले आणि येईल उद्या येईल येसा मार्ग लक्षिता बारा तेरा दिवस फुकटच गेले. तेव्हा राजश्री शंकराजीपंत याजकडून कांहींची पाविली[३] व कांहीं विठल विश्वनाथ याजकडून वेऊन सिरगावचे कोटाचे काम उलगडावे या विचारे आजी * * दिवस येऊन बैसलो आहो. दिवसेंदिवस मोर्चे चालवीत असों. कोटावर सात तोफा आहेत. कोटहि मजबुत आहे मनोहरापेक्षां दिढीने उच आहे व आरमारची पाठहि * * माहिमास व आम्हास येका * * * अंतर आहे. प्रयोजन प्रसंग * * जेनसी मदत होत आहेत. माहिमास रा॥ माहादाजीपंत व कर्णाजी सिंदे व चिमणाजी बापूजी व खंडोबा येसे आहेत. त्यास आम्हास अंतर नाहीं. आम्हाबराबर सुरराव व मलोजीकडील राऊत राणोजी सिंदे २३ येसाजी अनंत ४८ सुरराव यादव १९ खंडनाक १३ येकूण येकसेतीन आहेत. मालोजी आला नाही. आम्ही अल्या[४] (त्या) फौजेनसी व हशमानसी गमिमास चौगीर्दा[५] मोर्चे देऊन घेरून

---

१ ripened corn.

२ फजितीने.

+ लेखक बहुधा वासुदेव जोशी किंवा मल्हार हरी.

३ काही शिपायांचा पगार दिला.

४ आहे त्या ? अ (प) तया ?

५ चोहोंबाजूंनीं.

बसलो आहो. येकादो दिवसी कार्यसिधि होऊन यावी येसें आहे. गनिमास ज्याहाजाची मदत होत आहे. ज्याहाजावरून व कोटावरून लोकांची मारगिरी बहुत होत आहे. लोक कष्टमेहनत बरीच करीत आहेत. होणे जाणे ते खावंदाचे पुण्यप्रतापे होईल. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Malhar Hari to Ramchandra Pant that he has engaged the enemy at Sirgaon and hopes to carry the place soon.*

---

*No. 79]* *[16-11-1737*

**श्री**

**श्रीमत राजश्री आपा**
**स्वामीचे शेवेशी**

विनंती शेवक रामचंद्र हरि साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम ता छ ४ साबानपर्येंत मो सिरगाऊं वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन निघालों ते मालसेजेचे घाटे खाली उतरोन मजल दर मजल किले आशरीस आलों. राजश्री पंताजीपंत व राजश्री हरिपंत या उभयतांचे भेटी जाहाल्या. त्यांही सविस्तर वृत सांगितला. मोर्चे किल्याखालें चौकडून गेले आहेत. उभयता प्रेत्नास चुकत नाहीं. रामनगरेयांकडून किले मजकुरावरी सामान पाववितात म्हणून स्वामियासी कोणी सांगितले ते गोस्ट येथे पाहाता मिथ्या दिसते. त्याकडील रा भगवंतराऊ हे बहुत कस्टी होत आहेत. त्याचे व यांचे बहुतप्रकारे समाधान करून सांगितलें. तेथून निघोन मनोरास आलों. रा विठलपंत भेटले. त्यांचे शरीरी आरोग्य नाहीं याकरितां घरास आले होते. त्यांची आमची भेटी जाहाली. त्याकडील सविस्तर वृत ऐकिले. तेथून सिरगावांस आलों. राजश्री मल्हार हरि याचे दर्शन जाहाले. गावास मोर्चे दिल्हे आहेत ते आम्ही जाऊन पाहिलें. चोकडू(न) गीर्द केले आहे. स्वामीचे आसर्वादेकरून सत्वरीच कार्येसिधी व्हावी येसे आहे. सिरगाव फ़ते[1] जाहाली. माहीम केलवियाकडील वर्तमान तर पूर्वी तो रा माहादाजीपंत व कर्णाजी सिंदे आले होते त्यास केलवियावरी बैसले होते. त्यास गनिमाचे आवाईचे वर्तमान काही रा शंकराजीपंत यास आले की पापडीवर गनीम. ते समई त्याचे पत्र यास येताच हे उठोन दातिरव्यापावेतो गेले तो वर्तमान काही नाहींसे जाणोन पुना परतोन अले तो मागती केलवियासच बैसले. अणखी[2] वर्तमान गनिमाचे

---

१ फत्ते झाल्यादाखलच आहे. २ पुन्हा, फिरून.

येताच केलेली मोर्चेबंदी टाकून पुनरपि दातिरवेपावेतो गेले. तो अणखी खबर मिथ्या जाहाले. त्यावर माघारे परतोन आले त्यास फौजेनिसी रा चिमणाची बापोजी अले. त्याची याची भेट होऊन हे व ते येकत्र होऊन माहीमचे तलेवर राहिले. तेथू (न) गावात सिरोन गावातील लोक वाडियात घालून गावची घरे जालून झापे मोडून अडचण रान तोडून येक मोर्चा गोलीचे टपेवर घातला अहे. त्यास स्वामीची आज्ञा होती की पहिले हुरपेसरसे केलवियावर जाऊन तेथेच मोर्चेबंदी करून ते स्थल आधी घेणे, मग माहीम झेपावले[1] तर बसणे[2]. नाही तर गोलेचे टपेवर मेढा घालून तेथे लोक ठेवणे. ऐसियास इतके दिवस तो घालेमिलेखाली[3] गेले. आता येक मोर्चा बसला हा कहाडून केलवेस नव्या (न्यावा ?) तर हलकेपण दिसते. [ पुढील मजकूर गहाळ.]

¶*Fragment of a letter from Ramchandra Hari to Chimaji Appa informing the latter of the progress of sieges at Asheri, Mahim, Kelwe, etc.*

---

*No. 80*] [*16-11-1737*

श्री

श्रीमत राजश्री आपा स्वामीचे शेवेसी

विनंती. सेवक रामचंद्र हरी नमस्कार विनंती. येथील वर्तमान तागाइत छ ४ माहे शाबान मोकाम सिरगाव, नजीक माहीम, येथास्थित असे. या नंतर स्वामीची अज्ञा घेऊन आलो ते मालशेजेच्या घाटे उतरोन मजल दरमजल अशेरीवरून आलो. येते समई अमदवाडीस राजश्री हरिपंत होते त्याची भेट घेतली, तेथे जवारकर याकडील रा भगवंतराऊ होते. त्याची भेट जाहाली. त्यास ते स्वामीचे शेवेमधे येकनिस्ट आहेत. जवारकराचा फितवा आहे म्हणोन स्वामीपासी वर्तमान, या करिता ते बहुत श्रमी जाहाले. त्यास शोध मनास आणिता राजश्री हरिपंत यानी त्याचे येकनिस्टेचे वर्तमान सांगितले, व मोर्चेहि बिकट कडियास लाविले आहेत. मग भगवतराऊ यासहि अम्ही समाधान करून सांगितले की तुम्ही यकनिस्टपणे वर्तणूक करिता हे शेवेसी लिहून पाठविती म्हणोन सांगितले. त्यावरी मदनवाडीस राजश्री पंताजीपंत याकडे अलो. त्याचीहि भेट जाहाली. त्याचे मोर्चेहि बरेसे कडियास गेले अहेत. अर्ध कोसावरून पाणी मोर्चेकरी पितात. त्यानीही जवारकराचे वर्तमान येकनिस्टेचेच सांगितले. मग तेथून निघोन मनोरास आलो. जे दिवसी हो बि र जे(?)-

---

१ झेपलें तर, तावडींत येईलसें वाटले तर. २ वेढा देऊन. ३ घालमेलीखालीं.

हून कूच केले तेच दिवसी किले अशेरी पाहून मनोरास मोकामास आलो. राजश्री पंताजीपंत यानी आपले वर्तमान सांगितले. त्याची पुर्वणी शेवेसी लिहिली आहे त्यावरून विदित होईल. अरब चालेनात या करिता येक मोकाम मनोरी केले. दुसरे दिवसी कूच करून असाह्याखालून येथे आलो. रा। विठलपंत याचे शरीरास समाधान नाही या करिता ते मनोरीच आहेत. त्याचे पुतणे व रा। बाळाजीपंत जमावसहित राजश्री लाडोबा याबरोबर येथे अहेत. राजश्री नारायेण जोसी याकडून लोक घेऊ रा। गोविंदपत अले अहेत. सर्व मिलोन सिरगावास मोर्चेबंदी करून बैसले आहेत. मलोजी थोरात याकडील राणोजी जाधव वगैरे राऊत या समागमे आहेत. स्वामीचे प्रतापेकडून सिरगावची फत सत्वरीच होईल.

*¶Ramchandra Hari assures Chimaji Appa of the implicit loyalty of the Javarker to the cause of the Peshwa.*

---

*No. 81*] [*17-11-1737*

छ १६ साबान

श्री

श्रीमत राजश्री आपा स्वामीचे शेवेसी

विनती. सेवक मल्हार हरी कृतानेक साष्टांग दंडवत विज्ञापना. ता। छ ९ माहे साबान मो। सिरगांव स्वामीचे कृपा दृष्टीकडून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. बेटेगावचे मुकामीहून विनंतीपत्रे पाठविली ती प्रविष्ट होऊन वर्तमान विदित जालेंच असेल. त्या आलाकडे छ २६ रजबी बेटेगावीहून कूच करून प्रात:कालीच्या प्रहर दिवसास सिरगावास येऊन तमाम गाव काबजात करून मोर्चे देऊन बैसलों आहो. आरोलीबराबरच कोट फते होईल म्हणौन इकडील माहीत जे होते ते म्हणत होते. परंतु सेवकें आपले नजरेने जागा पाहातांच म्हणणारांच्या गोष्टी तादृकच[1] आहेत ऐसे भासोंन आलें. तिहीकडेस आगर व येकीकडे पश्चमेस समुद्र. ठाणेयाच्या कोटापेक्षां सवाईनें उंचीस आहे व मजबूदहि आहे. च्यार बुरूज चौतर्फा व माडी येक व देऊळ येक. येकूण जबरदस्ती कोटावर सात तोफा. त्याजमध्यें दाहासेरी पके वजनाच्या दोन. पाचसेरी पाच. त्या खेरीज जेजाला गार[2]भांडी जंबुरे, उडते हातेर या रीतीचें व लोकांची भर्ती

---

१ ततक्याच, यथातथा, अर्थात् खोट्या. २ दगड मारावयाच्या तोफा.

म्हणावी तरी पाउणाकसे सोरटी, तसेच किरिस्ताव भंडारी व फिरंगी पनास येकूण दोनअडीचकसें माणूस. कोट आटोपसुध मनोहरा येवढा आहे. मनोहरास पाणी नाही व इमारत ठेंगणी. या स्थलीं इमारत पकी व उंच. लोकांची भर्ती चांगली. उपराला नसेल म्हणावा तरी कोशावरी दक्षणेकडे माहीम व उतरेकडे तीन च्यार कोशावरी तारापूर. आठ कोश उतरेकडेस डाहाणू. संपूर्ण पश्चमेस समुद्रातून अरमारांचा उपराला. येवंक्रमेण जागा बहुत नाजूक[1]. मोर्चेबंदी बरी मजबूत केलियाविना गनीम आयास येणार नाही यैसे जाणून चौतर्फा मोर्चे येकाकीच हातधोंडियाचे माने[2] मोर्चे देऊन बैसोन, बरकंदाजीचा व जेजालाचा मार मारीत असों. गनीम कोटावरून व माडियावरून अरमारावरून तोफाचा व बरखंदाजीचा मार अहोरात्र मारीत असे. आम्हीही चौगीर्दा घेरून मारागिरी करीत असों. केवल बरकंदाजीने अथवा जेजालाच्या माराने गनीम आयांस[3] न ये हे जाणून किले मनोहर येथील दोन तोफा आणून गनीम आयास आणावा यैसा विचार करून राजश्री विठल विश्वनाथ मनोहरास आहेत त्यास लेहून पाठविलें. त्याही पके दिडा सेराचे गोल्याची तोफ येक पाठविली व किले तांदुळवाडीपैकी आदसेराचे गोल्याची पाठविली. या किरकोलाने काम काय होणें ? परंतु दगडापेक्षा ईट नरम यैसा विचार चितांत आणून काली छ ४ साबानी रात्रौ मनोहरपैकीं तोफ लागू करून येक बार सुमुहुर्तें मारिला. आजीच्या दिवसांत सारा संच नीट करून तोफेची मारगिरी करून गनीम आयास आणून येकां दो दिवसीं किला फते करून सेवेसी लेहून पाठवितो. रात्रदिवस कस्त व लोकांचे दिलासे करून लाहानथोर येकदिल करून कडी कंठमाला, मोत्याच्या जोड्या, इत्यादिक बक्षिसें कबूल करून नामर्दासहि अवसान येऊन साहेबकामावरी जीवित्वाचा तमा न धरता येकनिष्ठेने जडवीत असों. स्वामीच्या पुण्यप्रतापें हें काम तों येका दो दिवसी फते होतच आहे. या कामावरी माणूस सोहोधून (?) गनीमावरी सलाबत पडलियाने माणसास मर्दुमी येऊन गनिमावरी नक्ष[4] बसतो. पुढें तारापुरासारिखा जागा काही सामान्य नाही. केवल वसईच दुसरी. हजार माणसांनसी पोहर्दू मनोहरचा कपितान किल्याबाहेर आहे. मुलकात स्वारी सिकारी आम्हापूर्वी करीत होता (तो) लस्करची आवाई आइकोन दबकून आपलेच जागां राहिला आहे. राजश्री रामचंद्रपंत छ ३ साबानी येथे फौजसुधा दाखल जाले. त्यांची आमची भेट जाली. येथील विचार आचार पाहून दुसरे दिवसी वीस पंचवीस स्वारानसी माहिमास जाऊन तोही जागा पाहून फिरोन आले. प्रात:काली

---

१ कठीण, अवघड. २ सुमारे, अंतरानें. ३ हारीस येत नाही. ४ जरब.

ते आम्ही विचारास बैसोन माहिमास राजश्री माहादाजी केशव बैसले आहेत त्याच्या साहित्यास जाऊन मोर्चेबंदी करावी येसा विचार करून आजी प्रातःकाली स्वार होऊन माहिमास गेले. विठल सिवदेऊ याजकडील राऊत ४९ येकूणपनास आम्हाजवळ ठेविले व हशमपैकी येकसेसेचाळीस माणूस ठेविलें असे. येथील कार्यसिधी उरकलियावरी त्यांचे आमचे विचारें जसा विचार निवेल तसा करून. काही राऊत व हशम त्याजकडून घेऊन चिंचणीवरी जाऊन. चिंचणी हातास आली म्हणजे निमे तारापूर फते जाले येसा विचार आहे. याकरितां आम्हा-कडील भर्तीस राऊत व हशम बरें आपले वळणाचे[1] पाठविले पाहिजे. कानडे अथवा हिंदुस्थानी माणूस मोर्चेबंदीचे कामाचें नाही. हात्यार पडेल तेव्हा हत्यार मारणार नाहीत तर उगेच बसणार. मोर्चेबंदीचे कामास हरभोत[2] पाहिजे. लाकडें वाहावी, माती खणावी, वोझी वाहावी, तेव्हा मोर्चा होतो. या करिता या वळणाचे माणूस पाचसातसे जरूर पाठवावें. कदांचित हाजीर नसिले तर मानाजी आगरे याजकडील व बाबाजी यशवंतराव याजकडील लोक साष्टीस आहेत त्याचे मुबदलियास दुसरे पाठऊन तेवढे माणूस जरूर पाठवावयाची आज्ञा केलियाने तारापुरास मोर्चेबंदी करून कार्यसिधी करितों. सेवकापासून स्वामि-सेवेसी सुस्ती होईल येसें नाही. दारू गोळीचे पोख्ती बेगमी असावी. दारू गोळी पाठविली ते याच कामास खर्च जाली. पुढें मातबर काम होणेच आहे या करितां अवश्याच गोष्टीचें उलसेन[3] (?) करून लिहिलें आहे. सारांश या कामास तोफाचे साहित्य व दारूगोळीचे साहित्य पोख्ते असावें व माणूस जंजिरियाचे या वळणाचे असावे म्हणजे केले कष्टाचे रूप दिसोन येईल आणि स्वामिसेवा जसी स्वामी म्हणतील तसी होईल. आम्हाबराबर भर्ती करून दिली त्याचा तपसील आलाहिदा पुरवणीत लिहिला आहे, त्याजवरून सविस्तर निवेदन होईल. बहुत काये लिहू? कृपा वर्धमान केली पाहिजे हे विज्ञापि.

¶*Malhar Hari gives a detailed account of the siege of Sirgaon. ' Sirgaon,' he writes, ' is a strongly fortified place well guarded by cocoanut groves on three sides and the sea on the fourth '. He is battering down the walls with what wretched ammunition he has. He reiterates his demand for more guns and men.*

---

१ माहितीचे किंवा दक्षिणी, मराठे, कोकणे यासारखे. २ हुरहुन्नर. ३ खोलून, फोड करून,

*No. 82]* *[18-11-1737*

पो छ १६ साबान

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

पोष्य वासुदेव जोसी व रघुनाथ हरी साष्टांग नमस्कार (व) अनुक्रमे दंडवत विनंती. येथील कुशल जाणून स्वकीये लेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जाहालों ते छ ६ साबानी वाडे प्रा कोलवण येथें आलों. त्यास राजश्री रामचंद्रपंताकडून व मल्हार हरी याजकडून जासूद आले ते आम्हांस भेटले त्यांजवल लाखोटे होते ते आम्ही वाचून पाहून स्वामीकडे पाठविले आहेत याजवरून सविस्तर कलेल. आम्ही उदईक मनोरास जाऊन तेथून सिरगांवास जाऊं. मल्हार हरी याणी किरकोली साहित्याविसीं लिहिलें आहे त्याची बेगमी आम्ही इकडे करूं. दारूविसीं लिहिले आहे त्यास आम्ही नासिकास राजश्री हरी कृष्ण यास लेहून दारू आणवितों. स्वामीनीहि ताकीद करून दारू रवाना केली पाहिजे. आम्ही सिरगावास गेलियावर तेथील सविस्तर अर्थ मनास आणून लेहून पाठऊं व राजश्री खंडोजी माणकर याजकडे व तारापुरास रोजमरा पाठवावयास आम्हांबराबर यैवज दिल्हा व राजश्री मल्हारपंताकडून रुपये ५००० पांच हजार देविले ते त्याणी दिल्हे. यैसा यैवज आम्ही आणिला त्यापैकीं छ ९ साबानी पर्डीचे मुकामाहोन मानाजी पवार याजकडील राऊत ठाणियास रवाना केले. त्याजबराबर व लक्ष्मण हरी दिमत शाहाजी भापकर याजबराबर राजश्री खंडोजी माणकर याजकडे रुपये १०,००० दाहा हजार व राजश्री नारायण जोशी याजकडे रुपये ३,००० तीन हजार येकूण तेरा हजार त्याजकडे रवाना केले. पुढें सिरगावास गेलियावर राहिला यैवज जिकडे रवाना करावयाचा तिकडे करूं. तीर्थस्वरूप राजश्री नारायेण जोसी यास लेहून पाठविलें कीं तीन हजार रुपये पाठविले आहेत. जाजती यैवज लागेल तो माहालचे यैवजीं खर्च करणें म्हणून लिहिलें आहे. कललें पाहिजे, सविस्तर मागाहोन लिहोन पाठऊं. बहुत काय लिहिणे ? लोभ करीत गेलें पाहिजे हे विनंती.

¶*Vasudeo Joshi and Raghunath Hari despatched by Chimaji to the Konkan with instructions and funds report their doings since their arrival in Bassein province. Money they brought with them has been distributed to persons concerned and letters to provide gunpowder to Sirgaon, Manor have been despatched.*

No. 83] [24-11-1737

छ २३ रमजान

श्री

पुा श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवशी.

विनंती उपरी राजश्री हरी सदासिव व पंताजी मोरेश्वर हे उभयता आशेरीस आहेत. त्यास दोन तीन महिने ज्वराने पीडा केली; तेणे करून बहुत श्रमी जाहले आहेत. अद्याप स्थिर्तीवर[1] येऊन पाणी[2] घेतले नाहीं. आशेरीस बाहेरून माणूस जाऊ पावत नाही. किल्यावर धान्याची बेगमी आहे याजमुळें गनीम आयास येत नाही. लोकांनीं बरीसी मेहनत करून मोर्चे कड्याखाली नेले आहेत. स्वामीचे पुण्येकरून लौकर फते होईल. विदित जाले पाहिजे. बहुत काय लिहिणे? लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Letter to Chimaji Appa describing the attack on the fort of Asheri (Thana District).*

---

No. 84]

श्री

विनती उपरी तुम्ही चिठी पाठविली ती पावली. वर्तमान कलले. गनीमाने - रात्रीस बंदुखाचा मार फार केला परंतु खैर जाहाली म्हणून लिा; उतम जाहाले. बंदरी गलबत नाही; परंतु मध्यरात्रीनंतर येक थोर माहांगिरी माहिमाकडे पूतर्फेस (?) खडपाजवल आली. उतरावयाचा मुदा होता; परंतु रा लाडोबा लोकाच्या व राउताच्या जमावानसी बदरावर खबरदार होते याजमुले उतरो पावला नाहीं. प्रात:काली माहागिरी माहिमाकडे गेली. उतरेकडे मोर्चा घातला आहे. तेथे बरीसी खबरदारी केली आहे. मार होत नाही म्हणऊन लिा तरी काली संध्या-कालच्या सात तोफा मारिल्या. आज प्रात:काली पाचसा मारिल्या. गोले बरेसे लागू जाहाले. त्याणे येकंदर[3] तोफ मारिली नाही. बहुधा त्याजवल दारू नाही येसे दिसते. रा लाडोबा भोज्यन करून राऊत घेऊन येतील. लोक आज सध्याकालपावेतो ठेविले. उतम केले. संध्याकाली पाठवावयासी अनकूल पडल तरी पाठवणे नाही तर राहो देणे. वरचेवर वर्तमान लिहिणे. बहुत काये लिहिणे ? लोभ असो दीजे. हे[+] विनंती.

¶*An encounter between the enemy and the men led by one Ladoba round about Mahim is described by the writer.*

---

१ बरे होऊन. २ स्नान करूं लागले नाहींत. ३ मुळीच. + पत्र मल्हार हरीचें.

No. 85] [ ?

**श्री**

विनती उपरी तुम्हाकड तोफांचे आवाज फार होतात. यानिमित्य राऊत पाठविले आहेत. गनीम बाहीर निघाला किंवा कोटातून मार करतो हे वर्तमान लिहिणे. हे +विनती.

¶*Enquiry is being made whether the enemy is inside the fort or not.*

---

No. 86] [ ?

पौ छ २६ साबान

**श्री**

विनंती उपरी. तुम्ही चिठी पाठविली ती पावली. तोफेचा मार जबरदस्त करावा म्हणोन लि॥. तरी काली तुम्हाकडून गोलंदाज आला. त्याणे पुजा करून आज प्रात:काली लागू केली आहे. दोन गोले मारिले. सध्याकालचा विशेष मार करवितो. कालपासून वर्तमान कलत नाही म्हणोन लि॥ तरी प्रात:काली राजश्री आपाकडील पत्रे व येथील सविस्तर वर्तमान लेहून पा॥ आहे. त्यावरून कलेल. तुम्ही आपणाकडील वर्तमान वरचेवर लिहित जाणे. रात्रीस गलबते गेली ती अद्यापि आली नाही. पुढे होईल ते लिहोन पाठऊ. बहुत काये लिहिणे ह [१] विनती.

¶*The writer promises to open an attack on the enemy with his guns shortly.*

---

No. 87]

**श्री**

विनंती उपरी. तुह्मांकडून धाकटी तोफ आणली आहे तिचे गोले वसि पावेतो आसतील ते पाठऊन देणे. येथील चर खाणावयासी सिपाई लोक तेव[२] दमले. त्र्येठ्यास काम होत नाहीं. यैसियास कामाठी दाहाजण पाठवणे. येकदो दिवसाचे काम आहे. कामाठी दाहाजण पाठवणे व गोले पाठवणे. अवघी फौज नेऊन केल्यास कही भरून आणू. येणकरून आवघी फौज त्यास दाखवावी म्हणून लिहिलेत तर आवघी फौज पाहिलेने गनीम आश्रये सोडून बाहीर येणार नाहीं.

¶*The writer asks for more ammunition and coolies to dig trenches.*

---

+ चिठी मल्हार हरीची.

१ पत्र मल्हार हरीचें.

२ तों.

No. 88]

श्रीमाहालक्षुमी

विनती उपरी. तुम्हाकड आवाज फार होतात त्याचे काये वर्तमान? गनीम युध्यास बाहीर निघाला आहे किवा कोटावरून मार करतो ते वर्तमान कलावयानिमित्य राऊत पाठविले आहेत. वर्तमान काये ते लिहिणे हे +विनंती.

¶*An enquiry is made whether the enemy has come out to fight.*

No. 89]

[Dec. 1737

विनती उपरी. सिरगावच्या बाऱ्यावर बाहेर कोसा दोन कोसावर अरमार पंचवीस तीस गलबते व थोर पाल १ यैसे आले आहे की माहिमास अरमार होते तेच आले की दुसरे कोठून आले हे लेहून पाठवणे. हे अरमार माहिमाहोन आले असिले तरी आमचे लोक तुम्हाकडे आहेत ते पाठऊन देणे व तुम्ही सावध राहून येथील उपराला वरचेवर करणे. तुमचे बदरात गलबते होती ती गेली की नाही हे लिहिणे. त्यापैकी तीन गलबते बंदरामध्ये लागावयाच्या मुद्यावर आली आहेत याजकारिता येथील उपराला करावयासी आला असे दिसते. + हे विनंती.

¶*Information is sought whether the flotilla hovering near Sirgaon comes from Mahim or some other place.*

No. 90]

[Dec. 1737

श्री

विनंती उपरी. अर्नालियाहोन आमचे थोरले तोफाचे गोले आले असिले तरी पाठऊन देणे. आज प्रात:कालापासून वर्तमान लिहिणे. गलबते बंदरामध्ये आहेत की बाहेर पालाजवल गेली हे लिहिणे. फिरंगियाचे येकाधे माणूस धरून वर्तमान पुसणे. त्याखेरीज ठीक वर्तमान कलत नाहीं. तरी लाग करून येकाधे माणूस धरवणे. बंदरामधे गलबते असिली तरी रात्रीस विचार करून गलबते जालण्याचा येत्न करणे. कोणी कबूल केले तरी बक्षिसे देऊ करून येत्न करणे. ओहोटीची गलबते जालावी. सेदोनसे माणूस तयार करून पनास भारे झांपाचे लोकाजवले देऊन दर असामीस अर्ध सेर दारू द्यावी आणि [१]आघी द्यावी. आणि

+ पत्र मल्हार हरांचें.

१ आग द्यावी.

तजवीज करणें. बहुत काय लिहिणे हे विनंती. आता तुम्हाकडे आवाज फार होतात, काये वर्तमान ते लिहिणे. गनीम बाहेर पडिला असेल तरी लिहिणे हे+ विनंती.

¶*Malhar Hari to some Sardar commanding the erection of a battery at some distance and proposes a plan to burn the enemy's ships cruising in the port.*

---

*No. 91*] *[Dec. 1737*

श्री

विनंती उपरी. रात्रीचे वर्तमान गनिमाने गलबतातून बहुत दाटी करून उतरावयाचा विचार करीत होता. परंतु बंदरावर राऊत व पाईचे लोक घेऊन बसोन [1]राखला. रात्रो रावउत राखिला नाहीं. रात्रो दोन गलबते होती. त्यातून प्रातःकालचे प्रहर रात्रो येक माहिमाकड जाऊन आणिक दोन घेऊन आले. येकून चार गलबते जाहली. वरते लोकहि बहुत आहेत. जो[2]रबजोर उतरो पाहातात. बंदरावर रात्रदिवस बसोन उतरू देत नाही परंतु उधाणाचे दिवस आले आहेत. गनीम राखणे कठीण दिसते. तुम्हीं अपणाकडील वर्तमान लिहिणे. रुपयाविषयीं लिहिले त्यास कल्याणास माणूस पाठविले आहे आलियावर पैकाहि येईल. तूर्त पंधरवडा देणे. पुढे पंधरवडा देऊ. कुदल्या तीन पाठविल्या त्या पावल्या. पागोटी पावली. बहुत काय लिहिणे? लोभ असो दीजे हे [3]विनंती.

¶*Chimaji Appa is informed how the enemy made attempts to land his forces just near the port and how the attempts were failed.*

---

*No. 92*] *[Dec. 1737*

* * *

विली * * * माहिमच्या वाऱ्यावर येक [4]फरगत व गलबते पाच नवी आली व पहिला पाल येक येकून सात आहेत म्हणून लिहिले कलो आले. मोर्चे खबरदार केल आहेत व बंदरावर राऊत ठेऊन खबरदारीने आहो. नवी तोफ आणविली ते लागू करून येक गोला मारला तो भिताड फोडून गेला. मोर्चा नीट करून तोफ लागू करावी लागते. ते आज रात्री करून प्रातकाली तोफेचा मार करवितो हे विनंती. धाकटी तोफ पाठवावयाचा विचार लिहिला तर उदईक तीनहि तोफा लागू करून मार करवितो हे §विनती.

¶*The effective action of a gun and the terrible havoc caused by it are described in this fragmentary chit.*

---

+ पत्र मल्हार हरीचे. १ जागच्याजागीं रोखला. २ जोरावारीनें.
३ लेखक मल्हार हरी. ४ फ्रिगेट. § पत्र मल्हार हरीचें.

No. 93] [Dec. 1737

श्री

विनंती उपरी रा पंतार्जीपंताचे पत्र आले. पाहावयास पाठविले आहे त्या वरून कलेल. यांचा विचार काये तो लिहिणे. रा भगवंतरात्र तेथे आले आहेत. त्यास सत्वर पाठवणें. उदईक काही राऊतहि पाठवावे असे आहे. गनीमाने येऊन तेथे दंगा केला तर आज ताा खर्च जाला तो वृथा जातो. बहुत लिहिणे नलगे. आजचे वर्तमान लिहिणें. तुम्हास अनुकूल पडेल तर तीस चालीस राऊत पाठवणे. जसा विचार सुचेल तसे लिहिणे. गलबते जालावयाचे अगत्य करणे. बहुत काये लिहिणे. हे विनती. तेथून चालीस पंनास राऊत पाठवाल तर येथूनहि पंनास पाठऊन दोन दिवस राहतील आणि येतील. हे विंनंती.[+]

¶*Wasudeo Joshi (?) asks reinforcement to be hurried to some weak point that has been attacked by the enemy. He repeats his suggestion about the burning of ships.*

---

No. 94] [1-12-1737

श्री

विनंती उपरी. तुम्ही चिठी पाठविली ती पावोन वर्तमान कलले. साखर रुपयाची पाा ती पावली. 'रा मानाजी आगरे याची गलबते माहिमाचे नस्तावर येऊन नाटे[१] गेली' म्हणोन लिाा तरी तुम्हास मानाजी आंगरे याची अर्जीली (?) लेहून आले की की कोणी सांगितले ते लिहिणे. रा शामजी कृष्ण यास वेठ्याविसी सागितले होते परंतु त्याणी आणिले नाही. हाली वेठ्यां[२]विसी ताकीद केली आहे. वेठे आले म्हणजे पाठवितो. दुबती म्हैस जरूर मेलऊन पाठवणे. आमची म्हैस आहे ती दूद देत नाही तरी १ पाठवणे. आज आम्हाकडील पाचसात तोफा मारिल्या त्याणे माडीची दिवाल[३] हातभर पडिली परंतु गनीमाने प्रातःकालापासून तोफ सुटली नाही. काय म्हणौन तोफ सुटली नाही हे कलत नाही. तुम्ही बंदरावर मोर्चा घातला त्याणे जाहाज यावयाचे बंद जाहाले की नाही ते लिहिणे. छ १९ साबान. बहुत काये लिहिणे, वरचेवर वर्तमान लिहित जाणे, लोभ असो दीजे हे [४]विनंती.

¶*This is a chit wherein the writer announces that the enemy has stopped firing. There is also a demand for labourers.*

---

\+ पत्र कदाचित् वासुदेव जोशाचें.

१ नाट जाणें=To omit to render the service or aid promised or expected. नाट ad. Out to sea. Off from the land.

२ वेठ्या=सैन्याचें सामान वाहावयाकरिता धरलेला मजूर. ३ दिवाल=भिंत.

४ पत्र मल्हार हरीचें.

No. 95] [5-12-1737 ?

**श्री**

पुाा सेवेसी विनती यैसीजे. फिरंगियाणें आतिशयावर प्रवर्त करून चडोन आला. लोकानी दास्त घेतली होती. रान अडचण, पर्जन्यकाल, दाणा प्रसंग पडिल्याने पुरवणार नाहीत परंतु श्रीमंतांचे पुण्य विचित्र यामुले सर्व गोष्टी प्रतिकूल ते आनकूल होऊन फिरंगी फजित पावला. खासा विजेरेंई ठार पडला. मुर्दा पाडाव जाहाला. तोफा लाहान थोर दाहा पाडाव जाहाल्या. हत्यारे तो लोकानी बहुत पाडाव केलीं. तर्कटी[१] खासा निशाण पाडाव तसेच नगारा पाडाव जाहाला. पुढे कैसे होऊन येते न येते न कले. खेडी तमाम पडली. खर्च भारी. दोन हजार पाईचें माणूस पोंवास (?) जमा जाहाले आहे. लोकास बीक्षसे कबूल केली. लूट माफ केली, तेव्हा आंगेज करून नतिजा[२] दिल्हा. यैसे फिरंगियासी कधी पाडिले नव्हतें. सेवेसी कलावे म्हणून लिाा आहे. बहुत काय लिहिणे ? लोभ असो दीजे हे विनंती.[+]

¶*The Peshwa is informed how well his men behaved in an encounter with the Portuguese who were forced to retreat with the loss of their Governor and their colours.*

---

No. 96] [11-12-1737 ?

**श्री**

राजश्री रामचंद्रपंत स्वामी गोसी

विनंती[३] उपरी तुम्ही चिठी पाठविली ती पावली. फिरंगियाकडील अकरा गलबते भरोन आली ती कोटामध्ये मार करीत गेली म्हणोन लिाा ते कलले. गलबतातील लोक कोटामध्ये जाऊ द्यावयाचे नव्हते परंतु गेले; तरी याउपरी मोर्चेयाची खबरदारी बरीसी करणें. गनीम दगेखोर आहे. येकाधे समई मोर्च्यावर घालील. तरी आपले लोकास बरीसी ताकीद करूत. जेथे तोफा असतील तेथे लोकाची भरती मजबुदी बहुतसी करणे. लोकाविसी लिाा परंतु येथील मोर्चे कोटाजवल गेले आहेत ते तुम्ही पाहिलेच आहा. त्यामध्ये काली थोर तोफ लाविली व अनखी लाहान तोफा दोनदाहा (दोनदा) मोर्च्यावर लाविल्या आहेत, याजकरिता लोकाची भरती पाहिजे. तूर्त लोक पाठवावयासी अनकूल पडत नाही. शामजी कृष्ण

---

१ जरिपटका अर्थात् शत्रूच्या सैन्याचा.

२ जरब, शासन केलें.

+ पत्र नारायण जोशाचें ?

३ पत्र मल्हार हरीचें.

स्वारीस पा। आहेत ते अद्याप आले नाही * * * (आल्या)वर पाठऊन देऊ. आज कोटातून एक म्हातारा पलोन आला. त्याणे आम्हाजवळ सांगितले की कोटामध्ये जुजेते[1] पाऊणसे माणूसपर्यंत आहेत. त्यामध्ये फिरंगी नवदाहापर्यंत आहेत. वरकड हिंदु मुसुलमान आहेत. रयेत पाचसातसेपर्यंत आहे. भात आठदाहा दिवसापुरते आले. फाटे अगदी नाही. पाटील ब्राम्हणगावचा आहे तो जुजवीत आहे. लोक फिरंगियाखेरीज आहेत ते कौल घ्या म्हणतात; परंतु फिरंगियाने पाच दिवसाचा वाइदा लोकासी केला आहे की वसईस लि॥ आहे. मदत आली तरी बरे; नाही तर पाच दिवसानी कौल घेऊ यैसे म्हणत होता. कालचे आमचे गोले बरेसे लागू जाहाले म्हणून सांगत होता. कलले पाहिजे. लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Malhar Hari to Ramchandra Pant who had remonstrated with the writer on learning that some ships had succeeded in bringing relief to the besieged writes that the batteries were carefully manned and guarded. A deserter from the enemy reports that the place is reduced to great straits and will soon capitulate.*

---

*No. 97*] [*About 11-12-1737*

श्री

विनंती उपरी. तुम्ही चिठी पा। ती पावोन वर्तमान कलले. तोफेबराबर लोक पा। आहेत त्यापैकी रा। खंडोबाकडील लोक नेहमी ठेऊन वरकड पाठवणे त्यास माडवीकर मात्र आले नाही वरकड आले म्हणौन लि॥. तरी माडवीकर देखील लोक सध्याकालीचे रवाना केले तेथे शोध घेणे. खंडोबाकडील लोक मात्र येथे ठेविले आहेत तोफा लागू जाहाल्या असिल्या तरी देवढामार[2] करणे म्हणोन लि॥. तरी संध्याकालीचे तोफा लागू करून च्यार आवाज केले. आज देवढामार करावा म्हणौन प्रात:काली प्रारंभ केला परंतु तोफ थोरली जाया जाहाली तिचे वर्तमान प्रात:काली लि॥ आहे त्यावरून कलेल. बंदरात गलबते नाही. काली तुम्हाकडून गुराब[3] येक व गलबत यैसे आले ते तारापुराकडे गेले. बाइका धरून आणिल्या त्याचे वर्तमान लिहिणे म्हणोन लि॥, तरी धरून आणिल्या त्यापैकी दोघे चौघे चाकर कोटात आहेत. त्या मोर्च्यावर नेऊन हाक मारून बाइकानी कितेक प्रकारे बोलिल्या परंतु जाबसाल जाला नाही हे[+] विनंती.

¶*Malhar Hari writes to some sardar that the guns sent by him have been duly received but have not been brought into action as one of them went wrong in the morning.*

---

१ लढवाई. २ लागोपाठ, एकसारखा.

३ ग्रॅब. + पत्र मल्हार हरीचें.

No. 98] [12-12-1737

# श्रीगणपति

बार

विनंती येथील वर्तमान तागाईत छ १ माहे रमजान मोकाम माहीम येथास्थित असे. या नंतर स्वामीनी आज्ञापत्र पाठविले ते छ २४ साबानी पावले. दुसरे पत्र पाठविले ते छ २९ माहे शाबानी पाठविले ते पावले. तेथे आज्ञा की तुम्हाजवळ पायचा जमाव केती आहे राऊत केती आहेत केलवे माहीम दोन स्थली बैसला आहा. काये वर्तमान ते सविस्तर लिहिणे. त्यास हशमाची हजीरी घेऊन पेशजी पाठविली आहे. राऊत जे अहेत तेच अहेत. अलीकडे सुंदरराऊ याचे राऊत अले आहेत. विदित होय. या नंतर पहिला येक मोर्चा होता त्या अलीकडे दोन नवे मोर्चे घातले * * * * * * त्यास छ * शाबानी रविवारी * * * कोटात गलबते होती भरती समई * * * जाहाली त्यावर यक प्रहरा त्यानी मोर्चावर चालोन घेतले ते समई किल्यावरील तोफांचा मार व बरखंदाजी करीत आले त्य * * मोर्चा सिपाई लोक तमाम लस्करचे पायउतारा हशमाचे लोक व कल्याणाहून अले ते आरब व आम्ही व राजश्री माहादाजीपंत व राजश्री चिमणाजी बापोजी यैसे होते. त्यास गनीम तोफेपावेतो नीट चालोन अला तेव्हा सर्वालोकानी बरीसी हिमत धरून गनीम मारून काढिला. आम्हाबरोबर कानडे प्यादे आले तेहि होते. त्यास तेसमई गनिमाकडील पाचमाणूस ठार जाहाले. त्या पैकी यक मुर्दा राहिला बाकी च्यार मोर्दे घेऊन गेले. या खेरीज सात आठ माणूस त्याचे जाया जाहाले. ते समई राजश्री माहादाजी केशव यानी जातीनिसी बरीशी खस्त केले. जातीने हत्यारास मिलाले. तेसमई आम्हाकडील माणूस येणेप्रमाणे जाया जाहाले. मुद्याणाभरमाण याकडील कानडे प्यादे गोलीचे जखमी नऊ व अरब जखमी तिघे व पदाजी कारके याकडील येक ठार व * * * जी ढमढेरे याकडील करोले येक ठार भां(डियाचे) गोलेने पडला, परंतु स्वामीचे आसीरवादे गनीम मोडून कोटात घातला. दोन तोफा अरनालियाहून अणून लागू केल्या आहेत तोफेच्या मारे आत माणूस जाया होते रोज बरोज गावातील माणसे चाऱ्यासाठी बाहीर पडतात त्यास लोक धरून अणतात ते वर्तमान सांगतात त्याप्रमाणे लिहिले

अहे. गावात रयत फार अहे. गावाससभोवता मोर्चा असिलियानें सर्व गोस्ट बंद होते यैसे वर्तमान आहे. त्यास माहादाजीपंत याच्या मोर्चापासून येक चर व कर्णाजी सिंदे याच्या मोर्च्यापासून येक चर यैसे दोन चर लाविले त्यास माहादाजीपंत याच्या चरापुढे मोर्चा छ २९ पंचविसावे तेरिखेस घातला तेच दिवसी तारापुराहून सोला गलबते बंदरास दाखल जाहाली व पाल येक त्यास पाल तो खाडीत येतच नाही. तो दूर राहिला बाकी गलबते येत होती त्या पैकी बारा कोटाजवल अली. च्यार मागाहून येत होती त्यास तोफ कोटाकडे लागू केली होती ते फिराऊन मारिली तेव्हा च्यार न आली बाकी आली. ते दिवसी मोर्चाहि पुढे घातला होता बलावला नव्हता पंरतु स्वामीच्या प्रतापे ठेचून राखिला. ते लोक कोटात गेले गलबते बंदरात अली हे पाहून सिरगावीहून उभयतानी शंभर माणूस व गणेशपंत व रामजी बेरडे रवाना केले होते. आमचे आवाज व कोटावरी तोफाचे अवाज होताच फौज व जमाव घेऊन राजश्री लाडोबा घेऊन आले ते दिवसी फिरंगी बाहीर निघाले नाहीत त्यावर तो मोर्चा पुराता बलावला. मोर्चातून धोंडा मारिला तर कोटात जाऊन पडतो ऐसा मोर्चा समीप गेला अहे. मोर्च्यात गोलियानी तीन माणूस ठार पडले त्यापैकी येक अरब व दोघे गुजराकडील सिपाई ऐसे पडले. मोर्चा बरासा भारी जाहाला. मोर्चाच्या श्रमास माहादाजीपंत जातीनिसी खस्त करितात व लोकापासूनहि मेहनत करितात तैसेच रात्रींदिवस राउताचा छबिना व दिवसास सारे सिपाई पायउतारा व करोल औसीची च्यार घटिका रात्रपर्यंत अस्तात. आम्ही राऊत घेऊन अस्तो. याप्रकारे कोणे शेवेसी अंतर करीत नाही. गावात हत्यारबंद माणूस हजार बाराशेईपर्यंत आहे पंरतु रेणोले[१] थोडे आहेत मराठे व घोगारी व थोडेसे अरब सिदी ऐसे आहेत. काल चांदरातीचे दिवसी सोमवारी गनीम दक्षणचे अगे व पूर्वेचे अंग बाहीर पडला होता. त्या अंगे मोर्चे नाहीत तेथे मेढे तोडावयास निघाला होता त्यावर जमाव हशमाचा घेऊन राजश्री खंडोबा गेले होते व छबिन्याचे राऊत पाठीवर होते यास गनीम सारून माघारा घातला. किल्यावरील तोफांचा मार फार जाहाला व बरखंदाजी फार जाहाली याकरिता त्याचे पाठीवर माहादाजीपंत गेले त्यास गनीम ठेचून माघारा घातला. गनिमाचे सात आठ मुर्दे जाहाले म्हणोन सर्वांनी पाहिले व आज उद्या गावातील माणूस सापडल तेव्हा वर्तमान कलेल. त्यास ते समई तोफेचा मार फार जाहाला. फालंके याचे घोडीस गोली लागोन खैर आहे
* *त्यास व दादाजी प्रभु वसईकर पातेणा प्रभु येऊन भेटला होता त्यास गोला

---

१ युरोपियन सोल्जर ?

लागून ठार जाहाला. त्याचे पोरगेस तोच गोला लागला. तोहि मरेल व अदोजी माने याकडील प्यादा येक ठार जाहाला. दादाजी बरासा मर्दाना व शाहाणा मनुश होता त्याचे गुणानवाद केती ल्याहावे? बरे. स्वामिकार्यावर खर्चला आहे याचे चालवणार स्वामी समर्थ आहेत. वरकड वर्तमान तर कर्णाजी सिंदे याचाहि चर लांबवर गेला आहे तेथे उदईक मोर्चा घालावासे केले आहे, कणगे सामान सिध केले आहे तेथून बुरूज व कोट शंभर हात आहे तेथून सुरंगाचा इलाज करावा ऐसे केले आहे. पुढे सिरगाव सत्वरच फते होयेल ते जाहाले वर जे तोंड खाली आहे त्या तोंडे ते येऊन बैसतील ऐसा विचार केला आहे. वरकड ये प्रांतींचे सकल वर्तमान राजश्री वासुदेव जोसी व राजश्री रघुनाथजीबावा लिहितील त्यावरून विदित होयेल. धारावीचा मोर्चा खाईम जाहाला आहे. कोटाचे काम चालत आहे तोफाहि लागू केल्या आहेत. राजश्री शंकराजीपंत यानी पूर्वेकडील कोलवडीचा मोर्चा घातला दुसरा मोर्चा वालवंटी घालणार त्याचे सामान करीत आहेत. स्वामीनी उभयेतास पत्रे पाठविली होती ती वाचून पाहावयाची आज्ञा जाहाली त्या प्रमाणे पाहून समाधान जाहाले. तीर्थरूप राजश्री त्रिंबकपत यास राजश्री फत्तेसिंगबावा याचे मुजमूची मुतालकीची वस्त्रे दिल्हे म्हणोन लिहिले, उतम जाहाले, म्हणोन स्वामीनी लिहिले त्यास त्याचे चित्ती स्वामीचे पायाविरुक्त दुसरेकडे न जावे येसे होते तेच गोस्ट जाहाली उतम जाहाले. राजश्री पंताजीपंत यास व जवारकर यास समाधानपत्र पाठविले ते पावले राजश्री हरिपंत सुरनीस यास समाधानपत्र पाठवावयाची आज्ञा केली पाहिजे. श्रीमंत राजश्री पंतप्रधान कोठपर्यंत गेले? निजामनमुल्क कोठे आहे तूर्त अपला मोकाम कोठे आहे व राजश्री वेकटराऊ गोमांतक प्राते गेले किंवा त्याच प्रांते राहिले हे वर्तमान ल्याहावया आज्ञा केली पाहिजे, सिरगावीहून उभयतानी लिहिले की तारापुराकडे फौज पाठवावी म्हणजे यास दबाव बसेल व ते अशेरीस यावयाची अवाई आहे या करता पाठवावी म्हणोन लिहिले त्यावरून राजश्री शामजीकृष्ण या बरोबर राऊत पनास साठ देऊन पाठविले व तेथून त्यानी पनास साठ राऊत दिल्हे ते व हे मिलोन अशेरी पावेतो जाऊन तेथ माघारे उलटी स्वारी तारापुरास केली. तीनशेहे गुरे आणिली. शेवेसी विदित होये. आजपावेतो भात लुटीचे मिलाले आता दाणा विकता घ्यावासा जाहाला. राजश्री चिमणाजी बापोजीस घोडी बैसावयास दिल्हे होती ते वोडक व आम्हास बैसावयास घोडी येकच ऐसियास स्वामीनी दोन घोडी पाठविले पाहिजेत अगर राजश्री पंताजीपंत यापासी नटव्याच्या घोड्या

आहेत त्यांपैकी तर दोन देविले पाहिजेत. दारु विसी बरवाजी पाटील यास लिहिले यास त्याणी पाच मण पाठविली. हाली लिहिलेवरून सिवरामपंत यास लिंहिले अहे ते रवाना करितील.

¶*The letter reports in detail that the siege of Mahim is progressing. New batteries commanding positions of vantage have been erected. The enemy made a sortie against one of them but was repulsed with heavy losses. Nearly sixteen ships carrying help have been sighted in the vicinity but are afraid to touch at the port as the Maratha guns have been ranged on the shore. The writer makes a special notice of Mahadaji Keshav and ends on a note of buoyancy.*

---

*No. 99*] [*13-12-1737*

## श्रीगणपती

### श्रीमंतर राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक रामचंद्र हरी नमस्कार विनंती. येथील वर्तमान तागाईत छ ११ रमजान मुकाम माही(म) सुखरूप असों विशेष. सेवकास पत्रें पंताजीपंत याच्या मनुष्याबराबर पाठविलीं तीं पावलीं. सेवकाकडील वर्तमान तर पेशजी लिहिले होते. त्या अलीकडील वर्त(मान) राजश्री माहादाजीपंत यांनीं उत्तरेकडील मोर्चा पुढें घातला. त्याणें बंदर देखील जेर जाहालें. मोर्चांतून हातधोंडा मारिला तर कोटांत पडतो. पुढें ही आणखी चर लाविला आहे. माहादाजी-पं(त)......खस्तेस अंतर करीत नाहीं. अहिरनिसी मोर्चांतून बाहेर निवत नाहीं, स्वामी कार्यांत तत्पर आहेत. विदित होय, त्याचे डावें हातें कर्णाजी शिंदे याचा मोर्चा पुढें गेला. त्याचे मोर्चेपुढें वोसाड वीर आहे. तेथें चर लाऊन पुढें सुरंगाचा विचार करावा लागतो. यानंतर छ ६ रमजानीं रविवारीं दोन प्रहरां उपरांत त्याकडील कोळी मासे मारावयासाठे निघाले होते. त्यावर कानडे प्यादे गेले. त्याचे उपराळियास होटीचा[१] समय होता, यास्तव कोटांतून लोक बाहेर पडले. त्यास ते दिवशीं दिवसाचा छबिना राजश्री जिवाजी ढमढेरे याचा होता त्यांनीं गनिमावर घोडें घातलें, हत्यार बरे रवेसीनें लाविलें. गनिमाकडील च्यार मुर्दे केले, दोन च्यार माणूस जखमी त्याकडील जाहालें. जिउबाचा

---

१ ओहटीचा.

बस्ता घोडीयास पायास गोळी लागली व आणखी दोन घोडियांस तीर लागले ऐसा विचार जाहाला. आजपावेतों त्याकडील पेशर्जी घोडीं दोन पडलीं व ते-समयीं येक घोडी जखमी जाहाली, ती अद्याप बरी जाहाली नाहीं, त्या अलीकडेहि जाहाली. बसावयास घोडें नव्हतें मग तूर्त बैसावयास भोपळा घोडा निळा-पागेचा बैसावयास दिल्हा, ऐसा विचार आहे. त्याउपरी दशमीचे दिवशीं गनीम चवेताळिस गलबतें भरून लोक येऊन केळवेंमाहिमामधें दोन माडिया जुना रिकाम्या आहेत, त्या पूर्वी अंगरियांनीं जाळिल्या होत्या त्याचे आसरेस गलबतें लाऊन (लो)क उतरले. कोटांतून लोक त्याकडे जाऊन ते हे येक होऊन किल्यांत आले. तेसमयीं फौजेनिशीं त्यांवर जावेंत व आम्ही सारे लोक देखील पायउतारा मोर्चांत होतों; त्यावर दुसरे दिवशीं राजश्री लाडोबाहि आपले फौजे-निशीं येथें आले. त्यांनीं समागमें कही घेऊन केळवेंचे रानास गेले, कही धरली परंतु ते समयीं गनीमाचीं गलबतें आलीं नाहींत, ते माघारें फिरोन आले, तों आणखीं गलबतें वसईकडून दाहा आलीं; त्यांतील लोक आणखी त्या स्थळें उतरूं लागलेसें पाहून राजश्री लाडोबा मोर्चेचे पाठीवर फौजेनिशीं उभे राहिले. आम्ही फौजेसहित देखी(ल) व राजश्री चिमणाजी बापोजी चालोन त्यावर गेलो, तो गनीम दोन जागा होता. त्यास वोसाडमाडीजवल होता त्यास दोहीकडे उठलो त्यास यकीकडे सितोले व कोकरे व वायाल व फालके व किरकोल लोक उठले. त्यानी हत्यार लाविले. गनीमाचे माणूस पंचवीस पर्यं(त) ठार जाहाले. आम्ही व वरकड लोक माडीकडे उठलो तेथे हत्यार लागले नाहीं. गनीमास माडीचा आर्शा (आश्रा) दुसरा गलबते पाठीवर ऐसा विचार जाहाला. नाही तर स्वामीच्या प्रतापे ते दिवसी फिरंगियाची गत सिदीसाताप्रमाणेच जाहाली होती. सिपाईलोक खस्तेस[१] चुकत नाही. जे समई आम्ही इकडून घोडी घातली ते समई लाडोबा * * फौजेच्या लोकानी समुद्र उ * * * (उतरावा?) वा व कोट डावा टाकून लोकानी वा * * * वाटातून घोडी घालून आम्हा-पासी आले ते समई तैसेच थोडेबहुत प्यादेहि मोर्च्यातील आले. गनिमाने सारी फौज पाहिली. ते समई भांडियाच्या गोलियाचा मार व बंदुखाचा मार (पुढे ओळ तशीच अर्धी मोकळी सोडली आहे).

¶*A skirmish between the Portuguese and some Maratha Sardars—Chimnaji Bupaji, Sitole, Kokare, etc.—is described.*

---

१ कष्ट; प्रयत्न.

No. 100] [18-12-1737

छ २३ रमजान

श्री

पुरवणी श्रीमत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी छ ६ रमजानी दोन प्रहरा माहीमच्या कोटांतून गनीम बाहीर निघाला होता. त्यास पावलोक व रावतानी गनिमास मोडून गनिमाकडील च्यार माणसे ठार जाहाली. चौघे जखमी करून मोडून कोटात घातले. जिवाजी ढमढेरे यानी बरी कस्त केली. त्याच्या घोडियास गोली लागली. परतु घोडी शाबूत आहे. व आणीक येक घोड तिराचे जखमी जाहले. आम्हीं येथून राऊत शंभर पाठवले होते ते फिरोन आले. बहुत काये लिहिणे हे विनंती.+

¶*Chimaji Appa is informed that the enemy made a sortie from Mahim fort and fell furiously on the Maratha army but was repulsed.*

---

No. 101] [18-12-1737

छ २३ रमजान

श्री

पुरवणी श्रीमत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. छ ५ रमजानीं माहिमाहून दोन तोफा आणून कोटाच्या दरवाज्यापुढें मोर्चेयांत लागू करून छ ६ रोजी प्रात:कालीच बार भरून तोफ मारिली, तों पहिल्याच बारास तोफ फुटली. तीन च्यार माणूस ठार जाहाले; व दाहापंधराजण जखमी जाहाले, तोफ थोर बहुत चांगली होती, परंतु होणारास उपाय काय ? बरे ते गोष्टीचे काय आहे ? त्याच जागा दुसरी तोफ लागू करून येका दो दिवसांत दरवाजा फोडून मोकला करितों. परंतु न मिळती वस्त उत्तम गेली. बहुत काय लिहिणे हे विनंती+

¶*Chimaji Appa is informed of the bursting of a gun just after firing.*

---

+ पत्र वासुदेव जोशाचें.

*No. 102*] [*19-12-1737*

छ २३ रमजान

**श्री**

**पुरवणी श्रीमत राजश्री आपा स्वामीचे शेवेसी**

विनंती[1] उपरी. राजश्री रामचंद्र हरी याणी माहीमाहोन चिठी छ ६ रमजानी दोन प्रहरा पाठविली आहे. तेथे लिा आहे की जाजिरे अर्नाळियाबाहेरून फिरंगियाचे आरमार सुरतेस जात होते त्याजवर जर्जीरे मजकुरीहोऊन आरमारची स्वारी पाठऊन गलबते पाडाव करून आणिली म्हणून मारनिलेनी चिठी पाठविली तीच बजिनस सेवशी पाठविली आहे, त्यावरून विदित होईल. सावकारी गलबते जात होती त्यापैकी धरून आणिली म्हणून लिा. मागाहून तहकीक वर्तमान येईल ते वरचेवर मुजरद जासुदाबराबर लेहून पाठऊ. रा रामचंद्रपंतास आरबानी रोजमुरियाबद्दल फार श्रमी केले आहे, याजनिमित्य मारनिलेनी आम्हास दोन हजार रुपये आगत्य पाठवा म्हणोन लिा आहे; त्यास आरबास रोजमुरा वरचेवर न पावला तरी राहणार नाहीं, याजकरिता जरूर जाणोन थोडा बहुत ऐवज पाठवितो कलले पाहिजे. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती. राजश्री रामचंद्रपंतहि बरीसी मेहनत करिता(त). स्वामीकार्यास चुकतो असें नाहीं. लोक धीर धरीत नाही. कानडे तो येकंदर कामाकाजास नाही. तसेच आरब. आसकरा[2] मात्र आहे !! हे विनंती.

¶*Letter to Chimaji Appa, describing Ramchandra Hari's attack against Mahim.*

---

*No. 103*] [*22-12-1737*

**श्रीगणराज**

**तीर्थरूप राजश्री बाबा व राजश्री**
**आणा वडिलांचे सेवेसी**

बालकें रामचंद्राने[3] चरणावरी मस्तक ठेऊन सिरसाष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान तागायत पौष शुद्ध द्वादसी गुरुवारपर्यंत वडिलांचे आसीरवादें करून सुखरूप आसों विशेष. इकडील वर्तमान तरी माहीमास कुमक चाळीस

---

१ पत्र वासुदेव जोशाचें. २ गाजावाजा. ३ रामचंद्र हरी ?

सिबाडे व दोन पाल यैसे आली. त्यास काल त्याचें आमचें झुज दोन प्रहरा जाहलें. गनिमाचे वीस पंचविस ठार मारिले व आपाजी सितोलेकडील येक सिपाई ठार जाहला. आणिखी दशमीचे दिवसीं त्याचें आमचें झुज जाहलें. ढमढेरे याकडील दोन तीन घोडीं जखमी जाहालीं यैसें वर्तमान आहे. आमची मंडली व आम्हांविसीं चिंता न करावी. गनिमास हजार बारासेंपर्यंत कुमक आली. कललें पाहिजे. आम्हांकारणे धोत्रजोडा पाठऊन देणें. तीर्थरूप आपाकडील वर्तमान लिहिविलें पाहिजे. वडिलीं आम्हांविसीं फिकिर किमपि न करावी. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Ramchandra Hari communicates the results of some skirmishes which his own men and those of Shitole and Dhamdhere had with those of the Portuguese.*

---

*No. 104*] [*23-12-1737*

**श्रीगणपति**

**राजश्रिया विराजित राजश्री शंकराजीपंत**
**स्वामी गोसावियासी**

सेवक रामचंद्र हरी नमस्कार विनंती. येथील वर्तमान तागाईत छ ११ रमजान शुक्रवार दोनप्रहरपर्यंत वर्तमान येथास्थित असे. यानंतर आपणास युध जाहलेवर पत्र पाठविलेच आहे. त्या पत्राअगोधर आपण लोक रवाना केले. परंतु मुरारजी अणजूरकर या खेरीज लोक कोणी आले नाहीत व आबाजी मारणा मात्र आला. तर लोक लवकर पाठवणे. आजहि दर्यात अरमार दिसते. परंतु लोक वर आहेत खाली आहे हे न कले. आम्ही तुम्हास लिहिले आहे त्याप्रमाणे लोक रवाना करणें. खावंदाचे पुण्य समर्थ. चिंता काये. अरब अगर परदेसी रवाना केले तर सत्वर येऊन पोचत नाही. सिरगाव अद्याप हस्तगत नाही. मनोहर बाबत तोफ तेथे आणिली होती ती काल फुटली. येकूण दोन तोफा फुटल्या ऐसे वर्तमान आहे. आज नवे आरमार आले. त्याची चाल सिरगावाकडे आहे. कलले पाहिजे. धरावी कसी मुस्तद[१] जाहाली ते लिहिणे हे विनंती.

¶*Ramchandra Hari reports the arrival of certain ships in sea and the bursting of two guns. Shirgaon, he says, is not yet captured.*

---

१ मुस्तद—मुस्तैद, तयार, कायम, अर्थात् धारावीची मोर्चेबंदी.

No. 105] [25-12-1737

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री रामचंद्रपंत स्वामी गोसावी यांसी पो शंकराजी केशव सां नमस्कार विनंती. येथील वर्तमान ता। छ १३ माहे रमजान जाणून स्वकीये लेखन केले पाहिजे विशेष. माहीमचे मोर्चेयाचे वर्तमान व तीर्थस्वरूप माहादाजीपंतदादा व चिंतो सिवदेव जनोबा व गणोबा व वाघोजीराव खानविलकर व राजबाराव बुरुडकर याचे वर्तमान लिहिलें ते कळलें. येसियासी फिरंगियाचे सामर्थ येसा प्रसंग करावा येसे नव्हते. होणारास उपाय काय? आम्हास दादा वडील होते तो कोणे गोष्टीची फिकीर नव्हती. आपणास गोळी लागली म्हणून राजश्री जोशी याणी लिहिले त्यावरून चितास समाधान नाही. गोळीची जखम कैसी आहे ते लेहून पाठवावी. फिरंगी हावभरी जाहला आहे. याउपरी जजिरे आरनाळा व इकडे दगा द्यावयास चुकणार नाही. यास्तव जजिरे मजकुरची व येथील बेहबुदी[1] असली पाहिजे. तरी येथील व जजिरेयाचे लोक तीर्थरुप दादा व राजश्री कर्णाजी सिंदे व खंडोबा यासमागमे माहीमास गेली होती ते लोक लौकर पाठविले पाहिजेत. आरनालियास अठरासे माणूस आहे. त्याणी तेथे भरती जाहली येसे नाही. पुर्णिमेचे उधाण समीप आले आहे. तरी यास्तव लोक पाठवावे म्हणजे जजिरे मजकुरची व येथील बेगमी करून व स्वार तीनसेपर्यंत पाठविले पाहिजे. याउपरी व फिरंगियाची गलबते माहीमचे उपरालियास लोक भरुन गेली हे कळतांच आपणाकडे गोपीनाथ व बडेखान या समागमे २०० दोनसे माणूस व मुरारजी नाईक अणजोर याजबा। पनास व तुकोजी बारगे आरनाळकर याजबा। पनास येकूण तीनसे पाठविले आहेत. त्यासही लौकर पाठविले पाहिजे याखेरीज मागाहून आणखी १०० सेभर माणूस पाठविले. त्यास माहिमचे वर्तमान दातिवरे यास कळलियावरी माघारे फिरोन आले. कळले पाहिजे. बहुत काय लिहिणे. कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

*¶Shankraji Keshav Phadke to Ramchandra Hari. He refers to the loss the Maratha army suffered in storming Mahim. Emboldened by their success the Portuguese are likely, he adds, to attack Arnala where additional contingents must be despatched immediately.*

---

१ बेहबुदी – तरतूद.

No. 106] [26-12-1737

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक शंकराजी केशव कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील वर्तमान ताा छ १४ माहे रमजानपर्यंत जाणून स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. फिरंगियाची जाहाजे सत्रा वसईस आलीं, त्याजवरी दीड दोन हजार माणूस आले म्हणून पूर्वी स्वामीस लिहिले आहे; तेच लोक छ ८ रमजानी माहिमास गेले व काही छ ९ रमजानी गेले. यैसे दोखिस्तीने जाहाजे भरून गेली हें वर्तमान आम्हांस कलताच राजश्री रामचंद्रपत व तीर्थस्वरूप दादाचे पत्र न ('न' हा शब्द खोडला की काय तें स्पष्ट कळत नाहीं.) * तीनसे माणूस पाठविले. त्यास छ ११ रमजानी फिरंगी माहीमातून चालोन बाहेर दोन प्रहरां आला. त्यास माहीमास तीन मोर्चे येक तीर्थरूप दादाचा व येक राजश्री कर्णाजी सिंदे व येक खंडोबा यैसे तीन होते त्यास तीहि मोर्चे धरून लोक जुजो लागले त्यास तीर्थरूप दादा यांचे मोर्चेयावरी अडीच तीन हजार माणूस चालोन आले, त्याजवरी राजश्री रामचंद्रपंत याणी घोडी घालून माघारा फिरविला, तो रामचंद्रपंत यास गोली बाहु * वरी लागली. त्यावरून स्वार फिरले; मग फिरंगी नीटच दादाचे मोर्चेयावरी आला त्यास याणी मोर्चा सोडिला नाही. त्यास याजवली मोर्चेयामधे सुरतकर आरब होते त्याणी शकटभेद काही करून फिरगियास भेटले; आमच्याच लोकावरी मारू लागले. त्यास दादा व राजबाराव बुरुडकर व चिंतो सिवदेव व जनार्दन हरी व वाघोजीराव व त्याचा भाऊ व गणेश हरी प्रभू * * कारकून यैसे पडिले. आणखी कोण कोण पडिले ते तहकीक वर्तमान आलियावरी लेहून पाठऊ. से दीडसे सारे माणूस पडिले असेल. मोर्चे उठविले या उपरी माहीमचे लोक व स्वार सिरगावास गेले आहेत. तीर्थरूप दादा पडिले म्हणून आपण काही आव टाकून स्वामिकार्यास अंतर करितो यैसे नाही. स्वामीचे पुण्ये समर्थ आहे, तरी फिरंगियाचा हिसाब धरीत नाही. या उपरी हरकोठे येथे अगर जंजिरे आरनालियास येईलच; आलियावरी ठेचगा देतच आहो. राजश्री बारवाजी पाटील साहित्य करितात व बाळाजीपंत फडनीस जेकमीचे (?) साहित्य करितात व खंडोजी माणकर करितात हे अंताजी हरी याचे पत्रच बजिनस आले आहे त्यावरून कलेल. राा बारवाजी पाा यासी लिा कीं

पंचवीस माणूस देऊन तोफा माडवीस पाा आम्ही येथून लोक * * * *
तितकीच भरती * * होते. साहित्य कोर चांगले हे * * *

¶*Shankraji Keshav reports to Chimaji the fierce struggle at Mahim where the writer's brother lost his life in heroically defending his position in a hand-to-hand fight with the enemy. At the end the letter strikes a note of optimism which shows how confident the Marathas were of their ultimate success.*

---

*No. 107*] [*14-1-1738*

पौ छ ४ सवाल प्रात:काल

**श्री**

**राजश्री माहादाजी आबाजी स्वामी**
**गोसांवी यांसी**

सेवक वासुदेव जोशी व रघुनाथ हरी नमस्कार व दडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करणें. विशेष. प्रात:कालीं तुम्हांस मांडवी-होऊन रवाना करून आम्ही श्रीदेवीस आलों. त्यास संध्याकाळीं राजश्री मलहार हरी व विठल विश्वनाथ यांची पत्रें आलीं कीं तारापुराहोऊन दोन हजार गनीम निघोन आशेरीचे उपराळियास येतों. तारापुराहोन तीन कोस पुढें आला आहे म्हणून लिहिलें आहे तरी माहीम शिरगांव येथील प्रसागावरून गनीम हावभरू होऊन जागांजागां उपराळा करितों. यास बरासा नतिजा द्यावा लागतो. त्याचे उपमर्दास राजश्री मलहार हरी व विठल शिवदेव तेथें आहेत ते नतिजा देतील, परंतु येक वेळ गनीमास बरीशी जरब द्यावी लागते हा अर्थ चित्तांत आणून तुम्हांस पत्र लिहिलें आहे. तरी पत्रदर्शनीं तुम्ही सडे राउत अवघे घेऊन अशेरीखाली राजश्री मलहार हरी, विठल शिवदेव यांस जाऊन सामील होऊन गनीमास तंबी करून कापून काढणें. गनीम खुषकीस आला आहे, असा कधीं यावा नाहीं. याप्रसंगीं गनीम कापून काढावयाचा मान आहे हें जरूर जाणून तुम्हांस लिहिलें आहे, तरी राजश्री पर्वतराव कोकरे व वायाळ व समस्त सरदार यांस सांगोन बुणगे आम्हांकडे पाठवणें; नाहीं तरी तेथेंच ठेऊन पागा त्याजवळ ठेऊन राहिली. फौज घेऊन पत्रदर्शनीं येके घटकेचा विलंब न लावितां जाऊन गनिमास नतिजा देणें. पागा आम्हांकडे पाठवणें, बुणगें तेथें राहिले तर पागा बुणग्याजवळ गौरापुरास ठेवणें. तुम्ही राजश्री विठल शिवदेव यास सामील होऊन तुमचें पत्र येईतोंपर्यंत आम्ही येथें आहों. तुमचें पत्र आलियावर तुम्हांस लेहून पाठऊं, त्याजप्रमाणें वर्तणूक करणें; परंतु तूर्त इकडे

काम पडिलें असतां राजश्री आपाकडे जावें ही गोष्ट कार्याची नाहीं, तरी पत्रदर्शनीं तुम्ही अशेरीखाली जाणें, आणि बुणगे गोऱ्हेयास पाठवणें. तुम्ही गोऱ्हें उजवें घालून ताबडतोड जाणें हे विनंती.

¶*Learning that the enemy is proceeding to Asher from Tarapur, Vasudeo Joshi writes to Mahadaji Ambaji to despatch at once cavalry and other reinforcements to Vithal Shivdeo and others to defeat the enemy.*

---

*No. 108*] [*About 30-12-1737 ?*

श्री

पुरवणी श्रीमंतर राजश्री बाबा (आपा ?) स्वामींचे सेवेसी

आलियासी उत्तम गोष्ट जाहली. आपल्या लोकांनीं सलाबत गनिमाची खादली होती ते सर्वांस जेम आला कीं खासे आले. याउपरी जरी गनिमा दहशत खाऊन निवालियानें धणी जीवें मारून टाकिती यैसें भयभ्रांत जालें. यास्तव तिकडील बंदोबस्त करून वसईच्या गळां पडावें. साष्टी जागें बांधोन निरधोंक करावें. येक दोन ठिकाणें साष्टींत आहेत. त्यासी मोर्चें लावावें. तीं हस्तगत करावीं. हस्तगत जालीं तरी उत्तम. नाहीं तरी त्याच्या उरावरी दुसरें जागें करावें म्हणोन इंग्रजाचाहि उर दडपला. आणि फिरंगीहि सामानच तहेकडून नेतां तें नेईनासारिखें जालें. त्यासी खासा यानीं ठाणेंयासी यावें म्हणजे येथून सारा बंदोबस्त करावा. परंतु वसेईस जाऊन मागती पाहोन फिरोन येऊन नयें. त्यासी राजश्री सकराजीपंता सांगोन वलवटीचा मोर्च्या करार करावा, आणि बंदोबस्त जैसा करणें तैसा तिकडील करावा. परंतु खासियांनीं न जावें हा विचार आज्ञांकिताचे चित्तांत येत यामधें स्वामीहि सर्वज्ञ आहेत. मी त्याहावेंसारिखें नाहीं. परंतु या रानांत आपण माहीत नाहीं, यास्तव आविज्ञा करून लिहिणें लागलें तरी आपले विचारास येईल तरी हा विचार आहे. परंतु दिवसेंदिवस दिसगत लागलियाने गनीम जेरावर होत. तरी याच प्रसंगीं सारयानीं धणियाचे जागें सर्व तप खर्च करून जागा घ्यावी. यामधें आपण सर्वज्ञ आहे. बहुत काय लिहिणें हें विनंती.

¶*The writer suggests that Chimaji Appa, who has recently descended to the Konkan, should not personally proceed to Bassein but should direct the manœuvres of the campaign from Thana.*

No. 109] [पो 4-1-1738

छ २३ रमजान

श्री

पुरवणी श्रीमत राजश्री आपा
स्वामीचे शेवेसी

विनंती उपरी. डाहाणू जागा कसी आहे. रा दुर्जनसिग तीनसे राऊत व पाचसे माणूस इतके सामान पाठविल्याने स्थल हस्तगत होईल की काय ? ते मनास आणून लिहिणे म्हणोन लिहिले, तर कोट समुद्रापासून दोन कोस आहे. जागा मजबूद आहे. दक्षणेस खाडी थोर आहे. बंदर तरतें आहे. उत्तरेस खाजण ओहटीचे समई मार्ग होतो. पूर्वेस खाजण थोर आहे. तेथें मार्ग नाही, पच्छमेकडे मात्र मोकळे आहे तो जागा लिा प्रमाणे सामानाने व तारापुरास शह बसला नसता डाहाणू जेर होईल यैसे नाही. तारापुरास मोर्चे बसल्याउपरात तेथी विचार करणें तो करावा. +बहुत काये लिहिणे हे विनंति.

¶*Chimaji Appa is informed of the situation of the fort of Dahanu and how it can successfully be attacked. He is further advised to attack Tarapur first.*

---

No. 110] [पो 4-1-1738

छ २३ रमजान

श्री

पुरवणी श्रीमत राजश्रा आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती. आसरीचे वर्तमान तरी आशीरकर दाण्यागल्यानें सामानेंपुर[१] आहे व तारापुरच्या उपरालियाचा भरवसाहि त्यास आहे त्यामुळे आसेरकरानें आजि-पावेतों धीर धरला आहे. पोटाची बेगमी पोख्ती असतां व तारापुरांस शह बसला नसता अशरिकर येकायेकी आयास येतो येसे नाही. राजश्री पंताजीपंत यांस येथून आम्हीं पत्र लिहिले होतें त्याचे उतर आले व भगवंतराऊ दिा जवारकर भेटीस आले होते त्याणी सागितले कीं अशिरीवरी दोन महिन्याची गल्याची बेगमी आहे येसें अजमासें सागत होतें. येशास पोटाची बेगमी

---

+पत्र वासुदेव जोशाचें.

१ भरपूर सामानासहित.

त्याजपासी आहे तों तारापुरास शह बसल्याविना विचारावरी येत नाही त्यास तारापुरास शह द्यावयाचा विचार करावा तरी मातबर सामानाविना शह पावे येसा जागा तारापुर नाहीं. त्याहिमध्यें ईश्वरीछेनें येवढा सिरगावचा कार्यभाग दो चहू दिवसांत विल्हेस लागला म्हणजे येथील सामान व माहिमचे सामान येकत्र जाहाल्यावरी दोनसे माणूस व सभर राऊत तारापुरास पाठऊन आलिकड कोशावरी ठेऊन शह द्यावा. तेव्हां उपरालियाची आनास्था होऊन सहंजेच आशिरकर विचारावरी येईल. धारावींचे वर्तमान तरी रा। रामाजी माहादेव तेथें बसले आहेत. त्यांजवरी मातबर गनीम तों गेला नाही. थोडासा गनीम येक दोन वेल गेला, त्याची यांची झिर्टपिट[१] होऊन गनीम माघारा फिराऊन लाविला. प्रस्तुत मेढ्याचे काम चालीस लाविले आहे पुढें इमारतीचेहि काम होईल रा। खंडोजी माणकरहि तेथें गेले आहेत सारांश जागा काईम जाहाला. अमृतराऊ खानवीलकर वगैरे पतके येकून तीनसे बेतालिस माणुस गोवलकोटाऊन आले; ते सिवरामपंतास लेहून तुम्हाकडे रवाना करविले आहेत म्हणून स्वामीनी लिहिले; परंतु अद्याप ते लोक तेथें आले नाहीं. ठाणेंयांस रा। खंडोजी माणकर याजकडे गेले म्हणून आर्जीच वर्तमान यैकिले. यैशास रा। चिमणाजी भिवराऊ अगर बरवाजी पाटेल यांस जमावसमेत साष्टीस पाठऊन वेसांवें अथवा वानेंरेंयास बसवावें येविशी आलाहिदा पत्रीं लिहिले आहे. त्यास तो विचार होऊन उभयतांमध्यें येकाची रवानगी साष्टीस जाहाली तरी अमृतराव लोकसमत तेथेंच ठेवावें. तो विचार प्रस्तुत होत नसिला तरी अमृतराऊ यास इकडे यावयाची आज्ञा केली पाहिजे. बहुत काये लिहिणें हे विनंती.+

*¶Chimaji is informed that Aseri is not likely to capitulate unless the reinforcements coming from Tarapur are cut off. After the fall of Sirgaon within a short time the investment of Tarapur will be commenced and that will bring the commandant of Aseri to reason. Ramaji Mahadeo is strongly entrenched at Dharavi.*

---

*No. 111*] [ पो *4-1-1738*

छ २३ रमजान

श्री

पुरवणी श्रीमत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. रोजमरेयाचा ऐवज तों स्वामींनी रवाना केलाच असेल परंतु प्रस्तुत माहीम व सिरगांवचे लोक रामचंद्रपंताबराबरचे व लाडोबाबराबरचे याणी

---

१ झटापट. + पत्र वासुदेव जोशाचें.

बहुत गवगवा केला आहेत. तकर्दमा[१] ऐवज आपण पाठविला होता तो दिल्हा व प्रस्तुत निमे रोजमरा देतो परंतु घेत नाही. ऐशास लोकास पोटास रोजमरा न देतां कामकाज वेवत नाहीं. कामकाजाचा तो प्रसंग. याकरितां लिहिले असे. तरी स्वामीं रोजमरेयाचा ऐवज सत्वर रवाना केला पाहिजे हे विनंती.[+]

¶*Chimaji Appa is requested to send supplies of money to pay off the troops.*

---

*No. 112*] [पौ *4-1-1738*

छ २३ रमजान

**श्री**

पुरवणी श्रीमत राजश्री आपा स्वामींचे सेवेसीं

विनंती उपरी. राजश्री मानाजी आंगरे याजकडे सालग्गा ऐवज येणे त्याजविसी मारनिलेस पुरवणी लेहून आम्हाकडे पाठविली तरी पूर्वींच आम्ही राजश्री बारवाजी ताकपीर यास लेहून राजश्री मानाजी आंगरे यास लिहिविले होते. त्याणी साडेआठ हजार रुपयापैकी तूर्त नेरळास रा। ४५०० देविले आहेत ते लौकरच येतील म्हणोन राजश्री बरवाजी ताकपीर याणी लि।। आहे. राहिला ऐवज चार हजार रुपये रा। विसाजी हरी मुलकाचें सचणीस आबटीयास आले आहेत त्याजकडून देविले आहेत. त्याजकडे रा। बारवाजी ताकपीर याणी माणसे पा। आहेत तेथून जाब आलियावर पुरवणी राजश्री मानाजी आंगरे याजकडे पाठऊं. विदित जाहलें पाहिजे. नेरळास साडेचार हजार रुपयाकरितां माणसे पा। आहेत तेथून ऐवज आलियावर लेहून पाठऊं. बहुत काय लिहिणे. आम्हीहि वरचेवर माणसें पाठवितों. विदित जाले पाहिजे. लोभ करीत गेले पाहिजे. हे विनंती.

¶*Letter to Chimaji Appa, about the recovery of dues from Manaji Angre.*

---

*No. 113*] [पौ *4-1-1738*

छ २३ रमजान

**श्री**

पुरवणी श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवसी

विनंती उपरी. राजश्री शकराजी केशव याजकडील वर्तमान तरी गिरनेची (गिरजेची?) डोंगरी बाहादुरपुऱ्याहोन कोसभर उतरेस आहे ती बांधावयाचे

---

१ आगाऊ दिलेला ऐवज किंवा पैका. + पत्र वासुदेव जोशाचें.

काम प्रस्तुत लाविले आहे. डोंगरीच्या घेरियास पाया अवघा जाहला. काम पक्के करितात. व वसईच्या कोटाच्या बदरासंनिध खाडीचे काठी कोळवाडीवर मोर्चा घातली. तेथून बदर जेर होते यामुळे गनिमाने बदरावर मेढा घालून बदरास आश्रा केला आणि रोजबरोज तोफाचा मारा करीत आहे. सांप्रत फिरंगियानें वसईच्या कोटावर गरनाळा माडून मोर्चावर मार करीत आहे. त्यांणी[१] जजिरे अर्नाळा वगैरे जागांची खबरदारी करणे ते केली आहे. आम्ही त्यास खबरदारी-विसी लिहिणे ते लिहितच आहो. बहुत[२] काये लिहिणे हे विनंती.

¶*The hill fort of Girna, a couple of miles north to Bahadarpura is being built by Shankraji Keshao.*

---

*No. 114*] [*4-1-1738*

ऌ २३ रमजान

**श्री**

**पुा श्रीमत रा. आपा स्वामीचे सेवेसी**

विनंती उपरी. राजश्री चिमणाजी भिवराव स्वामीजवळ आले असतील. रा खडोजी माणकर याजकडे साडेआठ हजार माणूस आहे त्यापैकीं धारावीस दोन-अडीच हजार माणूस गेले. राहिल्या लोकापैकीं घोडबंदरे तुरभे मरोळ या ठाणियास हजार दीडहजार माणूस व ठाणियास दोन हजार माणूस याप्रमाणें ठेविले तर हजार दीडहजार माणूस राहिले ते वानरे अथवा वेसावे एकाधे स्थली रवाना करून स्थळ हस्तगत होय तो विचार करावा. इतके माणूस ठाणियास राहिल्यानें जाजती कार्य तो होणार नाहीं परंतु सिबंदी मात्र चढते याजकरितां लिहिले आहे. तरी मशारनिलेस अथवा रा बरवाजी ताकपीर कल्याणास आहेत तेथें प्रस्तुत कांही कामकाज नाहीं याजकरितां त्यास लेहून कल्याणास दोनशे माणूस व भिवडीस दीडसे किरकोळी वसूलवसुलास शभर याजप्रमाणे लोक तेथील बंदोबस्ती ठेवून, राहिले लोक घेऊन वानरे अथवा वेसावियास रा खंडोजी माणकर याजकडील लोक बराबर देऊन रवाना केलियास एकाधे स्थळ हस्तगत होईल. तरी उभयतातून एका जणास रवाना केले पाहिजे. सुचला अर्थ तो लिहिला आहे. कळले पाहिजे. आपल्ये विचारे येईल ते करावे. पैका पडतो त्यासारखे काम होईल तर बरे. बहुत काय लिहिणे? लोभ करित असिले पाहिजे हे[३] विनंती.

¶*A letter to Chimaji Appa : Khandoji Manker posted at Thana. He has some eight thousand soldiers with him. The soldiers may be distributed as follows. 2,000 may be left with Khandoji. 1,500 will go to Ghodbandar, Marol and other places, 2,500 to Dharavi, and the rest to Wanare and Wesawi.*

---

१ शंकराजीनें. २ पत्र वासुदेव जोशाचें. ३ पत्र वासुदेव जोशाचें.

No. 115] [पौ 4-1-1738

छ २३ रमजान

श्री

विनंती उपरी. तोफ थोरली फुटली. मनवेल गोलंदाज व पठाण यैसे दोघे ठार पडले व भारी जखमी आहेत व दाहा पंधराजण आणखी जाहालें म्हणून लिहिले यैशांस होणार गोष्टीस इलाज आहे यैसे नाही. जें ईश्वरे केले ते उतमच म्हणावे. आपण सावध असावे. आपण ते गोष्टीची क्षीर्त[१] मानावी यैसे नाही. राजश्री लाडोबा व खंडोबा समीप होते. ईश्वरे उभयतांची खैर केली. फिरंगियाची गलबतें सावकारी सुरतेकडे जात होती. आरनालियाच्या बारियावरी आली तो जंजिर अर्नालियाहून स्वारी जाऊन गलबते दस्त केली. त्याच्या खुशालीच्या तोफा पांच काल जाल्या. जलसरच्या कारकुनांही लिहिले त्यावरून लिहिले असे. गलबतें किती घेतली तें लिहिले येईल तेव्हा तुम्हास मागाहून लेहून पाठऊन. कलले पाहिजे. अता धाकट्या दोन तोफा राहिल्या त्याचा मार संध्याकाळच करवा. तोफ फुटली त्यास इलाज काय आहे? आमचे आरब आज उठोन जातात तर रुपये २००० दोन हजार सध्याकालपावेतों पाठवणे हे विनंती.

¶*This is a letter of condolence for the disaster caused by the sudden bursting of field piece.*

---

No. 116] [19-3-1738

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. आज्ञाधारक चिमणाजी बापूजी सां नमस्कार विज्ञापना. ताा छ ९ जिल्हेज रविवार दोन प्रहर मुकाम मांडवी स्वामीचे कृपेकरून सेवकाचे व फौजेचे वर्तमान यथास्थित असे. कामणच्या डोंगरी फिरंगियानें वसविली याचे खबेरेस राजश्री शंकराजीपंत यानी माणसें पाठविली होती व आम्ही येथें आलिया-उपरी ठाणे मजकुरीचीहि माणसें पाठविलीं होतीं. त्यास तें वर्तमान बास्कल आहे. डोंगर वसविला नाहीं. राजश्री शंकराजीपंताकडूनहि पत्र आले कीं वर्तमान लटकें आहे. दोन रोज मांडवीस राहून मग बोलाऊ पाठवून म्हणून

१ क्षिति.

लेहून पाठविलें आहे. यैशास आम्ही येथील ठाणेयाचे उपरालियासी राहावे किंवा मशारनिल्हेकडे वसईस जावें तें आज्ञा केली पाहिजे. सेवेशी श्रुत होये. दोन हजार फौज वसईस आहे. शेवेसी विदित जाहलें पाहिजे हे विज्ञापना.

¶*Chimnaji Bapuji writes to Chimnaji Ballal about the campaign of Bassein :—The news of the landing of and settlement at Kaman of the Firangis is false. Shankrajipant also found on enquiry that the news was false. Please write whether we shall halt here or proceed to Bassein..*

---

*No. 117*] [ ?

**श्री**

**पुरवणी श्रीमत राजश्री आपा**
**स्वामीचे सेवेसी.**

विज्ञापना. मनवरांचे जमावांचे लोक जखमी केलवेयामध्यें आहेत. त्यांसी खर्चास नाही म्हणौन यास्तव येथील लोक कस्टी होतात. या करितां भारी जखमी होते त्यास दोन अडीच तीन पावेतो दर आसामीस रु॥ पावले आहेत. त्यानी जखम बऱ्या होत नाही, तर जखमी पाहून अनखी खर्चास देणार स्वामी समर्थ आहेत, हे विज्ञापना.

¶*Chimaji Appa is requested to advance more money to the wounded.*

---

*No. 118*] [*21-3-1738* ?

पो छ १३ जिल्हेज

**श्री**

**श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी**

विनंती. पोष्य चिमणाजी भिवराऊ व संकराजी केशव साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान तागाईत छ ११ जिल्हेज मुकाम पापडी प्रांत वसई स्वामीचे कृपे करून येथास्थित असें. राजश्री बरवाजी ताकपीर काल किले जिवधनास रवाना केले होते त्याणी जिवधन हस्तगत केली. वीस पंचवीस माणूस मारिलें. दाहावीस कडेलोट जालें. चाळीस पनास पळोन गेले. किल्ला आजीं प्रातःकाळीं हस्तगत जाहाला. स्वामीस कळावें म्हणोन लिहिलें असें. स्वामीनी धारावीस कानोजी माणकर * * * * * * * * * म्हणून लिहिलें त्यावरून आम्ही आजीं धारावी*स**मोर लोक पाठऊन आवाज बरकंदाजी व कर्णे

वाजविले; परंतु पलीकडून जवाबसाल न जाला. लोक दृष्टीस न पडिले. तरी स्वामींनी ते गोष्टीची खबरदारी करविली पाहिजे. कानोजी माणकर आले नसिले तरी लौकर धारावीस येऊन तोफा लागूं करीत तें करणार वडील समर्थ आहेत. धारावीचा बंदोबस्त सत्वर करावा, * * * पाहिजे हे विज्ञाप्ति.

¶*The capture of the fort of Jivdhan is reported to Chimaji Appa by Chimnaji Bhivrao.*

---

*No. 119*] [*April 1738*

**श्री**

सेवेसी विनंति. बाहादरपुरियाचे मेढियाचेविसी स्वामीस एक दोन वेळा लिहिले. परंतु स्वामींनी दोन वेळा लिहिले कीं मागाहून लेहून पाठऊ. त्यास पर्जन्य समीप आला जागा मुस्तेंद जाहाला पाहिजे. या करिता आम्ही आजी आठ दाहा दिवस मेढियास प्रारंभ केला आहे. दगडाचे काम कोरे घालितो. दगड लाहान तोहि मिळत नाही परंतु मेळऊन घालितो. तीन चार हात दगडाचे काम जाहाले. या उपरी दगडाचे आंतून बाहेरून मेढा देऊ घेऊ कडून (दोहीकडून?) दगडाचे काम कोरे दोन दोन अडीच हात करितो. मध्ये सा सात हात पेटी धरिली त्यांजमधे माती भरून दगडाचे बाहेरून मेढा माडाचा चौदा हात याप्रमाणे काम लाविले आहे. हे काम करावेसे राजश्री व्यंकटराव[1] व सर्वांचे विचारास आलियावरी आरंभ केला. त्वरा न करी म्हटले तरी कामास महिना दीड महिना लागेल. पर्जन्य जवळी आला यास्तव करीत असो. विदित जाले पाहिजे. मंग[2] घरे व मेढा कसा होतो? तमाम काम करीत असो. सेवेसी विदित होये हे विज्ञापना.

¶*Shankraji Keshav Phadke reports that the erection of a palisade round his camp at Bahadurpura is being hurried on as the monsoon is nearing.*

---

*No. 120*] [*March 1738*

छ ७ मोहरम

**श्री**

सेवेसी विनती. स्वामींनी नथोजी गौडा याजबराबर सांगोन पाठविले की किले वज्रगड व बाहादपुरियाचा नवा मेढा होत आहे त्याचा नक्षा[3] घेऊन येणे.

---

१ व्यंकटराव घोरपडे. २ पत्र शंकराजी केशवाचें. ३ नकाशा, प्लॅन.

त्याणी आम्हास सांगितले त्या वरून किले मजकूरचे व मेढियाचा नक्षा सेवेसी लेहून पाठविला आहे त्यावरून विदित होईल. मग काढिते समई वेडेवाकडे आले असिले तरी असो, परंतु काढिला आहे या प्रमाणेंच बंदिस्त आहे. सेवेसी कळावे या करितां लिहिले असे. विदित जाहाले पाहिजे. +सेवेसी विदित होय. हे विज्ञापना.

¶*Chimaji Appa is informed of the precautions taken for the defence of Vajragad and Bahadpuri.*

---

*No. 121*] [*3-4-1738*

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक शंकराजी केशव कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ता। छ २४ माहे जिल्हेजपर्यंत स्वामीचे कृपेकरून यथास्थित असे विशेष. आम्ही सालगुदस्तां वसईस आलो. तेव्हां बबनजी हे येऊन आम्हास भेटले. याचे हाते फेतोरीचा[१] लिहिणार दादाजी अनंत हेहि आम्हांस भेटले. त्यास दादाजी बहुतसा शहाणा माणूस माहीत होता. त्यास माहीमचे वेढियास तीर्थरूप महादाजीपंत या समागमें पाठविले होते. तेथे दादाजीस तोफेचा गोळा लागोन मृत्य पावले. त्यास दादाजीचा कबिला, भाऊ, चुलते, कल्याणास आहेत. दादाजीचे भाऊ सुंदरजी याची बायको मुंबईस आहे, त्यास याचे जातीचे कोणी ग्रहस्त हे आम्हाकडे आहेत याकरिता याची स्पर्धा करितात. बाह्यात्कार दर्षवीत नाहीं. यास्तव बबनजी व सुंदरजी सेवेसी आले आहेत. तरी सुंदरजीचे कबिलियाविसी स्वामीनी इंग्रेजास लेहून व येक जासूद पाठऊन याचा कबिला येई ते करावे म्हणजे हे कबिला मुंबईहून आणून कल्याणास ठेवितील, विदित होय. याणी आल्या ता। श्रमहि बहुत केला पुढें करीत आहेत. दादाजी मातबर मनसबेबाज होता. परंतु स्वामीकार्यावर ठार जाला. यास्तव याचा कबिला वस्तभाव ये तो अर्थ केला पाहिजे, हे विज्ञापना. या उभयतास ताडपत्री पासोड्या दोन व एक तिवट बकसीस देविले पाहिजे हे विज्ञापना. याचे ज्ञातीचे ग्रहस्त मुंबईस आहेत ते याची स्पर्धा करितात हे स्वामीस कळावें याकरितां ते लिहिले परंतु इंगरेजाचे पत्रात न लिहावें. कळले पाहिजे हे विज्ञापना.

¶*Shankraji Keshao writes to Chimaji Appa that Dadaji Anant who was both shrewd and resourceful has been killed in action at Mahim and that efforts should be made to fetch his family from Bombay by writing to the English there.*

---

\+ पत्र शंकराजी केशवाचें.

१ फॅक्टरी, वखार. (?)

No. 122] [April 1738

छ ७ मोहरम

श्रीव्यंकटेश

**सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री आपा स्वामी गोसांवी यांसि**

पोष्य व्यंकटराव नारायेण सा। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लेखनाज्ञा केली पाहिजे विशष. आपण पत्र पाठविलें तेथें लिहिलें की काडदिन याचें वर्तमान काये? त्यास, नवा जनराल वसईस आला त्यावरी यास * * * काडदिन माघारें निघोन जावयाकरितां आरमारसहित बाहीर निघोन समुद्रांत मोखारावरी येक दिवस आरमारसहित मुकाम करून रात्रीं निघोन गेल. त्यास काडदिन मुंबईस गेला. तेथें इंगरजानें त्याजला राहाविलें आहे म्हणून खंड पाटील याचे मुंबईहून माणूस आलें त्याणें सांगितले. वरकड आरमार कोठें गेलें हे कलत नाही. आरमार जाऊन आजी च्यार रोज जाले. आणखी वर्तमान आणविले आहे. आलियावरी लिहून पाठऊन. कललें पाहिजे. बहुत काये लिहिणें? धान्याची महगाई; तेहि न मिलेंसें जाले. साहा सेर सात सेर दाणे मिलत नाहीं. याउपरी आगोठचें दिवस आणि माणसांस उपवास पडों लागलें तरी उपाय काय करावा? याजकरिता पेशजी मुजरद हे वर्तमान लिहून जोडा जासुदांचा पाठविला आहे व हालीहि विनंती लि॥ आहे. तरी धान्याची तरतूद करविली पाहिजे. लोभ असों दीजे हे विनंती.

¶*Vyankatrao Narayan reports the arrival of the new General of Bassein. He complains about the scarcity of grain which must needs be remedied immediately in order to keep up the morale of the army.*

---

No. 123] [Dec. 1738?

श्री

विनंती उपर. तुम्ही चिठी पाठविली ते पावली. सविस्तर कलो आले. रा। शंकराजीपंताचे पत्र आले. त्याणी लिहिले आहे की धारावीचे नस्तावर फिरंगियाची चालीस गलबते आली आहेत म्हणून लिहिले ते कलले. त्यास फिरंगियाची चालीस गलबते येतील न येतील हा विचार कलतच आहे. परंतु त्यास फिरोन लेहून गलबताची बातमी नेमस्त आणवणे. वरकड श्रीगाव हस्तगत जालियावर दोनी फौजा येकत्र जाल्याने माहीमचे कार्येसिधी लौकर होईल म्हणून लिहिले तर

हे गोष्ट येथार्थच आहे त्यास येथील मोर्चेबंदी होणे ते होतच आहे. बालाजीपंताचा मोर्चा व गोविंदपंताचा मोर्चा पुढे चालिला आहे. जे कस्त मेहनत करणे ते करीतच आहो. लक्षीराम व नरसाबेरड पनास माणूस पलोन गेले त्याचा अर्थ लिहिला तो कलला. त्यास येविसी राजश्री विठलपंतासी लिहिले आहे. परंतु खर्डी (?) बोरघाट वगैरे मार्गाची चौकसी करितील आणि जेथे लोक आटकलतील तेथे दस्त करून पाठवितील. मोहराविसी लिहिले तर मागाहून पाठऊन देतो. आम्ही येथील खबरदारी करणे ते केली आहेच. दोहीकडेस बदरावरी दोनदोनसे माणूस व सेभर सेभर राऊत दोहीकडेस ठेऊन रात्र दिवस खासा आम्ही जाऊन खबरदारी करीत असतो. चर सतर हातपावेतो चालिले आहेत. ते जागा मोर्चे घालावे येसेहि योजिले. खावंदाचे पुण्येकरून होणे ते होईल. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*A request from Malhar Hari (?) to ascertain the number and movement of the enemy's ships near Dharavi. "The siege of Mahim", he says, "is progressing. Vithalpant has been informed to arrest deserters. The port is strongly guarded."*

---

*No. 124*] [*Dec. 1738* ?

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामींचे सेवेसी

विनंती. सेवक बालाजी गोविद सबनीस किले माहुली सां नमस्कार विनंती. येथील कुशल जाणून स्वकीये लेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. सेवकाचे किले मजकूरचे वर्तमान यथास्थित असे. स्वामीची आज्ञा घेऊन आलो त्यास वसईस स्वार होऊन गेलो. तेथील वर्तमान पाहातां तो करणाटकी लोक तो कामाचे मर्दाने म्हणून स्वामीने त्यांचा सरजाम करून वसईचे मोहिमेस रवाना केले परंतु मावले लोक व हशमी कोकणे लोक हे तो पुढे युध्यास पुढे होताती. त्याचे पाठीवर करणाटकी आहेत म्हणून दिष्टावा दाखविताती. त्यास युध्याचे प्रसंगी मागे गळंती करिताती ! हेच मावळे लोक व कोकणे लोक युध्यास निभाव होताती ! स्वामीचा नक्ष[१] तो मावळे व कोकणे करिताती ! ! करणाटकी लोक तो कार्येचे नाही. त्यामुले मावले व हशमी लोक फौज पाठीवर आहेत म्हणून निभाव करून जाताती. त्यास करणाटकी लोक यास अंतर देताती. यामुले भले लोक इसिमेमुले[२] कामास येताती. सेवकाचा हेत आहे कीं दोन हजार राऊत व पायाचे लोक दोनचार हजार येणेप्रमाणे सरजाम होईल तरी रोजमुरेयाची बेगमी जाहली तरी दवण केले[३] माहीम व चिचणी टारापूर[४] डाहणूवरून दवणापर्यें(त)जावयाचा बेत आहे. स्वामीआज्ञा

---

१ कीर्ति. २ ईर्षेमुळें. ३ केळवें. ४ तारापूर.

होईल तरी आपली उमेद आहे. राजश्री खंडोजी माणकर स्वामीचे सेवेसी आले आहित तरी त्यास स्वामीने आज्ञा करावी की धारावीचा मोर्चा खाईम केल्याने तिकडून वसईचे लांकूड फाटे पाणी उदक मना होई. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Balaji Govind Sabnis at Mahuli fort asks Chimaji Appa to allow him to invade the enemy's territory near Dawan and Mahim.*

---

*No. 125*] [*About 4-12-1738 or Jan. 1738*

श्री

सेवेसी विनती. वसईस पूर्वी ज(न)राल होता ठाणियातून पलाला तो फिरोन जराली करून आला त्याजवली कारभारी पेद्रू[1] दमेल जो महिमास व सिरगाव व असेरीस गेला होता तो आला आहे. जरालानी कोटात असावे व पेद्रू दमेल यानी बाहेर स्वारीसिकारी करावी येसे करून आले. याची उमेद फारसी बाहेर यावयाची आहे. आला तरी स्वामीचे पुण्येकरून फजीत पावेल. कार्डदिन[2] गोवियास गेला. त्यास- मागमे मर्तिन[3] सिरवेल व आणखी दोन मातबर फिरंगी त्या समागमे गेले हे वर्तमान आहे. स्वामीस कलावे या करिता लिहिले असे हे विज्ञापना[+]

¶*Shankraji Keshav Phadke reports that the former General of Bassein having planned new tactics has returned to the fort with Pedro DeMello. While the General guards the fort Pedro DeMello will tire out the besiegers by constant sallies.*

---

*No. 126*] [*Jan 1739*

श्री

पुा श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती यैसीजे. राजश्री बाबूजी नाो श्रीमंताकड बुऱ्हानपुरास गेले. सकराजी निकम व लक्ष्मणराऊ जालनापुराकड गेले या करिता रेणूराऊ येथे राहिले आहेत. त्यासी कागद पाठविले आहित. उतर आलियावरी जातील. सकोजी बायेलास स्वामीनी आम्हाकडे वरात देविली त्यासी आम्हाकड यैवज काये? रा मल्हारपंत पोटास देतील तेव्हा खावे. रा सिवाजी भोसले यासी रुपये येक हजार देविल तेहि पावले नाहीत. व लोकानी गवगवा केला आहे. घोडियास नालमेख

1 Predro D'Mello. 2 Antonio Coardino Froes. 3 Martinho Da Silveira.

\+ पत्र शंकराजी केशवाचें.

मुतलख नाही. चाकरास धडुतपाघरूण नाही म्हणौन गवगवा केला आहे. कंल्याणीचे मुकामी आम्ही लोकासी कबूल केले आहे की घाटावरी गेलियावरी काही अर्जबाब नालमेखेस देतो. त्यासी येथे येक रुपयास जागा नाही व रा मल्हारपती म्हणतात की आपण आणीक रोजमरा देईन पुढे आपणास रुा मिलत नाही. तर राजश्री विस्णुपंताकड आर्जबाबर्चा वरात देविली पाहिजे व पुढे आम्हास काये आज्ञा ते केली पाहिजे व राजश्री वेंकटरायाकडील गोव्याचें नूतन वर्तमान काही शुभ आले असेल व वसईचे शुभ वर्तमान फतेचे कृपा करून लिहिलें पाहिजे. बहुत काय लिा हे विज्ञाप्ति.+

¶*Tubaji Anant to Chimaji Appa informing him of the whereabouts of some men—Bapuji Naik Nikam, Laxmanrao—and further requesting him to write to him the news of the victory at Bassein.*

---

*No. 127*] [*11-1-1739*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विज्ञापना. डाहाणूस राजश्री राणोजी सिंदे याणी फते केली म्हणोन सेवकास हरशाचें वर्तमान लिहिलें त्यावरून संतोश जाला. यैशास स्वामीचा पुण्यप्रताप यैसाच आहे. छेत्रूचा पराभव व्हावयास विलंब लागणार नाहीं. सेवेसी श्रुत्य होये हे विज्ञापना.

¶*News of the fall of Dahanu is reported by Chimaji Appa.*

---

*No. 128*] [*Jan. 1739 ?*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. तारापुराजवळ च्यार कोसांवर सिरगांवी फिरंगियाचे ठाणे आहे. जुजती एक माडी आहे. तेथें जुजते शंभर माणूस आहे. याखेरीज गावकुटार आहे तो गाव गैरकौली मवास आहे. त्याचे गळां पडोन नतिजा देऊन स्थळ हस्तगत केल्यानें कार्याची गोष्ट आहे. म्हणून राजश्री विठलपंत यांणीं सांगितले. त्यास दारू गोली त्यांजवळ थोडकीशी होती ते लोकांस देऊन फौजसुधां सिरगावास जातो. दोन टोळ्या दोवेशीही करून झोंद उडऊन गावात सिरावें; त्यानंतर

---

+ पत्रलेखक तुबाजी अनंत.

1490

माडीवर येलगार च्यार दिवसांचे कार्य आहे. तेथील हवी आणिले आहेत. लहानसें स्थळ आहे परंतु मजबूद आहे. एक माडी च्यार तोफा आणि शंभर माणूस याप्रमाणें साहित्य तेथें आहे. परंतु पाणी माडीबाहेर आहे. स्वामीच्या पुण्येकरून कार्य होईल. स्वामींनी दोन हजार माणूस व पांचसे राउतांची नेमणूक केली त्यापैकी साडेआकरासें माणसांची बाा रवानगी पैकी गोपाळराव अगदी जमा(व)सुधां आला नाहीं. बसप्पा जमातदार कानडाजमाव टिटवालियाचे मुकामाहून पळोन गेला. त्याबरोबर माणूस काय गेले हे नकले. तेव्हाच स्वामीस ल्याहावें त्यास मार्गी कोठे चुकले असतील ते दुसरे तिसरे मुकामी आटोपून घेतील म्हणून लिहिले नाहीं. आजताा आले नाहीत याजकरितां लिहिलें आहे. त्यांचा शोध करून पारपत्य करावें अगर त्यांचे बोलीचे वकील असतील त्यांस या गोष्टाचा जाब पुसावा. अडीच तीनसे माणूस राजश्री नारायण जोशी यांकडून देविले तेहि अद्यापि आले नाहीं. त्यास आज्ञा करऊन जमाव प्रयोजनास येऊन लौकर पोहचे ते गोष्ट करवावी. राहिले दोन हजारपैकीं आठ साडेआठसें आणि राजश्री विठलपंत च्यारसे येकून गणतीचे माणूस बारातेराशे आणि राऊत पाचसे स्वामींनी नेमिले त्यापैकीं राणोजी जाधव व राऊत सवीस खंडनाक १२ व सुरराव यादव १८ आठरा एकूण छपन्न आले यापैकी काजकामास निमे कदाचित निघतील. मलोजी थोरात अद्यापि आले नाहींत असे असतां एवढ्यानसीच जाऊन ठिकाणी बसावें त्यास दारूगोळी आद्यापि आली नाहीं. त्याविना काम चालत नाहीं. तारापूर तो निमे वसई आहे. तेथे माणूस व जुजाचे सामान त्याचे पडोशानें असलिया कार्याचे आहे. त्याच्या ठाण्याची भरती होऊन साहासे सातसे माणूस फिरते आहे म्हणून येथील माहीत आहेत ते सांगतात. कैसेहि असो परंतु उदईक स्वार होऊन ठिकाणास जातों. सेवेसी निवेदन होय हे विज्ञापना.

¶*Chimaji Appa is requested by some general to reinforce him in his attack upon Sirgaon, a stronghold of the Portuguese well equipped with ammunition and men.*

*No. 129]* *[22-1-1739*

श्री

श्रीमंत राजश्री आपा यांप्रति

वासुदेव दीक्षित अनेक आशिर्वाद उपरी. येथील क्षेम पौष बहुल नवमी सोमवार जाणून स्वकीये कुशळ लखन करणे विशेष. आपण पत्र पाठविले पावोन वर्तमान कळो आलें. माहीम किला हस्तगत केला म्हणून लिहिलें त्यावरून परम संतोष जाहला. रात्रदिवस या गोष्टीचे श्रीसंनिध प्रार्थना करितों. पुढेहि

1491

सत्वरीच शत्रु पराभवाते पावेल. समाधान असो द्यावें. पा पाचोरे याचे दर-महाविसीं लिहिलें त्यास अगोदर श्रीमंत राजश्री रायाकडून पत्रे आली होती यावरून सातारियाची हुंडी रुा २१०० एकवीससे कुसाजी नाईक दसपुत्रे याजवरी करून पौष शुध सप्तमीसच रवाणा केली असे. पावेल. घेऊन उत्तर पाठविले पाहिजे. सदैव येणारासमागमे हर्षाचें वर्तमान पत्री लिहित असिले पाहिजे. बहुत काय लिहिणें. परमा व नथु कासीद यास रुा १२ बारा देविले त्याप्रमाणें फाल्गून मासचा दरमहा पाचोरियाचा त्यापैकी दिल्हे असत. कळले पाहिजे हे आशिर्वाद.

¶*Wasudeo Dikshit Patankar congratulates Chimaji on the capture of Mahim.*

---

*No. 130*] [*26-1-1739*

**श्री**

**श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी**

पोष्य विस्वासराऊ कृष्ण थोरात कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. ताा छ २६ माहे शवाल पौश वद्य १३ शुक्रवार मुकाम बहादूरपुरा नजीक किले वसई स्वामीकृपेकरून वर्तमान येथास्थित असे विशेष. आज्ञेप्रमाणे स्वार जाहलों ते मजल दरमजल येथें येऊन पोहोचलो. राजश्री खंडोबा व सर्वत्र सरदार लोक यांच्या भेटी जाहल्या. सर्वांहि * * ल दाखविले तेथे येऊन राहिलो. या नंतर काल २५ छ शवाली गुरुवारी दोप्रहरा वर्तमान ऐकिलें कीं किले तारापुर फते जाहला, त्यावरून हर्शायेमाने राजश्री खंडोबा व सर्वत्र सरदार लोक मंडळी व आपण येथे मेढापर्यंत जाऊन संपूर्ण तोफखाना आवाज करून स्वामीचा प्रताप दर्शविला. वरकड आपण आज्ञेप्रमाणें वर्तणुकेस चुकत नाहीं. परंतु रोजमरा, स्वामीही आज्ञा केली त्यामधे खर्च पुरत नाहीं. येथेहि स्यइन्यापेक्षां धान्य वगैरे जिनस सवाईने महर्ग आहे. यास्तव कृपा करून इजाफा रोजमरा व कापड सनगे

२५ तिवटे
५० सेले जोट दोरवे
१० गजण्या
---
८५

याची आज्ञा केली पाहिजे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Vishwasrao Krishna Thorat congratulates Chimaji Appa upon the successful capture of the fort of Tarapur.*

*No. 131*] [*Feb. 1739*

श्री

सेवेसी+ प्रार्थना येसीजे. मोरच्याचे जवलील झाडझाडूर दूर जाते. आम्ही गोटात बैसलो. धारावीस मोरच्यात जावे तरी दुबारी मेहनत कैसी होईल ? आजी च्यार कुदली व च्यार कुऱ्हाडी जेबून दिल्ह्या. त्यास दांडा नाहीं. मोडकी हतेरे दिली. आम्ही नीट कैसियानी करावी ? प्रथक काम नेमला याकरिता ते मन घालीत नाहीत. त्यासी कटकट काय म्हणोन करावी ? तोफावेगल आम्हासीच आपले पथकानिसी तेथे बैसावयासी आज्ञा होइल तर जाऊन बैसू. स्वामी म्हणतील कीं आजी च्यार दिवस लिहिले नाही ? त्यास आजी साहित्य करितो, उद्या मोरचा कायम करून देतो, म्हणोन दिसगत ल्याहावयासी लागली. लोकाचे व मेढियाचे तोफाचे साहित्य जाहल्यावेगळे तेथे मोरचा बैसविल्याने टिको देणार नाहीत. आवघी गलबते येऊन एकदा गला पडतील. याकरिता मजबुदीने मेढा, तोफा, दारुगोळी व लोक जेजाला तेथे पाहिजेत तेव्हां टिकाव होईल. सेवेसी श्रुत होय विज्ञाप्ति.

¶*Tubaji Anant places before Chimaji Appa the difficulty in going back to and conducting an attack at Dharavi.*

---

*No. 132*] [*3-2-1739*

छ ४ जिल्हज

श्री

श्रीमंत राजेश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक तुबाजी आनंत सां नमस्कार विनंती. येथील क्ष्म (क्षेम) ताा छ ३ जिल्हेज स्वामीचे कृपाकटाक्षे सेवकाचे वृत कुशल असे विषश. कृपा करून छ २९ जिलकादचे आज्ञापत्र आले ते छ २ रोजी पावले. तेथे आज्ञा की आगऱ्याचे लोक व तुम्ही खाडीकाठे मोर्चा चालऊन धारावीत कुमक पाणी जाऊ न देणे. तोफानी मारगिरी गलबतावरी करून गलबत बंदरात राहू न देणे. रा नारोजी कडू व खंडो गोमाजी डोगराकडून येतील. रा गोविंद हरी व राजश्री खंडोजी माणकर पछमेकडून येतील म्हणोन कितेक आज्ञा केली त्याचप्रमाणे अवघियाचे मोर्चे लागू जाहाले. बंदराकडून कालपासून येक माणोस गावात जात नाही व गावांतील बाहीर निघत नाही. आवघे मोर्चे हातधोंडिया-

---

\+ पत्र तुबाजी अनंताचे. १ खराब, भिकार.

वरी जवल गेले आहेत. आमच्या मोर्च्यास आस्रये काशाचा नाही. गलबताचा मार उजवे हाते (व) सन्मुख कोटावरील मार फार होतो. मोर्चे वाल्चे तोफेच्या मारानी ढासलतात. काली दोघे जखमी रेजगीने[1] जाहाले. बर, स्वामीचे पुन्ये समर्थ आहे. मेहनतीस कोणी आंत(र) करीत नाही. तोफापुढे तबक येक नेले आहे. तोफाजवल लोक थोडे राहातात. वख्तेहार्वख्त[2] क * ना आणिक च्यारसे माणोस इकडे असते तरी बरे होतो. समई आमची कुमक कोणास होणार नाही. आवघी कुमक स्वामीचे पुन्ये आहे. बहुत काय लिहिणे. सेवेसी स्रत होये हे विज्ञाप्ति.

¶*Tubaji Anant reports to Chimaji that every precaution is being taken to see that the beleaguered place receives no help from outside. The enemy is keeping up an incessant fire in order that the besiegers may withdraw.*

---

*No. 133*] [*30-1-1739*

**श्री**

**श्रीमंत राजेश्री आपा**
**स्वामीचे सेवेसी**

विनंती. सेवक तुबाजी आनंत सां नमस्कार विनंती. सेवसी प्रार्थना यैसीजे. येथील क्षेम तां छ २० जिलकाद मो धारावी स्वामीचे कृपाकटाक्षे सेवकाचे वृत कुशल आसे विषश. येथील वर्तमान तर काली सोमवारी आमचा व आंगऱ्या-कडील मोर्चा खाडीकाठीचा पुढ दरवाजियासन्मुख तीराचा टपा खाचा खणून भार लाऊन काईम केला. तेथे तोफा न्यावयाचा मोठा लाग होता. परंतु काये करावे? सरंजाम आम्हास आनकूल नाही. मागील बगले न्यावे तर मागील आस्रये मोडितां नये. आवघ्या लोकास पुढ सोठ(?)[3] नाही. आंगऱ्याचे लोक वेलू आणावयासी पाठवावे तर ते म्हणतात की येकदा आम्ही वेलू मेढा आणून मोर्चा घातला तेथून पुढ नेला. येथून पुढ न्यावयास सामान देणे. तोफा पुढे नेऊं. तोफाची मारफात त्या लोकास ठाऊक आहे. आम्ही शेरीरद्वारा स्रम-साहास करावयास आंतर किमपि करणार नाही. मोर्चा पुढे नेला. रा रामाजी माहादेऊ याचे पाच जेजालबारदार व करोल व सिपाई दोनसे माणोस नेऊन बैसविले. रात्रंदिवस तेथच असतो. दरवाजा बंद केला. पाणकोटाचे

---

१ तोफांतल्या छऱ्यांनीं किंवा खुर्यानें. २ हरघडी. ३ जागा ?

पछमेकडे गनीमानी खिडकी केली. तिकडून कालीपासून आमदरत[1] करितो. तिकड येक मोर्चा काईम जाहालियाने कुली आमदरसी बंद होईल. माणकरापासून चागले (?) मेढियाचे सामायेन आम्हास प्राप्त होत नाही. रात्री दुसरी तोफ फुटकी पंचरसी माणकरानी आमच्या मोर्च्यात आणून टाकिली. तिणे दोन आवाज होताच फुटोन जाईल. ते तोफ लागू होत नाही. येक तोफ आहे तिणे दाहावीस आवाज दरवाजियावरी मारगिरी करितो. वर(कड) आवघे वर्तमान खंडोजी जासूद सेवसी निवेदन करील. बहुत काय लिहिणे सेवसी स्रत होयें हे विज्ञाप्ति.

¶*Tubaji Anant explains his difficulties in breaching the walls of Dharavi owing to lack of ammunition.*

---

*No. 134*] [*30-1-1739*

**श्री**

**पुरवणी श्रीमंत राजश्री**
**आपा स्वामीचे सेवेसी**

विनंती[2] यैसीजे. दरवाजियावरी येक तोफ लागू केली. त्याने दरवाजियाबाहीर माणूस निघत नाहीं व गलबतें ये तोफेने जुमेस[3] खात नाहींत. गलबत दरवाजियापुढे पूर्वीसारखें लागत नाहीं. पाणकोटाचे पछेमेकडे गलबतें लागतात. तिकडे मोर्च्या मातबर घातल्यानें तिकडे गलबतें लागू होणार नाहीं येविसीं खंडबास सांगितलें. ते हैगई करितात. धारावी जेर करावयाची तोंड बंदरकिनारा दोन आहेत. आतां नवा दरवाजा पछमेकडे धारावीकरानी पाडला तिकडून राबता लागला आहे. कृपा करून पांचसें माणसें व तोफासरंजाम जालिया पूर्वेस मजबूद मोर्च्या काईम होईल. आगऱ्याचें साडेतीनसें माणोस पैकीं दोनसें आडीचसें मोर्च्यांत राहतें व आमचें आडीचसें राहते. आणिक पांचसें माणोसाची मदत जाहालियानें दरवाजियानजीक मोर्चा काईम होईल. पुण्य स्वामीचें समर्थ आहे. इतकियानिसीच तेथें मोर्चा लागू करितों परंतु मेढा घातलेवेगल टिकाव होणार नाहीं. गलबताचा व किल्याचा मार. दोनी मार सोसणार नाहींत. म्हराटे लोक कोसावरून मेढा आणणार ना(हीं)त व दास बगल (?) करीत नाहींत

---

१ वहिवाट, वापर, वाग. २ हे पत्र तुबाजी अनंताचें. ३ भीति, जरब.

याकरितां पाचसे माणोस चागल मारफाती दिलें म्हणजे दुसरे रोजीं दरवाजा पाणकोट पाडितों. येथील वर्तमान मनोहर सेवेसी निवेदन करितां स्रत होईल हे विज्ञाप्ति.

¶*Letter to Chimaji Appa reporting about the progress of the siege of Dharavi.*

---

*No. 135*] [*30-1-1739*

**श्री**

**पुरवणी श्रीमंत राजश्री आपा**
**स्वामीचे शेवेसी**

सेवेसी विनंती. आम्हाकडील मोर्चा, किलेखाली गायेमुखावर घातला आहे. याजकरितां गनिमाचें पाणी तों बंद जाहालें. काली गनीम बाहीर निघोन आला तों मेढा आमचे उजवे हाते वाळूवर आहे त्याजवर चाळून आले. मग आम्हाकडील लोक मेढ्यापुढ धावोन जावोन युध्य केलें. आम्हाकडील माणूस सातआठपावेतों जखमी जाहालें. परंतु गनीम माघारां खाडींत नेऊन घातला. मेढ्यांत आरब होते त्यांनीं बहुतसा मार सोसोन टिकोण राहिलें. आजीं छ मजकुरीं गनीम दोनप्रहर जाहलियाउपर मेढ्यापुढ चालोन आला. मग आम्हांकडील लोक घाटगे व साखरोजी व धायेभर व गायेकवाड यांजकडील लोक जाऊन फारशी मारामार केली. गनीम माघारां नेहोन घातला. आम्हांकडील व राजश्री खंडोपंताकडील मिळोन माणूस सातआठ पावतों जखमी जाहालें. गनीमाकडील काली आजीं मिळोन दाहा माणूस मेलें. जखमी बहुतच जाहले आहे. परंतु आजमास कांहीं कळत नाहीं. मुडदे दोन रोजांत दाहा पाहिलें. गनीम तों रोज उठोन मेढ्यावर येऊं लागला. आणखी कोठें गनीमास बाहेर निघावयास जागा नाहीं. स्वामीचें पुन्य पदरीं आहे; कांहीं चिंता नाहीं. सेवेसी विदित जाहल पाहिजे. हें विज्ञाप्ति.

¶*Letter to Chimaji Appa reporting about the progress of the siege of Dharavi.*

---

*No. 136*] [*After Jan. 1739*

**श्री**

विनंती उपरी. बाजी भीवराऊ आपली बाजूच एक होती परंतु होणारास उपाय काय ! त्याचा पुत्र बापू बरा शहाणा आहे. खटपटेस चुकत नाहीं.

त्याजवरी लोभ करणे तैसा करीत असों. राजश्री चिमणाजी भीवरावहि बरे खटपटे, शहाणे, मर्द आणि सुसील आहेत. त्याजवरी सर्व प्रकारें कृपा करून लौकीक उत्तम दिसे ते करावें, म्हणून लिा ते कलले. यैसियास बाजी भीमराव कार्यकर्तें मनुश्य होते आणि कामावरी खर्च जाहलें. त्याजमागे त्याच्या मुलावरी व भावावरी लोभ करावा यापेक्षां अधिकोतर काये ? त्यास बापू आपणाजवळ आहे त्याजवरी आपण लोभ करीतच आहेत. राजश्री चिमणाजी भीमराव आम्हा समागमे आहेत. येथील कितेक कामकाज घेणे ते मारनिलेचे हातून घेत असों. ज्या गोष्टीने याचा लौकीक उत्तम दिसे तें तेच केला जाईल. लोभं+ आसो दीजे हा आसीर्वाद.

¶*On being informed of the death of Baji Bhivrao on the battle-field, Bajirao assures Chimaji Appa of better treatment being accorded to Baji's son and brother.*

---

*No. 137*] [*Feb.-March 1739*

श्री

विज्ञापना यैसीजे. पांच लक्ष रुपये आमचे पदरी पडले, त्याचा तपसील नेमणूक श्रीमंत राजश्री आपा स्वामी(हीं) करून दिली त्या आज्ञेप्रमाणे

| | |
|---|---|
| ३५०००० | श्रीमंत आपांकडे वसईस रवाना केले. |
| ३४८०० | राजेश्री बाबूराऊ मल्हार याजबाबत राजश्री शामजी गोविंद यास देविले ते देऊन कबज पाठविले. |
| २५००० | वो रा वासुदेव दिक्षित यास रदकर्जपैकी देविले ते देऊन कबज पाठविले. |
| १०००० | रेणूराऊ यादव यास सिसे वगैरे सामान खरीदी करावयास देविले ते दिले. |
| १४२५ | परवानियाबा खर्च मोगलाई दरबारात जाला. |
| ४२१२२५ | |

बाकी ७८७७५ यैवज राहिला तो कुल सातारियाच्या हुंडिया रा दादोबा पुरधर जागे व पुणियाच्या हुंडिया करून पाठऊन दिल्या सेवेसी विज्ञापना केली

---

\+ पत्र बाजीरावाचें आहे. येथून अक्षर बाजीरावाचें.

असे. कृपा लोभ असो दीजे हे विज्ञापना. श्रीमत राजश्री आपा स्वामी वसंई प्रांते आहेत ईस्वरइच्छेन स्थलहि हस्तगत लवकरच होईल. श्रीमंत राजश्री नाना पुणियास आले हे विज्ञापना.

*¶Peshwa's agent possibly at the Court of the Nizam renders an account of the sums received by him. Three and a half lakhs were sent to Chimaji Appa at Bassein to carry on his struggle with the Portuguese.*

---

No. 138] [13-2-1739

**श्री**

**श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी**

सेवक तुबाजी अनंत दोनी कर जोडून सां नमस्कार विनंती. सेवसी प्रार्थना यैसीज. ता १४ जिलकाद मो भाईंदर स्वामींचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशष. स्वामीची आज्ञा घेऊन मजल दरमजल मालाडास आलो. तो मार्गी वर्तमान आले की रा खंडोजी माणकर यानी गडी घेतली. मग तेथेच मुकाम केला. तेथून पत्र त्यासी पाठविले. त्यानी उतर लिहिले की उदईक कासीवरी जातो ; तुम्ही येणे. दुसरे रोजी कूच करून छ १३ रोजी कासीवरी आलो. आजी छ मारी भाईदऱ्यावरी आलो. साकूचे काम उदईक होईल आणि अवघे धारावीस जातो. स्वामीचे पुणेकरून जे होणे ते होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

*¶Tubaji Anant keeps Chimaji Appa informed of his movements in the Konkan. He goes from Malad to Kasi, and thence to Bhainder and Dharavi.*

---

No. 139] [16-2-1739

**श्री.**

**श्रीमंत राजेश्री आपा स्वामीचे सेवेसी**

विनंती सेवक तुबाजी अनंत सां नमस्कार विनंती. सेवसी प्रार्थना यैसीजे. ता छ १७ जिलकाद मो धारावी स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित आसे विशष. कृपा करून छ १३ जिलकादीचे पत्र पाठविले ते छ १४ रोजी तिसरा प्रहरा पावोन बहुत संतोश पावलो. तेथ आज्ञा की * * गलबताचा मार बहुत होतो याकरिता मुरध्याच्या खाडीकडेस रा संकराजी केशव याच्या मोर्च्याचे सुमारे मोरचा घालणे. सर्व साहित्य तोफा लोक दारूगोला जे साहित्य लागल ते रा खंडोजी माणकर देतील. ते जागा मोरचा मजबुदीने बैसऊन,

मारगिरी गलबतावरी करणे म्हणौन आज्ञा केली व रा बाबूरायानीहि जबानीनी कितेक सांगितले व आजीच छ १९ रोजीचे पत्र आले तेथेहि आज्ञा पूर्वीप्रा लिहिली. त्यासी येथे येऊन तीन दिवस जाहाले. खंडोजी माणकराची ई ताल की बात ई ताल ( ? ) नाही. तमाम लोक मोरचेचे काम चालविले. आम्ही रिकामे गोटात बैसलो. रा खंडोजी माणकरास साहित्याविसी आज्ञा होती. ते बोलिले की आम्हास खावंद लिहिते तर खाडी बंद करितो. तोफा आणून देईल खाडी बंद करून घेणे. आम्ही आपले साहित्य करावे की दुसऱ्याचे करावे? तीन वेला त्याचेथे आम्ही व बाबूराऊ जाऊन साहित्याविसी बोलिलो त्यासी हेगतेगे[1] यैसे बोलतात. साहेबकामाची, दुसरचे साहित्याची तिडिक नाहीं. आपली आपली ज्याची त्यासी लागली आहे. येथील प्रसग व्हावा तर याचे कामास आम्ही अलो नाही साहेब चाकरीस आलो. करोलास दारू एक सर आगर गोली येक दिली नाही. आलियावरी पाठवितो यैसे म्हणतात. थोर सरदाराचे पदरी स्वामीनी आम्हास बांधले! आंगऱ्याचे आडीचसे माणोस त्यानी सांगितले त्यासहि इस्ताद मिलत नाही! काम काही मोर्च्याचे चालत नाही. सेवसी विदित होये हे विज्ञाप्ति.

¶*Tubaji Anant, who has been asked to guard the creek of Murdha so as to make it impassable for the enemy, complains that Khandoji Mankar has refused to supply the necessary ammunition.*

---

No. 140] [23-2-1739

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक तुबाजी आनंत सां नमस्कार विनती प्रार्थना यैसीजे. ता छ २४ जिलकाद मो धारावी स्वामीचे कृपाकटाक्षे सेवकाचे वर्तमान येथास्तित आसे विषश. स्वामीची दोन तीन आज्ञापत्र आली की खाडीकाठी मोर्चा घालणे, गलबते फिरतात ती बंद करणे. त्यासी आज्ञेप्रमाणे शेरीरद्वारा स्रम करून रा खंडोजी माणकरानी जागा नेमून दिली तेथे जाऊन मोर्चा घातला. येक तोफ लहानसी दिली त्यासी दारूगोला नाही. सरंजाम मागता बेजार जाहालो. कालीचे लडाईचे वर्तमान अवघियानी लिहिले आसल. राजश्री बाबूराऊ मोर्च्यात होते हे विनती करतील. येथील प्रसंग अवघा बाबूराऊ सेवेसी निवेदन करतील. बहुत काये लिहिणे? सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Tubaji Anant reports to Chimaji Appa that batteries have been erected by the side of the creek to prevent enemy ships moving in and out. He complains he is helpless for lack of artillery and ammunition.*

---

१ टाळाटाळीचें.

No. 141] [7-3-1739

श्री

पुा श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे शेवेसी

विज्ञापना. ताा छ ७ जिल्हेज धारावीचे कोटात तोफा धडशा ८ व फुटकी १ व गरनाला २ दोन गोले व दारू वगैरे कारसाज मोजदाद केली त्याची याद शेवेसी पाठविली असे. तुकोजी पवार यानी चाकरी उतम खेसीने केली आहे यास बक्षिस उतम दिल्हे पाा. वरकड वर्तमान जबानी तुकोजी पवार सांगता विदित होईल. राजपुरी प्रांतचा गला शावकार आणणार त्यास शामलास मानाजी आंगरे यांस कागद पाठविला पाहिजे आण सरकारचे दस्तक फकरुदिन डबीर याचे नांवे पाठवावें आण स्वामीनी दोन अडच रुा भाडें द्यावें म्हणोन मागे लिा होते. त्यास शावकार म्हणतात की फिरंग्याचे व संभाजी आंगरे यांचे जोखीम कबूल करावे तेव्हा रुपया येक ज्याजती भाडें देतील तर आम्हांस कबूल होईल नाही तर जोखीम सरकारचें. याची आज्ञा केली पाो. व दोनसे खंडी भात खुशखरीदी ते प्रांते घ्यावयाची आज्ञा असिल्यानें खरीदी गला निमे व सरकारचा निमे यैसा जकात देऊन आणावा लागेल यासाठीं ज्याजती रुपया मागतात. याची आज्ञा करणार स्वाम धणी समर्थ आहे. हे विज्ञेप्ति.

¶*Letter to Chimaji Appa, immediately after the reduction of Dharavi fort. The writer strongly recommends Tukoji Powar for his loyal exertions in storming the Dharavi fort.*

---

No. 142] [4-3-1739

पो छ ४ जिल्हेज

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक नारोजी कडू दंडवत कृतानेक विज्ञाप्ति. विनती येथील क्षेम ताा छ ४ जिल्हेज पावेतो वर्तमान येथास्थित आसे विशेष. स्वामीकडून आज्ञापत्र छ १ जिल्हेजी आले तेथे आज्ञा केली जे तुम्ही व राा खंडोबा[1] व राा तुबाजीपंत व आंगरेकडील लोक यैसे मिलून पाणबुरूज घेणे. तरी रोजबरोज मोर्चा चालवणे

---

१ खंडोजी माणकराचे?

तो चालवीतच आसो. आम्हाकडील मोर्चेस डाविहाते कडा लागला आहे, त्याचेच किनारेन मोर्चे चालवावे लागतात. मोर्चेयावर गलबताचा मार व कोटावरून मार व पाणबुरूज थैसे तीन मार होतात. रोजबरोज चारपांचे माणूस जखमी होते. किलेवरून गरनाला व हुके येऊन पडतात. आजी छं मजकुरी आमचा मोर्चा आहे तेथून पाणबुरूज तीनसे साडेतीनसे हातपयत आहे. मोर्चेपासून पावंणसे हातावर करोल बैसविल आहेत. पुढहि रोजबरोजे मोर्च चालवीतच जातो. वरकड चौगिर्दा आवघ्याचे मोर्चे बैसल आहेत. त्याच वर्तमान माहादजी लिंगोजी जासूद सेवसी विदित करील त्याजवरून कलल. आम्हापासी स्वामीनी हुजरातची पतके जे दिली आहेत ते काही कस्टमेहनत करावयास आंतर करीत नाहीत. रा॥ सुभानजी सेलार व रा मानसिंग घाटगे व धायेभर व रा साकरोजी कडू व मावले व किरकोली आहेत त्यास स्वामीनी समाधानपत्रे पाठवावी. चाकरी तों लोक करीतच आहेत परंतु स्वामीची आज्ञापत्रे आलियान यास समाधान होईल. सेवसी विदित जाहल पाहिजे. आमचे मोर्चेयावर गलबते उजवे हात आहेत त्याचा मार फारच होतो. त्यास गलबते जावयाची रा खंडोजी माणकर यास आज्ञा करणे ते करावी. गलबते माघारी सारावयाचा सरंजाम काही आम्हापासी नाही याजकरिता सेवसी लिहिले आसे हे विज्ञाप्ति.

¶*Naroji Kadu to Chimaji Appa, that he is sparing no pains to raise batteries to attack the seaward bastion. It was a troublesome task the batteries being exposed to the enemy's fire from sea and land. Chimaji is requested to write to the men to hearten them.*

---

*No. 143*] *[8-3-1737 or 29-3-1739*

श्री

श्रीमंतु राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक होनाजी बलकवडे कृतानेक विज्ञापना. तागाईत छ ८ जिल्हेज पावेतो सेवकाचे वर्तमान येथास्थित असें विसेष. स्वामीची आज्ञा घेऊन निघालो ते प्रातकाली च्यार घटका रात्रीस येथें आलों. त्यास आम्हा * * गनीम जब(र)दस्त जाला आहें. इंग्रजाने तो त्याची कुमक शर्तमर्दीन * * रितो आहे. वानरेयाची माडी मारित्ये आणि अरमारावरून इंग्रज मारितो. आणि माहिमावरून इंग्रज मारितो. गलबते दोनेकसे आली आहेत तीहि प्रस्तुत भरती येई तंव अवघी मारीत नाही. पाचसात मारीत आहेत. पाणी भरलेयावर अवघीच मारितील. मुरारजी नाईक व सेवक जातीनसी माडीजवल भिडलों

आहों. राउतास सांगोन पाठविले त्यास त्ये ते बोलतात की तलवटी उतरले-यावर आम्ही येलगार करून. प्रस्तुत आमच्यान येलगार होत नाही. भरतीस लोक त्रितीये प्रहरीं येऊन पावतील तर उतम आहें. आम्ही दोवेजण तो स्वामीचे चरणाचा भरवासा धरून येथे बैसलो आहो. लोकास भक्षावयाची बेगमी केली पाहिजें. कलले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना. दारूगोली पाठविली पाहिजे हे विज्ञापना.

¶*Honaji Balkavade reports to Chimaji Appa his engagement with the enemy near Bandra. Honaji Balkavade and his men find themselves in a tight corner owing to the incessant gunfire from the ships.*

---

*No. 144*] [*8-3-1739*

**श्री.**

**श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी**

विनंती सेवक तुबाजी अनंत सां नमस्कार विनंती येथील क्षेम ताा छ ८ जिल्हेज मो धारावी स्वामीचे कृपाकटाक्षे सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विषश. स्वामीनी पेसजी रोजमरा सिलेदाराचे दोन व महिनेकराचा निममहा पाठविला. सिलेदाराचा छ ११ रोजापासून व छ १९ रोजा अड्डीज महिनेकराचा देणे लागतो याकारितां कृष्णाजीपंत सेवेसी पाठविले आहेत. रोजमरीयाची बेगमी सिलेदाराची व महिनेकराची करून पाठविली पाहिजे व सिमगियाचे खर्चास लोक मागतील. कृपा करून हेहि बेगमी केली पाहिजे. धारावीचे काम स्वामीचे पुन्य विले[१] लागले. पुढे काय आज्ञा ते लिहिली पाहिजे. बहुत काय लिहिणे सेवेसी स्रुत होये हे विज्ञाप्ति. या महिन्याची अर्जबाबची बेगमी केली पाहिजे हे विज्ञाप्ति.

¶*Tubaji Anant from Dharavi asks for funds to pay his men. " By your grace," he adds, " Dharavi has capitulated."*

---

*No. 145*] [*10-3-1739*

छ १० जिल्हेज

**श्री**

**श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी**

विनंती. सेवक तुबाजी आनंत सां नमस्कार विनंती. सेवेसी प्रार्थना येसीजे. ताा छ १० जिल्हेज मो भाईदर स्वामीचे कृपाकटाक्षे सेवकाचे वर्तमान येथा-

---

१ निकालात निघाले. अर्थात् धारावी फते झाली.

स्तित असे विशष. धारावी हास्तगत जाहालियावरी लस्करचे लोकास बुलगियात जावयास निरोप दिला. सेभर स्वारानिसी राहिलो होतो. तो स्वामीचे आज्ञापत्र आले की मुरध्याचे रानी खाडीकिनारा जागा पाहून तोफा लागू करून गलबते वसईच्या बं(द)रात आहेत ती फोडून टाकणे म्हणौन आज्ञा आलिया उपरी रो खंडोजी माणकर व रो नारोजी कडू व रो खंडोपत व रो सुभानजी सेलार ऐसे जाऊन धारावीचे पूर्वचा खाडीकिनारा पाहिला. त्यासी आमच्या मोर्च्याचे पूर्वस खाडीचे काठी गोलीचा टपा, कोरडी जागा आहे, तेथे तोफ लागू जाहालियाने शाहरावरी मार पोहचत नाही व गलबतेहि जवळ नाहीत. केवळ खांडीचे कांठी तोफ ठेवावी तर तेथे पाणी येते व चिखोल आहे. मुरध्याच्या रानात खाडीचे कांठी तोफा लावावयाची आज्ञा होती म्हणौन आवघे कूच करून भाईदऱ्यावरी आलो. काली आवघे जाऊन भाईदऱ्याची खाडी व मुरध्याची खाडीचा किनारा शोधून पाहिला. कोठे जागा कोरडी तोफा ठेवावयापुरती नाही. चिखोल बहुत. जहुराचे (?) पाणी बहुत येते. बराबरी भाइदऱ्याचा पाटीलहि नेला होता. तोफा ठेऊन मोर्चे लावावयास जागा नाही व मुरध्याचे माडीजवळ पाचसातसे स्वार राहावयासी जागा तलास आहे व येक विहीर पाणियाची आहे. जेथे राहावयासी व तोफा लावावयास आज्ञा होईल त्या प्रा वर्तणूक करू. गनीमाचे आरमार व पाल दोन घोडबंदरचे रोख आले. काली साई(का)ल पावेतो तयार होऊन खाडी काठी बैसलो होतो. तो कोणिकड जातील न कल. बहुधा लाकुडे न्यावयास आले आहेत. सेवसी विदित होये हे विज्ञाप्ति.

¶*Tubaji Anant, being ordered to destroy enemy ships lying in the Bassein harbour, reports that after a good deal of reconnoitering he has landed upon a place at Murdha wherefrom he can effectively open fire upon the Portuguese vessels. He is awaiting further orders.*

---

*No. 146*] [*10-3-1739*

पो छ १० जिल्हेज

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवसी

आज्ञाधारक नारोजी कडू दंडवत कृतानेक विज्ञाप्ति विनंती. येथील क्षेम ताा छ १० जिल्हेज मोकाम भाईधर स्वामीचे कृपेकरून वर्तमान येथास्थित आसे. धारावी फते जाहलिया उपर लोक तमाम आवघे घोडबंदरावरी राहावयासी गेले.

आम्ही जरारे राहिलो होतो तो स्वामीकडून आज्ञापत्र आले तेथे आज्ञा केली जे वसईचे बंदरात गलबते आहेत त्यास तोफा लागू करून गलबते फोडून टाकणे म्हणोन आज्ञा केली तरी धारावीचे पूर्वेस रा। तुबाजीपंत व आंगरेकडील लोक यानी तोफ पहिलेच गलबतावर माडली (मारली?) होती परंतु गोला काही जाऊन पोहचत नाही याजनिमित्य भाईधरावर आलो. तमाम आवघे सरदार व आम्ही जाऊन भाईंधरचे रान खाडी किनारा आवघा नी(ट) पहिला, परंतु पाणी न येता कोरडी जागा काही कोठे नाही. तैसेच मुढधेचे माडीसमीप जाऊन पहिले तेथें काही पाणी येत नाही परतु जागा लाब फार. गलबतावर गोला काही जाऊन पोहचणार नाही. मुढधेसमीप जर लस्करदेखील राहावे तरी पाणी तो काही नाही. येक विहीर आहे त्यांत पाणी कमरेबरोबर आहे, यैसे वर्तमान आहे. याज-उपर स्वामी जे आज्ञा करितील त्या प्रमाण वर्तणूक करू. राजश्री तुबाजीपंत याचा मोर्चा होता त्याजपासून गोलीचे टपेवर कोरडी जागा आहे कदाचित तेथ तोफा जरी लागू केल्या तरी गलबते तमाम सरोन जुवेनजीक[१] गेली आहेत. गोला काही जाऊन पोहचणार नाही. लस्कर अगदी घोडबंदरावरी जाऊन राहिले आहे. आम्ही सडे भाईंधरी राहिलो आसो. आगदी लस्करच भाईधरावर राहावावे तरी गवत अगदी नाही, याजकरिता तेथ राहिविले आहेत. स्वामीची आज्ञा येईल तैसी वर्तणूक करून. सेवेसी विदित जाहाल पाहिजे हे विज्ञाप्ति.

¶*Naroji Kadu reports to Chimaji that Dharavi has been captured and the main body of the army has advanced upon Ghodbunder. The addressee is further informed that the enemy's ships lying in the harbour of Bassein could not be reached by their guns.*

---

*No. 147*] [*16-3-1739*

**श्री.**

छ १० मोहरम

**श्रीमंत सकलतीर्थस्वरूप राजश्री चिमाजी आपा**
**स्वामीचे शेवेसी**

आपत्यसामान दादाजीरात्र सास्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान ता। छ १६ माहे जिल्हेज मुकाम रायेचूर येथे सुखरूप असों. इकडील वर्तमान तर रायेचुरास मोरचे चालविले ते खंदकावर जाऊन पावले आहेत. बारदेसामधें

---

१ पाणजुं. जुवें म्ह. बेट.

सांवत सिरोन बारदेस घेतला. बारदेसामधील स्थले मातबरसीं नाहीत. फोडती दाहा अकरा आहेत त्या घेतल्या. कांईसू दर्याचा मोहर पश्चिमेस लाहान जागा होतो तोहि सांवतांनी घेतला, हें वर्तमान पूर्वपत्री सेवेस लिहिले आहें त्यावरून विदित जाहले असेल. आलीकडील वर्तमान तर फिरंगियांचा दोरा अगोदर राजश्री माहादाजी विठल यांचे विदमाने आम्हाकडे लागला होता. त्यास गोवेंतील सावकार राजश्री वेंकटी कामत व उपे कामत यैसे अगोदर येऊन भेटून मातबर फिरंगी भेटीस आणतों, यैसा करार करून गेले होते. त्यास अंतन काडनेर व दरराजे दव जुजेपद्र म्हावस दोतर यैसे दोन फिरंगी घेऊन, लोलोसी म्हणऊन नदीतीरी आहे, तेथ फिरंगी आले. मग येथून राजश्री धोंडबा व राजश्री गोविंदपंत व राजश्री माहादाजी विठल पाठऊन त्यांस लस्करामधें आणलें. त्याणीं येऊन उदंड रदबदल केली. दाहा दिवसपरयेंत लस्करात होते. रदबदलीमुळे तह जाहाला जे साष्ट बारदेसामधे दर सदे ४० आम्हास व साठ फिरंगियास काही ठाणी आमची कांही त्यांची. हिंदु धर्म चालवावा. भोसलें याचें खरजुवें पनाले त्यास द्यावें. वसई, धारावी, उरण, स्वामीस द्यावें. दवण दोनी ठाणी द्यावीं. चेवल, रवदंडा, फिरंगियास असावा. पनास हजार तनखा फिरंगियास रेवदडेस द्यावा, यैसा सिधांत करून गोंवेस विजुरईस त्याणीं लिहून पाठविले. त्यावर विजुरईने आपले आंतस्तिक फिरंगी मिळऊन इत्यार्थ केला की, चेवल, रेवदंडा, वसई देऊ; दवण येक आपणांस असावी, यैसें सांगितलेवरून आम्ही ती गोस्ट अमान्ये करून, येथ फिरंगी आले त्यास निरोप दिला की, दवण द्याल तरीच तुमचा आमचा तह. ती गोस्ट नाही तर तुमचा आमचा तहच नाही. यैसे बोलोन निरोप दिला. परंतु केवल उडवावे तर तीहि गोस्ट कामाची नहवे, याकरितां, तुम्ही गोव्यास जाऊन विजुरईसी बोलोन मागती उतर आम्हास पाठवा, यैसें सांगोन निरोप दिला आहे. त्याणीं च्यार रोजाचा वाइदा केला आहें. च्यार रोजात होई न होई यैसें त्यांचे उतर येईल त्यासारिखा मनसबा पुढील केला जाईल. गोमंतकीच्याहि मनसबेवर आहू परंतु गोंवेतील वितविशाई कुली मुरगावास गेला. उरतां घरें मात्र राहिली आहेत. चौघा सरदारांचे मते जसें होईल तसें पाहू. येविसीचा सकल अर्थ तपसीलवार राजश्री वेंकटरायानी लिहिला आहे त्यावरून विदित होईल. रायेचुरास खंदकावर मोरचे गेले आहेत तोहि धंदा उरकला जाईल. मनसबेविसी अंतर सहसा न होई. जिवादारभ्य श्रम करावयास चुकणार नाही, येविसीं विस्तारें वडिलास ल्याहावें तरी हा धंदा आपले घरचा यैसे असतां पाल्हाल लिहिला नाही. आपण येशस्वी आहेत. फिरंगी म्हणजे पापात्मे. त्यांचा नाश होणें हे अपूर्व नाही.

हे येश श्रीनें आपल्याच विभागास दिल्हे. इतरांचा येत्न फिरंग्यावर चालता यैसे नाही. वसई आजीपावेतो आलीच असेल. इकडेहि आपले आसीरवादें शाह जबरदस्त बसला आहे. पुढें खटपट होणे ते होईल. तो विस्तार रा वेंकटराऊ हे लिहितां विदित होईल. घाटाखालीं येऊन दोनी अडीच महिने जाहाले. हा ऊष्ण देश, गर्मी बहुत आणि माहागाई जाहाली आहे. सरदारहि मेहनती करावयास चुकत नाहीत. सर्वहि अर्थ भेटीअंतीं वडिलांस विदित होईल. बहुत काये लिहू? कृपा पूर्ण करावी. वडील आहां. हे विनंती.

¶*This important letter of Dadajirao to Chimaji refers to the negotiations between the Portuguese and the Marathas in 1739. Vyankatrao Ghorpade succeeded in occupying almost the whole territory near Goa. The more important terms of the treaty that was signed later on appear here for the first time. The Portuguese have there agreed to evacuate Cheul, Revdanda and Bassein, and to pay two-fifths of the revenue to the Marathas as annual tribute.*

---

*No. 148*] [*18-3-1739*

छ १८ जिल्हेज

श्री

पुा श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती यैसीजे. मौजे भायेधरामधे येक किरिस्तव नवद वरसाचा पुरुश आहे त्याने यैसे सांगितले की वसईचा पाया पंधरा हात रुंद आहे. त्यापैकी बाहिर साडसात हात जोतदाखल टाकून साडेसात हात शाहारपन्हा रुंद आहे म्हणौन कितेक तेर्थील तपसील सांगत होता. त्यासी स्वामीचे सुरंग चालिले आहे. दिवाल अलमीकडे[१] चबुतरा आहे त्यासी लागू होतील. दिवाल पलेकडे तैसेच राहील या करिता सुचली गोस्ट सेवेसी लिा आहे. मोर्च्यापासून दिवाल मोजावी व सुरंगहि मोजिविला पाहिजे. सुचली गोस्ट सेवेसी लिहिली असे हे विज्ञाप्ति.

¶*Some secret information about the construction of the fortress of Bassein is sent on to Chimaji Appa.*

---

१ येथें मा जारत चुकून पडलासा वाटतो. दिवाला अलीकडे असे होईल.

*No. 149*] [*18-3-1739*

छ १८ जिल्हेज

**श्री**

**पुा श्रीमंत राजेश्री आपास्वामीचे सेवसी**

विनंती येसीजे. धारावी फते जाहालिया बारा रोज जाहाले च्यार हजार पाईचे माणोस व च्यार हाजार स्वार रिकाम बैसलें आहेत येवसी पूर्वी विनंती सेवसी लिहिली होती. वानरेहि काम सहजस्थितीन विनानतीजा विले लागत नाही. आजी उद्या तरतेबुडत पाहातात यैसे दिसोन येते. सेवेसी काय ते आज्ञा अवधियासी केली पाहिजे. बहुत काय लिा हे[१] विज्ञाप्ति.

¶*Tubaji Anant requests Chimaji to assign him some new work as his men remain unemployed since the capture of Dharavi.*

---

*No. 150*] [*19-3-1739*

छ १८ जिल्हेज जाबसूद

**श्री**

**श्रीमंत राजेश्री आपा स्वामींचे सेवसी**

विनंती सेवक तुबाजी आनंत सां नमस्कार विनंती. येथील क्षम ताा छ १९ जिल्हेज मो कासी स्वामींचे कृपाकरून सेवकाचे वृत येथास्तित असे विषेश. कृपा करून पत्र पाठविले ते छ १७ रोजी पावले. तेथे लिहिल की राजश्री वेंकटराऊ घोरपडे याही सास्टी बारदेस प्रांत खरजुवे वगैरे आठनऊ ठाणी घेतली फिरंगियास बरा नतीजा दिला म्हणौन संतोषाचे वर्तमान लिहिले त्यावरून बहुतसा आल्हाद जाहाला. सर्व स्वामीच्या पुण्याचा महिमा अहे व रा वेंकटराऊहि नावाचे मनुश्ये. त्या प्रांते त्याचाहि लौकीक जाहाला. सर्व स्वामीच्या पुन्याचे फल अहे. यानंतर कृस्णाजी नारायेण स्वामीकडे रोजमरियाबदल पाठविला तो यैवज घेऊन आद्यापि आला नाही रा नारायण जोसी याकड येक हजार रुपये स्वामींनी देविले तेणेकरून सिमगा व येक रोजमरा चवरोजा जाहाला. आजी तीन रोज लस्करास पोटास नाही व करोल वगैरे महिनेकरासहि[२] नाही. त्यानी

---

१ पत्र तुबाजी अनंताचें. २ करोलांना महिन्याच्या महिन्यास पगार द्यावा लागे.

गवगवा केला आहे. येथे कोठे कर्जवाम मिलत नाही. सेवसी बालाजी माणकेसर दिा जगदीश करोल पाठविला आहे. रोजमरियाची बेगमी करून पाठविली पाहिजे. बहुत काय लिा. सेवेसी स्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Tubaji Anant congratulates Chimaji upon the successes Maratha arms won in the province of Goa. He requests the addressee to send without delay funds to pay off his soldiers.*

---

*No. 151*] [*23-3-1739* ?

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसी

आज्ञाधारक विसाजी नारायण चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंति ताा फाल्गुण वद्य दशमीपर्यंत स्वामीचें कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित आसे विशेष. गोमांतकाकडील वर्तमान फिरंगियाचें आरमार सर्व सामाईन घेऊन बाहीर निघाले होतें. त्यास साहा दिवसपर्यंत नाहाट[1] समुद्रांत होतें तेव्हा चहुकडे बोली होती की वसईस गेले. सातवे दिवसी वादल उतराण बहुत यास्तव आगवताच्या नस्तावर आहे. आंगारकाकडील वर्तमान स्वारीस निघोन गेला होता, त्यास माहाबलेस्वारची यात्रा लुटोन होनावरास जाऊन होनावर मारिले. किला घेतला. ठाणे बसिवले यसे वर्तमान आहे. वितविशये बहुत सांपडला तो पत्री लिहितां पुर्वत नाही. आरमार स्वारी करून मावारे वेंगुर्लेच्या नस्थावर आहे. उतरायण[2] बहुत यास्तव राहिला आहे. वारा शमल्यानंतर पुढे जाईल. आपले गलबत फिरंगियानी धरिले त्याचे वर्तमान पहिले पत्री लिहिले आहे. तेथे वकिलीस फिरंगी आहे त्याचा कागद व आपला कागद विजरिलीस[3] आल्यानंतर याची सुटका होईल. वसईकडील गंगाजी नाईक राजश्री शंकराजीपंत याणी पाठविले होते ते व जासूद जोड्या गोमांतकांतून वाडीस आल्या. गंगाजी नाा वसईस गेले वसईहून आपल्याकडे येतील ते सविस्तर वर्तमान निवेदन करितील त्याजवरून विदित होईल. बजिनस विजरईचे पत्र पाठविले आहे तेहि पोचते होईल. आधिकोत्तर जे वर्तमान आढलेल ते मागाहून सेवेसी लिहून पाठवितों हे विज्ञापना.

¶*Visaji Narayan (Jakhi) to Nanasaheb Peshwa, writing news about the Portuguese and the Angria's naval activities.*

---

१ वादळ ( ? ) २ वादळ ? ३ पोर्चुगीज गव्हर्नर.

*No. 152]* *[25-3-1739*

पौा छ २७ जिल्हेज.

**श्री.**

आसीर्वाद उपर. वसईचा मेढा कोटापासून आठसे हात आहे. रोज उठोन आतील गोळ्याने एक दोन माणूस जाया होत आहे. तेथेच मेढा काईमही राखल्याने केवल वसई जेर होते येसे नाहीं. याकरितां त्या मेढीयाच्या मागें आठसे हात मर्तिने[1] सिरवेलची हवेली केवल.कोटासमान आहे. ते हवेलीभोवता हली मेढा घालावयास काम लाविले आहे. तो मेढा मजबूद जालियावर पुढील मेढा मोडून टाकावा येसा विचार ध्यानात आणून काम लविले आहे. ते हवेली-वरहि वसईतील गोळा तो पडतच आहे परंतु आठसे हात समीपच्या मार होत होता तो सोळाशा हातावर पडलासा जाला. गनीमानें बाहेर येईन म्हटले तर सोळासे हात लांब हवेलीपावेतो यावयास पडतील. याकरिता हवेली मजबूद करा-वयास प्रारंभ करविला असे. ते हवेली म्हणजे पुढे बुरूज चहूकडे मुस्तेद केले तर बऱ्या दुसरी वसई समान जागा. जन्मांतरी त्यास उखलणार नाहीं ! छ २५ जिल्हेज हे आसीर्वाद. ते हवेलीस पुस्ती वज्रगडची आहेच हे आसीर्वाद. आरना-ल्यास आमच्या लोकानीं तीन गलबतें लाहानसी धरली आहेत परंतु त्यात इंगरेजाची दोन आहेत ती सोडावी लागतील. हे आसिर्वाद. दुर्जनसिंग आपले लग्न करणार यास्तव दाहा राऊतानसीं रामनगरास जावयास निरोप दिल्हा हे आ[2]सिर्वाद.

¶*Letter by Chimaji: points out that the residence of one Martin Silvera was conveniently situated to be transformed into a redoubt. It is therefore being strengthened with men, ammunition and a palisade round it.*

---

*No. 153]* *[31-3-1739*

**श्रीगणपतिजयति**

**श्रीमंत राजश्री पंत आपा स्वामीचे सेवेसी**

विनंति सेवक गोविंदे[3] हरि कृतानेक साा नमस्कार विनंति. येथील वर्तमान ताा चैत्र शुद्ध त्रितिया मंदवारपावेतो स्वामीचे कृपावलोकनें करून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. कृपा करून लिंगो राम याजबाा आज्ञापत्र सादर केलें तें

---

१ म र्टिन सिल्व्हेरा.

२ सबंध पत्र चिमाजीच्या हातचें पत्र बहुधा नानासाहेबास.

३ पटवर्धन.

उतम समई प्रविष्ट होऊन समाधान जाहलें. श्रीमंत राजश्री राऊ स्वामीकड फौज रवाना करावयाची आज्ञा केली ; आज्ञेप्रमाणें फौज रवाना करितों. आमचें सरीरीं सावकाश नाहीं. घाट चढोन जाऊं तोंपर्यंत श्रीकृपेनें उतार पडला तरी आम्हींच जाऊ नाही तर फौज रवाना करूं. स्वामीनीं फौजेची बेगमी काये केली ? रोजमरा पाठविला तो प्रतिपदेचा वांटिला. पुढें लस्करास जावयास किती दिवस लागतील ? घोडियांत जीव नाहीं. फार तर चार कोस पांच कोस चालतां संकट. या प्रकारें मजला किती होतील ? स्वामीनी नासिकांकडे च्यार हजार रुाचा ऐवज नेमून दिल्हा. बरें, आज्ञेप्रमाणें त्या मार्गे जातेसमई घेतील, परंतु फौजेचा निभाव कैसा होतों ? लोकानी श्रम केले आहेत. जातानाच श्रमी करितील. संकटें करून सिध होईल त्याची तटें घरास जातील. त्याची खर्चाची बेगमी वेगलीच करावी लागेल. आम्हापासी पांच हजार रुपयाचा ऐवज आहे. केवल हात झाडून वर्तणूक केली नाही. परंतु येवढ्यानें काये होणार ? पुण्यांत कर्ज पाहावें तरी येते समई घेतले आहे ते मार्ग पाहात असतील. कनिष्टपक्ष पंधरा हजार रुा वीस पंचवीस दिवसांची बेगमी पाहिजे ऐशास हे पांचहजार आम्हाजवलील व स्वामानी नासिकाकडे देविले च्यार आणखी साहजार रुा पुण्यांत राजश्री अंताजीपंताकडून पत्रदर्शनी प्रविष्ट होत असे देवावे म्हणजें बेगमी करूं. मार्गी वैरण देखील विकत घ्यावी ! स्वामीनी फौज रवाना करावयाची आज्ञा केली परंतु या प्रकारचे संकट आहे ! स्वामीनी सूक्ष्मद्रि(ष्टी) * * *

¶*Govind Hari writes to Chimaji that he will send his contingent to join Bajirao's army and asks for funds to be distributed among his men.*

---

*No. 154*] [*2-4-1739*

**श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी.**

विनंती. सेवक तुबाजी आनंत सां नमस्कार विनंती. येथील क्षम ता छ ४ मोहरम प्रा ठाणे सास्टी स्वामीचे कृपाकटाक्षे सेवकाचे वर्तमान येथास्तित असे विशेष. वांनरे उडालियावरी मौजे गुणे (पे ?) गांव येथे मुकाम होता. तेथून कूच छ मारी करून ठाणे मजकुरास प्रहर दिवसी आलो, तो राघो दामोदर बांब व गोविंदभट पटवर्धन वस्ती कळ्याणी राहात असतात ते माहादाजी राम मंबईत राहातो त्याचेथे लग्नास गेले होते ते आताच आले. त्यानी वर्तमान सांगितले की प्रतिपदेचे दिवसी गोव्यांहून मचवा आला. त्याने गोव्याचे वर्तमान सांगितले की

राजश्री वेंकटराऊ घोरपडे यानी गोवे फते केले. तोच मचवा वसई * * * वयास गेला म्हणौन * * तले [१]खुषवक्तीचे वर्तमान सेवसी कलावे म्हणौन लिहिले आसे. बहुत काय लिहिणे सेवसी विदित होयें हे विज्ञाप्ति.

¶*The news of the victory of Vyankatrao Ghorpade at Goa is sent on to Chimaji by Tubaji Anant.*

---

*No. 155*] [*2-4-1739*

**श्रीगणपतिर्जयति**

**श्रीमंत राजश्री पंत आपा स्वामीचे सेवेसी**

विनंती सेवक गोविंद हरि कृतानेक साा नमस्कार विनंती. येथील वर्तमान ताा चैत्रशुद्ध शष्टीपावेतो स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीनीं कृपाळु होऊन पत्र पाठविलें तेथें आज्ञा जे फौज कल्याणास पाठऊन तुम्ही सडे घोडबंदराजवळी उतरोन दर्शनास येणें म्हणौन आज्ञा. ऐशास आगोधर लिंगोराम याजबाा आज्ञापत्र सादर जाले तेथें लिहिलें की फौजसुधां घाट चढोन फौज राजश्री रायांकडें रवाना करणें. त्याप्राा तेच दिवसीं कूच करून साष्टीस आलों. तेथून तलोद्यानजीक मुकाम केला. कालीं सोमवारी चिखली नजीक प्रबल येथें राहिलों. आजी खालापुरानजीक राहूं. पुढें मजल दरमजल जातों. सेवकाचे चितीं स्वामीचे चरण पाहावे हे वासना फार होती. परंतु शरीरी व्यथा अतिशयें याकरितां दर्शनाचा लाभ घडोन आला नाहीं. परंतु चित स्वामीच्या चरणारविंदी आहे. सेवेसी श्रुत होये कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.

¶*Govind Hari writes to Chimaji Appa that ill-health prevented him from visiting the addressee at Ghodbunder as desired.*

---

*No. 156*] [ पौा *6-4-1739*

पौ छ ८ मोहरम

**श्री**

**पुरवणी श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी**

विनंति. [२]वेलंदेज विजयेदुर्गास आला होता. त्याणी मार बहुतच विजयेदुर्गावर केला होता. त्यास राजश्री संभाजी आगरे याणी खाडीकाटास तोफा-

---

१ आनंदाचें. २ डच.

दाहाबारा लागू करून त्याचे आरमारावर मार केला. दोन तारवें त्याचीं फोडिलीं. याकरितां वलंदेज निघोन गेला यैसें वर्तमान इंग्रेजाची पतमारी आली तिणें वर्तमान सांगितलें. कळावें म्हणून लिहिलें आहे. विशेष काय लिहिणें. कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

¶*The news of a successful attack led by Sambhaji Angria against the Dutch at Vijayadurga and their subsequent retreat is communicated to Chimaji Appa.*

---

*No. 157*] [*8-4-1739*

पो छ १५ मोहरम

## श्रीगणपतिर्जयति

### श्रीमंत राजश्री पंत आपा स्वामीचे शेवसी

विनंती. सेवक गोविंद हरि कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. सेवकाचे वर्तमान ताा चैत्र सुध येकादसी रविवार मुाा पुणें स्वामीचे कृपादृष्टीविलोकने यथास्थित असे विशेष. स्वामीची आज्ञा फौज रवाना करावयास जाहली त्यावरून मजल दरमजल साष्टीहून बुधवारी बोरघाट चढोन घाटमाथा मुकाम केला. गुरुवारी कसबे नाणे येथें मुकाम करून शुक्रवारीं लोकांची रवानगी केली. राजश्री देवाजी मल्हार व कृष्णाजी माहादेव व नरसोजी घाटगे वगैरे तमाम लोक देखील हुजरात रवाना केले. त्याची नावनिशी तपसिले[१] आलाहिदा पाठविली आहे. सिलेदार स्वार ५९० पांचसे नवद, घोडी लहानथोर १२६० बारासें साठ व पागाघोडी १४० येकसे चालीस, पैकीं स्वार ७५ येकूण सिलेदार पागादेखील चवदाशे घोडीं याची रवानगी केली. खर्चाच्या यैवजाचा मजकूर स्वामीस विनंतीपत्र पाठविले कीं पांच हजार रुपये आपणापासीं आहेत त्याशिवायेच्या हजार रुपये आपणापासी होते ते देखील रवानगीस[२] खर्च जाहाले त्याची याद शेवेसी पाठविली आहे. नव हजार रुपये भरती करून दिल्ही त्याशिवाय लोकांच्या कर्जाचे हवाले रुपये ६००० सहा हजारांचे घेतले आहेत पंधरा दिवसानी त्याच्या घरास प्रविष्ट करावे यैसा करार केला आहे. लष्कराहून पुण्यास कर्जवाम मिळवावयाबद्दल माणसे पत्रे पाठविलीं; परंतु अनकूल न जाहाले मग हवाले घेतले कीं पंधरा दिवसा रुपये पाठऊ. त्यास स्वामीनी या यैवजाची बेगमी करून अनकूल पडेल ते समई द्यावी.

---

१ तपसिले—तपशीलवार.

२ रवानगी—शिलेदारांना मिळणाऱ्या पगाराच्या हप्त्यांपैकीं एका हप्त्याचें नांव.

लोकानी श्रमसायास केले होते त्यासी समाधानाच्या च्यार गोष्टी सत्यमिथ्य भाषण करून रवाना केले. नासिकावर स्वामीनी यैवज देविला तो त्यास आला तर उत्तम. मार्गी पंधरा दिवसाची बेगमी करून दिली आहे तो यैवज आला म्हणजे त्यांची स्थीत[1] राहील. सेवकाच्या शरीरास अद्यापि सावकाश नाहीं यामुळे सेवाचोर जाहलों. स्वामीच्या पुण्येकरून आरोग्य जाहलियावरी लेहून पाठवितो. येसमई चाकरीस अंतर पडले क्षमा करणार स्वामी समर्थ आहेत. कृपा केली पाहिजे हे विज्ञापना. हती एक रवाना केला व नौबत रवाना केली. येक पुण्यास आणिला. ढाल बाजार डेरे थोडेबहुत लष्कराबरोबर रवाना केले, हे विनती.

*¶Govind Hari's letter informing Chimaji Appa that his contingent of 1,400 men has been despatched to join Bajirao's forces. The writer himself was prevented by ill-health from proceeding.*

---

*No. 158]* *[10-4-1739*

## श्रीगणपतिजेयति

### श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक गोविंद हरि कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुषल ता। चैत्र सुध १२ भोमवार मुकाम पुणे सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीची पत्रें छ ३ मोहरमचे व छ ७ मोहरमचे आमच्या जासुदा समागमें आलीं तीं प्रविष्ट होऊन संतोश जाहला. पत्रीं आज्ञा कीं फौज शंकराजी निकम यांजकडे रवाना करणें. त्यास रवानगीचा यैवज नासिकावर देविला होता त्याकरितां फौज नासिकाच्या मार्गें रवाना केली तें तपसीलवार पत्र गणतीपूर्वी सेवेसी पाठविले आहे त्यांवरून श्रुत होईल. नासिकाकडील यैवज घेऊन ते श्रीमंत राजश्री राव स्वामीकडे जातील जर त्यास शंकराजी निकम याजकडेच पाठवावें यैसे असेल तर जासूद फौजेकडे परभारें तिकडूनच स्वामीनी पाठवावें. त्याची फौजेची गाठ पडलिया आज्ञेप्रमाणे वर्तणूक करितील. त्यांस रवाना करून आम्ही घरास आलों त्यास दोन तीन दिवस जाहले. आम्हीं येथून राजश्री रायांकडें विनंतीपत्रें

---

१ स्थित—समाधान, बरी स्थिति.

जासूद मुजरद शहरच्या मार्गे पाठविले आहेत. स्वामीनी आज्ञा लिहिली होतीं कीं तुमचे सरीरी सावकाश वाटले तरी जाणें. त्यास शरीरी आरोग्य नाहीं म्हणोन घरास आलों. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Govind Hari to Chimaji Appa, informing him that as advised by him the army will join Bajirao at Nasik. The writer regrets his inability to join on account of illness.*

---

*No. 159*] [*10-4-1739?*

## श्रीशंकर

### श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे शेवेसी

सेवक जिवाजी हरी सास्टांग नमस्कार विनंती. ता। छ २३ मोहरमपावेतो स्वामीचे कृपेकरून वर्तमान येथास्तित असे विशेष. स्वामीनी लोक पाठविले प्रमाणे आले. परंतु याज लोकांनी निर्वाह होतो येसे नाही. मढ (?) चे कोटास पाल येक व मचवे दोन येऊन बैसले आहेत. लाकू (ड) फाटे नेऊन भरितात. पुढे गाव वसाहात आहेत. येथवर स्वारी करावयाचे त्याचे मनामध्ये आहे. वरकड घोडबंदरकर देसाई वानरेयास गेले हो(ते), तेथून परतोन घोडबंदरास गेले. तेव्हा येका ब्राम्हणाचे घोडे घेऊन गेले आहेत व त्याचे बराबर स्वार आले होते त्याणी कुणबी * * * * * नेले व कोनी गरीबे वसईहून आली आहेत त्याचेसी कटकट करितात. माणसे पाठवितो तो चुकाऊन जातात. येविषयी बालाजी गणेश यास पत्र की तुम्ही प्रांत सास्टीस स्वार व लोक पाठवीत न जाणे, कोठे फिरंगियाची स्वारी आली तरी जाणे म्हणून पत्र व धोंडोपंत मौजे इलेपाड (र?) ले इकडे आहेत. ते कोन्ही गोरगरीब स्वामीच्या कौलावरून येते त्यास लुटितात. येविषयी त्यासहि जे आज्ञा कर्तव्य ते केली पाहिजे. मौजे पावडी ता। मालाड येथील कुणबियाची गुरे लोकानीं नेली आहेत. यास्तव रयत गुरे पहावयास ठाणेयास आली आहेत. कोठे गुरे आढलली तरी देविली पाहिजेत व मौजे गुणगाव ता। मरूल ये गावचा हिसेब ताडाचा करून गुणगावचे भंडारियाजवल पाठविला आहे, तो मनास आणून बाकी रुपये राहिले त्याची काय आज्ञा ते केली पाहिजे. शेवेसी श्रुत होय हे विनंति.

¶*Jiwaji Hari informs Chimaji Appa of the reinforcement to the fort of Madha. The Desai of Ghodbandar—he writes—has come back from Bandra.*

1514

*No. 160*] [पो *17-4-1739*

छ १९ मोहरम

श्री

राजश्री चिमणाजीपंत गोसांवियासी

॥ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नेहांकित जयराम सावंत भोसले व रामचंद्र सावंत भोसले सरदेसाई प्रांत कुडाल व महालानिहाये दंडवत विनंती. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन केले पाहिजे विशेष. गोसावी यांजकडून रा। भिकाजी केशव आले. त्याहीं सविस्तर वृतांत सांगितला. त्यावरून सिधांत केलाजे. घाटमाथां लस्कर येता अगोधर लेहून पाठवावे. येकावसदें दोन्ही कामें करावी. इतुकियामध्यें राजश्री करवीरवासी जंजिरें सिंधुदुर्गी आले. त्यांच्या भेटीस जाणे लागले. याही त्व * करून दिगीचे घाटाने साद * * प्रांत उतरले तेव्हा * * * * * * * * * * काडून जागा जागा * * * करावी तैसी करून भाडत * * श्य मात्र सामानसी राहिल; तेव्हा कितक भेद अथवा राजकारणे करावी ते केली. जमावानसी बावण (?) डिचोलीस आलों. दीड महिनापरयेत फौजबंदिकरून यत्न मात्र केले. साष्टीहून फौज आणवावी तर बलकटीचा प्रसंगहि नाही. मग काही भेद काही बलकटी आनक विचारें येका तोंड होडिया दिडा गावावरून उचलून न्हेऊन लोक आंत उतरले. दुसरे कडून समोरतोंडी जुज घेऊन तट पाडून फौज आत गेली. भल लोक पडिले. काही जखमी जाहाले. घोडी ठार जाहाली. तेवढा मार सोसून फिरंगी तीसचालीस मारिले. बारदेस व ठाणीं काबीज केली. फौजदार देसामध्यें आहे. फिरंगी म्हणजे आमचा सीमसेजारी बहुता दिवसाचां श्नेही परंतु आपले वचनावर नजर देऊन असाध्यकार्य श्रीकृपेने विलप्रमा * (?) जाहाले. फिरंगीयांस हिकड षेह जबरदस्त होताच तहाचे बोलीस राजश्री व्यंकट (रावा) कड मातबर मनुष्य फिरंगी साष्टीस गेले तो सर्व वृतांत राजश्री व्यंकटराऊ याणी लिहिलाच असेल. बारदेसच्या प्रसंगामुले आमची त्याची मुलूक सरा * त्यास जकाती व खाजने बंद तोडून पाणी भरिले यामुले पनाससाठ हजार रुपयांस धका बैसला. लूट लोकास सापडल, यैसे होतें तेहि नाहीं. प्रस्तुत सात आठ हजार हशाम व अडीचसे तीनसे स्वार दोन अडीच महिने पदरीचा पैका देऊन येवढे काम करणे लागले. तपसिलें लिहिले यैसे आपणास दिसोन येईल तर लोकांकरितां लिहिलें आहे. आपल्या श्नेहाची जोडी केली तेव्हां आपणाकडून विशेष कार्य होतील आणि आम्हीहि करून घेऊ यैसे असतां ये गोष्टीचे अगाध काय आहे ?

करवीरवासीयाची पत्रें आली होती. त्यास सुचल तैस * * हुन देऊन * * आपला आम * * * * पुणे व पुणे ते वा * * * विवेक चितांत आणून सूचनार्थ आपणास कलावा यास्तव लिहिला आहे. यावर गोसावी विवेकी आहेत. बहुत काय लिंहिणे? लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंती.

[पत्राखालीं फारशी मोर्तब]

¶*Jayram Sawant Bhonsle of Sawantwadi sends a detailed report of services rendered to the Peshwa in the successful expedition in the Goa territory.*

---

*No. 161*] *[24-4-1739?*
*[5-5-1738?*

छ २६ मोहरम

**श्रीशंकर**

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे शेवेसीं

सेवक जिवाजी हरि सा। नमस्कार विनंती. ता। छ २६ मोहरमपावेतो वर्तमान येथास्तित असे विशेष. आजी वर्तमान मालजी पाटील मौजे येकसरकर याणे सांगोन पाठविले कीं फिरगी किले धारावीस आला. भाडन होत आहे, म्हणून लि॥ आहे. येथून आम्ही खबरीस माणसे पाठविली आहेत. आजी प्रातकाला-पासून तोफा होत आहेत. आढलले वर्तमान शेवेसी लिहिले आहे. मौजे वेसावे जालायास पाठविल ते समयीं जुवास घरास आग लाविली म्हणून कोणे सागितले तरी कृष्णाजी आणजुरकर गेले होते. आग कोन्हे लाविली नाहीं. तेथे लोक आहेत ते ताडी पियोन मस्त जाले होते. त्याची व स्वामीचे लोकांची कटकट जाली ते कृष्णाजी आणजूरकर याणी वारली. शेवेसी श्रुत होय हे विनंति.

¶*Jiwaji Hari gives news from Konkan about the arrival of the Portuguese at Dharavi, etc.*

---

*No. 162*] *[4-5-1739*

नकल.

**श्री**

श्रियासह चिरंजीव राजश्री नाना यांसी चिमणाजी बलाल आसीर्वाद तु * * * * ता। छ ६ सफर प्रात:काल दोन घटिका * * ऋवार जाणून स्वकीये कुशल लिहित जाणे * * * तुम्ही पत्र छ २४ मोहरमचे पाठविले. छ ३ सफरी प्रविष्ट जाहाले. दरबारचे वरकड * * * वर्तमान लिहिलें तें कळलें. उतरे आलाहिद्या पुरवण्यांत लिहिले असेत.

त्यावरून कळले. आलीकडे वसईच्या मोर्च्यांचें वर्तमान कळत नाही तरी सविस्तर ल्याहावें म्हणून लिहिलें तें कळलें. ऐसियासी वसईस मोर्चे चालविले व धमधमे बांधले. सुरुंग लाविले. तो अर्थ वरच्यावरी * तुम्हास लिहिलेच आहे. आलीकडील वर्तमान तरी (व) सईस सुरुंग उत्तरेकडून लाविले. राजश्री * णोजी सिंदे यांचे पांच सुरंग डावे बा (जूने) येके बुरजास लागले. रा येशवतराऊ पवार व रा राणोजी भोसले यांचे सुरंग दोन सफेलीस लागले. परंतु लाहान उजवे बाजूस संताजी वाघ दिा मलारजी होळकर यांचे सुरंग दोन येक लाहान व येकथोर मल्हारबा पलीकडे विभूतराऊ संतकर दिा हशम याचा सुरंग * * * बाजू वाटून दिल्हा. सुरंग उडताच येलगार करून जागा फते करावा ऐसा करार केला सुरंगाचे वर्तमान फिरंगियास (कळलि) यावरी फिरंगी यांनीं साफिलीचे आं * * * मेढा बुरजा देखील घातला. पेटीच * * * तां वसईची इमारत दाहा दाहा हात बारा हात रुंदी इमारत पुरकार उंच गची. दुसरे वसईस बुरुज नव आहेत ते बाजयां[१] एक एक कोटच. वसईस सुरंग चालावे ऐसा पदार्थ नाही तथापि लोकांनी मेहनत म्हणावी तैसी करून सुरंग पोहोचविले. बुधले भरून सिधता केली. छ ४ सफरी बु(धवा)री दोन घटिका दिवस आलियावरी सुरं(गास) बत्या दिल्ह्या. राणबाकडील च्यार सुरंग उडाले. एक उडावयाचा होताच तो लस्करच्या लोकांनीं व हशमाच्या लोकांनीं डावे बाजूनी राणबाकडेस उतावळी करून तंब्रके[२] सोडून हलेस उठले इतकियांत राणबाचा पांचवा सुरंग उडाला. निमे बुरुज उडोन गेला. सुरंगाचे धोंडे उडाले * * * * * * चे व हशमाचे लोक दड * * * जाले येसवंतराऊ पवार * * * * यांचे सुरंग लहानहो * * उडाले काम गारेगार जाले * * * * * * बा यांचे दोन सुरंग (सुमारे दोन ओळी फाटल्या) ऐसी केली आपल्याही लोकी * * * सून हिमत व अंगे * * * युध्यें प्रात जाहलीं पर * * * सारिखे युध्ये मराठी फौजेस पडिले नाहीं. सिमा सिमाच केली याचा विस्तार लिहितां विस्तार आहे. मागाहून सविस्तर लेहून पाठऊन. मुख्य गोष्ट युध्य एक तोडी दुसरे जागा उपाय नाहीं. हा जागा फत्ते होणे देवाची दया आहे व तीर्थरूप राजश्री रायाचे (पुण्ये) होईल. याउपरी जैसे जैसे काम होत जाईल. * * * तुम्हास लिहीत जाऊं छ ६ सफर+.

¶*Chimaji Appa gives a detailed account of the determined assault on Bassein.*

१ बाजहां=स्वतः. २ घरें.

+ का. सं. प. या. ४३९ चा लेख व हा मूळचे एकच असावे.

*No. 163*] [*4-5-1739*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. फिरंगी कौलास आला; छ ६ सफरपासून सा दिवसाचा वाइदा मागितला; त्यावरून त्यास वाईदा दिल्हा आसे. वाइद्यास फिरंगी मुंबईस पोहचाऊन द्यावा आणि कोट आपले स्वाधीन करून घ्यावा यैसा सिद्धात जाला आहे. श्रीकृपेने वसई फते जालीच म्हणून सविस्तर रा तुबाजीपंताचे जासुदाबा आज्ञापत्र सादर जाले त्यावरून बहुत समाधान पावलों. स्वामी येशस्वी प्रतापवान आहेत. भगवानर्जानें मनोरथ सिधीस नेले. उत्तम जाले. कृपाळू होऊन साद्यंत वृत लिहित गेले पाहिजे. तिकडील बंदोबस्त करून वरघाटी यावयाचा विचार केला पाहिजे. विदित होय हे विनंती.

¶*Letter congratulating Chimaji Appa on his glorious victory over the Portuguese.*

---

*No. 164*] [*8-5-1739*

पौ छ १० सफर

श्री

राजश्री चिमाजीपंत आपा
गोसावियासी

ॐ श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रो पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती. येथील क्षेम जाणोन स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. फिरंगाण प्रांतीची बंदिवाने आहेत त्याचेविसी विनंती करून मुक्तता करावी हा हेत होता. त्यास येतेसमई लोकाचे गवगव्यामुळे विनंती करावयास फावले नाही. त्वरेने आज्ञा घेतली. यैसियास त्याचा विचार केवल ठेवलियाने खर्चास मात्र कारण आहेत. येक मा * चे (येकमाहेचे?) आहेत व तारापूरच्या बाइका व चिटणीकर फिरंगी सोडावे. वरकड तो किरस्ताव वगैरे आहेत ते सोडलिया प्रांतीच राहाणार. पादरी मात्र जे असतील ते येका किलियावर ठेवावे. किंनिमित्य की वरकडास सोडून आज्ञा करावी. गोव्याचे बंदी आमचे लोक आहेत ते सोडतील तरी पादरी सोडले जातील याजकरितां. त्यास

पादरी त्यास आवशक आहेत तो विचार चितात सोडले तरी सोडोत. नाहीतरी मरतील. सारांश ईश्व(रें) फते केली. येणेकरून सुरत आदीकरून सर्व जा (गे) आपणास पादाक्रांत जालेच. याचे मुक्ततेचा अ(र्जे) (चि) तात आणून मातुश्रीबाईहि विनंती करितील ते (मा)न्य करून मुक्तता केली पाहिजे. येणेकरून आ(पणास) श्री आधिकोतर येश देईल. विशेष काये लिहिणे. कृपा केली पाहिजे हे विनंती.

पिलाजीचा शिका.

मोर्तब सुद.

¶*Pilaji Jadhav requests Chimaji to release men taken captive in the late war. The Portuguese priests are to be retained as hostages to secure the release of Maratha soldiers imprisoned by the enemy.*

---

*No. 165*] [*About 8-5-1739*

श्री

गंगाज्यान्हवी मातुश्रीबाई[१] यासी

प्रीतिपूर्वक पिलाजी जाधवराऊ कृतानेक दंडवत विनंती. येथील क्षेम जाणोन स्वकीय लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. ईश्वरे रा आपाची फते केली येणेकरून सुरत आदिकरून सर्व जागे पादाक्रांत आहेत. येसमई फिरंगण प्रांतीची बंदिवान आहेत. त्याचेविसी विनंती करून मुक्तता करावी हा हेत होता. तो येतेसमई अवघे लोकानी गवगवा केला की तुम्ही जाता आमची बोलीबहुमान करवणे. (कोणी) काही, कोणी काही अर्ज करावयाचा गवगवा केला. याजमुले त्वरेन * * घेऊन स्वार जालो. येसियास बंदिवाने म्हणावयास येक तारापूर बाइकी व चिंचणीकर फिरंगी व माहिमचे येसे आहेत. वरकड * * लियास ये प्रांतीच राहाणार. दुसरे ती ठेविलियास केवल खर्चास मात्र आहे. त्याच्या ठेविलियाने कांहीहि किफायेतीची गोष्टी आहे येसे नाही. एक पादरी मात्र जे असतील ते येका किलियावर ठेवावे म्हणिजे ही बंदी(वान) जातील त्यास आज्ञा करावी की आम्हाकडील बंदिवान गोव्यात आहेत ती सोडून द्याल तरी पादरी सुटतील. पादरी त्याचे गुरू अवशक. या विचारे सोडतील तरी उतम आहेत, सोडून द्यावे. नाहीतरी त्याचा मुबदला हे राहतील. यास्तव राजश्री आपास आपण सांगोन त्याची मुक्तता होये तो अर्थ केला पाहिजे. या गरीबाचे मुक्ततेने

---

१ राधाबाई पेशवी.

ईश्वर यशाची वृधिच करील. येविशी लक्षवेल भीड वेचून मुक्तता करविली पाहिजे. अनमान केला न पाहिजे. विशेष काये लिहिणे. कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Pilaji Jadhav urges the Peshwa's mother to use her influence to set free Portuguese prisoners of war exclusive of the priests who are to be retained. The Portuguese Government is likely to release Maratha prisoners to secure the liberty of their priests.*

---

*No. 166*] [*12-5-1739*?

छ १६ सफर

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक खंडो चिमणाजी सा। दंडवत प्रा। कृतानेक विज्ञापना. येथील वर्तमान ता। छ १४ सफर मो। जजिरे उरण येथास्थित असे विशेष. रा। आपाजी बलाल यांस जजिरे मजकुरची सबनिसी राजश्री शंकराजीपंती सांगितली आहे त्यास येथील तमाम मोजदाद करून जाबता घडून हिसेब मा।रनिले समागमे पाठविला आहे. हा हिसेब मनास आणून आज्ञा कर्तव्य ते केली पाहिजे. किले मजकुरच्या तोफा तमाम राजश्री दादजी मानकर याणी नेल्या. बुर्जाचे बुर्ज रिकामे केले व काही वसईस व कांही बेलापुरास गेल्या आहेत. त्याचाहि झाडा पाठविला आहे. तरी झाडा पाहून आज्ञा कर्तव्य ते केली पाहिजे. रोजमरियाचा यैवज आणावयास गलबत सिलेपोर्स[१] पाठवणे म्हणोन आज्ञा. त्यावरून गलबत पतंगराव याची भरती करून पाठविले आहे. याजवरी पैका पाठवणे असेल तो पाठविला पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Khando Chimanaji to Chimaji Appa that accounts of the Uran fort have been sent with Apaji Balal and further adds, his fort has been completely denuded of guns, some of which have been sent to Bassein and some to Belapur.*

---

*No. 167*] [*16-5-1739*

श्री

राजश्री चिमाजीपंत आपा
गोसावियासी

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती. येथील क्षेम छ १८ सफर जाणून स्वकीये कुशल

१ एक जहाजाचा प्रकार.

लेखनाज्ञा केली पाहिजें विशेष. आपली आज्ञा घेऊन स्वार जाहालों तें छ १९ मिनहूस वाघोलीस दाखल जाहालो. जेष्ट मासच्या हतियाचा यैवज आगोधर पाठऊन देणे म्हणून आज्ञा केली होती. त्यावरून तरतूद करून जे बाकी राहिली तो यैवज झाडियानिसी रा जिवाजीपंत याजकडे पुणियासी पावता केला आसें. हुजूर प्रविष्ट करतील. शरीरी काही समाधान आहें. दारूचे धुराने डोलियास बहुतसा उपद्रव जाहाला आहें. आपले पुण्येकडून आरोग्य होंईल. आपणाकडील वर्तमान लेहून पाठवावयासी आज्ञा केली पाहिजे. रा शंकराजीपंत यासी सांगोन दोन घाटा थोरल्या देविल्या आहेत. त्या पाठऊन दिल्ह्या पाहिजेत. विशेष काये लिहिणे कृपा केली पाहिजे. हे विनंती.

पिलाजीचा शिक्का. मोर्तब सुद.

¶*Pilaji Jadhao informs Chimaji Appa of money being sent to Poona as per his instructions. His eyes, he says, were much troubled by cannon-smoke.*

---

*No. 168*] [*16-5-1739*

श्री

श्रीमत माहाराज राजश्री
पंत आपा स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक भुलोजी पाटील ढमढेरे कसबे तलेगाव कृतानेक सां दंडवत. विनती उपरी. येथील वर्तमान ता छ १८ माहे सफरपर्यंत स्वामीचे कृपाद्रुष्टी करून येथास्तीत असें. यानतर स्वामीनी आज्ञापत्र पाठविले तेथे लिहिलें की वसईस सुरुंग पोहचलिया उपरी बुधले भरून तयार करून बत्या देऊन छ ४ छ ९ सफरी हला केली. तेणेकरून फिरंगी कौलास येऊन छ १३ सफरी वसई फते जाहाली म्हणौन लिहिले. तेणेकरून अपल्यासी व गावांत बहुत हर्श जाहाला. विदित जालें पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Bhuloji Patil congratulates Chimaji Appa, the victor of Bassein, for the splendid fight he put up.*

No. 169] [पौ 19-5-1739

छ २१ सफर

**श्री.**

आसीर्वाद उपरि. राजश्री पिलाजी जाधवराऊ यांणी मोर्च्यात मेहनत सीमे-परती केली. साप्रत ज्वराचा उपद्रव विशेष जाहाला याजमुळे मारनिलेनी घरास जावयाचा निरोप मागितला त्यावरून त्यास वाघोलीस जावयास निरोप दिल्हा म्हणून लिहिले ते कळलें. लोभ[1] असो दीजे. हा आसीर्वाद.

¶*Bajirao acknowledges the letter of Chimaji Appa communicating him the news of Pilaji's utmost efforts. Pilaji suffered much from fever and consequently left for his village Vagholi.*

---

No. 170] [24-5-1739

× × रबिलौवल

**श्री**

श्रियासह चिरंजीव राजश्री आपा यासी बाजीराऊ बल्लाळ आसीर्वाद उपरी. येथील कुशल ता। छ २६ सफर जाणून आपणाकडिल कुशल लिहित गेले पाहिजे विशेष. तुमची पत्रें * * सफरीची आली ती पावली. लेखनार्थ कळला. फिरंगियास तहनामा करून देऊन काढून दिल्हा आणि तहनामियाची नकल पाठविली त्यावरून वर्तमान अवगत जाहालें. पुढेहि आपणाकडील दिनप्रतिदिनी वर्तमान लिहून पाठवणें. तीन[2] दिवस पत्रे राहिली होती की बाबूरायाकडील * * येईल मग पाठवावे त्यास काली पत्र आली त्यावरून आज रवाना केली असेत. लोभ असों दीजे हा आसीर्वाद.

¶*Bajirao acknowledges to Chimaji Appa the receipt of a letter containing the terms of negotiations with the Portuguese.*

---

No. 171] [1739?

**श्री**

सेवेसी विज्ञापना. राजश्री पिलाजी जाधवराऊ व राजश्री मल्हारबा राणबा यशवंतराऊ पवार व तुकोजी पवार व गोविंद हरी यांजकडील व हुजरातदेखील

---

१ हस्ताक्षर खुद्द बाजीरावाचें. पत्र बाजीरावाचें चिमाजी आपास.

२ अक्षर खुद्द बाजीरावाचें. पत्र बाजीरावाचें चिमाजीस.

ज्याच्या त्याच्या गोटातील थोडी माणसें समस्त सुखरूप आहेत त्याही आपली पत्रे दिल्हीं ती पाठविली आहेत. ज्याची त्यास प्रविष्ट करवावया आज्ञा केली पाहिजे शेवेसी[1] श्रुत होये हे विज्ञापना.

¶*These last words appear to be in Chimaji's hand. He reports to his brother that the various Sardars with their men are doing well.*

---

*No. 172*] [*About 22-5-1739*

श्री

सेवेसी विज्ञापना. या प्रांतीं यंदा सर्वत्र पाऊस मृगांचा बहुत जाला. रयेतीने पेरण्या करून रयती बहुत आनंदमय जाली. दुसरी गोष्ट तोहमसकुलीखान[2] माघारा गेला. यामुळें सावकारांस व रयतीस बहुत उमेद जाली. आपण वसई फते केली. यैशा तीन गोष्टी सालमजकुरी बहुतच उत्तम जाल्या. या वेगळे गोंवेयाकडील काजकाम होऊन च्यार टके हातास आले म्हणून परस्परे आइकिले आहे. ज्या गोष्टी न घडावयाच्या त्या घाडोन आल्या तस्मात स्वामी उभयेतां पूर्णब्रंम्ह या कल्युगामध्यें अवतारच आहेत ! ऐसी कार्ये मनुष्यापासून व्हावी ऐसे नाहीं ! तीर्थरूप राजश्री रायाच्या प्रतापे तोहमसकुलीखान माघारा गेला व स्वामीच्या प्रतापे वसईचे व गोंवेयाचे कार्य जाले. अघटित गोष्टी ज्या ना होण्याच्या त्या जाल्या ! तपस्वी आहेत त्यासच मात्र स्वामीची स्वरूपे कळली आहेत. इतर जनास जैसे गौळियास श्रीकृष्ण मनुष्य दिसत होता! ते समई एक विदूर व एक अक्रूर व एक भीष्म यासच पूर्ण ब्रम्ह ऐसा श्रीकृष्ण दिसत होता तैसेच स्वामी योग्यास दिसतात !! पर्ज्यन्याचे वर्तमान स्वामीस कळावे म्हणून लिहिले असे. या उपरी स्वामीचे येणे पुणेयास लौकर जालियानें बहुत उत्तमच आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Chimaji Appa and his brother are extolled for the good luck that has accompanied them throughout. The writer says, " The rains are propitious. The nightmare that was hanging over Delhi has disappeared with the departure of Nadirshah. The Portuguese have been crushed both at Bassein and Goa. Your deeds may well be compared with those of Shree Krishna."*

---

*No. 173*] [*31-5-1739 ?*

छ ९ रबिलाखर

**श्रीगणराज.**

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी. सेवक त्र्यंबक[3] हरी कृतानेक सां नमस्कार. विज्ञापना येथील वर्तमान तागाईत जेष्ट शुध पंचमीपर्यंत स्वामीच्या

१ हस्ताक्षर चिमाजीचें. २ नादीरशहा. ३ पटवर्धन (?).

कृपादिष्टीकरून येथास्थित असे. यानंतर बहुतां दिवसी स्वामींनी कृपा करून स्मरणपूर्वक आज्ञापत्र पाठविलें ते सुसमई प्रविष्ट होऊन परम आल्हाद जाला तो पत्रीं दर्शविता येत नाही. येसेंच सदैव आलिया मनुष्यासमवेत आज्ञापत्री सांभाल करणार स्वामी समर्थ आहेत. वसई फत्ते जालियाचां अर्थ पत्रीं लेख केला यैशास बहुत उत्तम गोष्टी जाली. यैसें कर्म मागेंही कोणास न जालें अथवा पुढेंही न होणार यैसी गोष्टी स्वामीच्या हातून जाली. स्वामीच्या पुण्य-प्रतापास जोडा नाहीं. आम्हाकडील वर्तमान तर आम्ही राजश्री बावासाहेबाकडे आहों. येंदा मुलुकगिरीस गेले. समागमें आम्ही गेलो होतो. सांप्रत फिरोन माघारे आले. राजदर्शन येका दों दिवसीं होईल. वरकड अर्थ राजश्री बाबासाहेबांचे पत्रावरून सेवेसी निवेदन होईल. बहुत लिहिणे शक्ती नव्हे हे विनंती.

¶*Trimbak Hari congratulates Chimaji Appa on his splendid victory at Bassein.*

---

*No. 174*] [*17-5-1739*

**श्री**

**श्रीमंत माहाराज राजश्रीं पंत आपा स्वामीचे**
**सेवेसी**

अज्ञाधारक मोरसेटी करंजे सा। दंडवत विनंती. ता। छ १९ सफर सु॥ तिसा स्वामीचे दयेकरून वर्तमान येथास्थित असे विशेश. स्वामीचे आज्ञापत्र आले तेथे "वसई फते जाली, आपण शनिवारी किलियात गेलो" म्हणऊन लिहिले तेणे-करून विशेश आनंद जाला तो पत्री लेहावा येसा आर्थ नाही. पूर्वी अवतार जाले त्याणी कीर्ति संपादिल्या, त्यापेक्षा स्वामीचा पुन्यप्रताप अधिक दिसोन आला. स्वामी वसईस वेढा देऊन वसईस राहिले तेव्हांच आमच्या मनात आले की स्वामीस येश आगत्यरूप येतच आहे. तेणेचप्रमाणे येश आले. अति उतम गोष्टी जाली. सेवसी श्रुत होये हे विनती.

¶*Mor Set Karanje sends Chimaji Appa his congratulations on the latter's victory at Bassein.*

---

*No. 175*] [*About 21-5-1739*

**श्री.**

श्रियासह चिरंजीव राजश्री आपा यांसी सौभाग्यवती काशीबाई अशीर्वाद. उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहिणें विशेष. तुम्हीं पत्र पाठविलें

तें पावलें. वसई फत्ते केलियाचें वर्तमान लिहिलें त्यावरून बहुत संतोष वाटला. आपण येशस्वी जाहाले हे थोर गोष्टी जाहाली. बहुत काय लिहिणें लोभ असो दिल्हा पाहिजे. हे आशिर्वाद.+

¶*Kashibai sends her congratulations to Chimaji Appa on his triumph at Bassein.*

---

*No. 176*] [*23-5-1739*

छ ४ रोवल

श्री

**श्रीमत माहाराज राजेश्री**

**आपा स्वामीचे सेवेसी**

विनंती सेवक मल्हार राम सा। नमस्कार विज्ञापना ऐसीजे. येथील वर्तमान ता। छ २० सफर पावतों स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. स्वामीनी वसई फते केलियाची पत्रे श्रीमंत राजश्री राऊ स्वामीस आली त्यावरून सविस्तर कळले. येथे उत्छाह थोर जाहाला, साकरा वाटल्या. हा कीर्तिघोष स्वामीचा दिगांतरी जाला. स्वामी प्रतापीच आहेत. देवब्राम्हणाची संवस्थापना करावयासाठीच स्वामीचा अवतार आहे. जे कार्य दुर्घट स्वामी चितावर धरितात ते सिधीस ईस्वर स्वामीच्या मनोदयावरून नेतो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Malhar Ram congratulates Chimaji Appa upon his victory at Bassein.*

---

*No. 177*] [*23-5-1739*

छ ४ रबिलावल

॥ श्री ॥

**स्वस्ति श्रीमद्‌गुणगणविराजमान**

**राजमान्य राजश्रीविराजमान**

**चिमणाजी बल्लाल प्रभुवर्यांप्रति**

आश्रितगणगणनीय रामचंद्रभट्ट पौराणिक कृतानेक वेदोक्त आशिर्वाद उपरी. येथील कुशल वैशाख बहुल द्वादशीपर्यंत जाणोन स्वकीय क्षेमलेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. आपण कृपा करून स्वहस्ताक्षरें वसई फते झालियाचें पत्र पाठविलें ते पावोन परमानंद जहाला तो पत्री कोठंवर लिहावा? आपुल्या पुण्यास

---

+ पत्र काशीबाई पेशवी हिचें चिमाजी आपास.

व प्रतापास जोडा नाही. ऐसे महत्कृत्य अभूतपूर्व व अनागत अन्यास आहे. आपुल्या मस्तकी देवब्राम्हणांचा आशिर्वाद परिपूर्ण आहे म्हणोन अशीं महत्कृत्यें घेडोन येतात. असेंच सदैव पत्र पाठवित आशिलें पाहिजे. बहुत काय लिहिणे? कृपा सदैव असों दीजे हे आशिर्वाद १०००००००००[+]

¶*Ramchandra Bhat Puranik congratulates Chimaji Appa over his glorious achievement.*

---

*No. 178*] [*25-5-1739*

छ ४ रालौवल

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

सेवक अमृतराऊ शंकर दिनकरराऊ सा। दंडवत प्रा। विनंती. येथील कुशल ता। छ २७ सफरपावेतो स्वामीचे कृपावलोकनेकरून येथास्थित असे विशेष. स्वामीनी कृपा करून आसीर्वादपत्र पाठविले ते पावले. वसई हस्तगत जाहालियाचे वर्तमान राजश्री रायाच्या पत्रावरून कळोन परम आनंद जाहाला. स्वामी येशस्वी, पुण्यवान आहेत. वसई फते केली याजपेक्षा श्रीकृपे महत्कार्यें होऊन हिंदूराज्याचे संस्थापन स्वामीचे हातून होती(ल). वसईचा प्रसंग म्हणावा तरी हस्तगत होईल यैसा भरोसा कोणासहि नव्हता, परंतु स्वामीचा निश्चये थोर. तन्मुळेच वसई फते होऊन देव ब्राह्मण जोसी गणिक या सर्वांस खरे केलें. स्वामीचा पराक्रम गगन भेदून गेला तेथे आम्ही स्तुत ल्याहावी यैसे नाहीं. सेवेसी श्रुत होये[१] हे विज्ञापना.

¶*Amritrao Shankar Dinkarrao congratulates Chimaji Appa on the capture of Bassein.*

---

*No. 179*] [*May 1739*

श्री

राजश्री चिमाजीपंत

आपा गोसांवियासी

॥ श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्षीअलंकृत राजमान्य स्नेहांकित. संभाजी व सटवोजी जाधव दंडवत विनंती. येथील क्षेम जाणोन स्वकीये कुशल

---

+ सबंध पत्र बाळबोधींत. अस्सलबमोजीब नक्कल केली आहे. फक्त विरामचिन्हेंच तेवढीं आमचीं.

१ येथून वळण निराळें.

केली पाहिजे विशेष. आपण पत्र पाठ[illegible]
ला. वसईच्या किल्यातील फिरंगियानी कौल घेऊन [illegible]
फते जालियाच वर्तमान संतोषाचे लिहिले ते येकोन परमहर्ष जाला. ईश्वर
महद्यशं दिल्हे. उतम गोष्टी जाली. वरकड सविस्तर अर्थ तीर्थरूप राजश्री
सुभेदार याणी लिा आहे त्यावरून विदित होईल. विशेष काये लिहिणे? कृपा केली
पाहिजे हे+ विनंती.

¶*Satwoji Jadhav congratulates Chimaji.*

+ हीं अक्षरें बालबोधींत पण सटवोजीचीं कीं संभाजीचीं ?